फ्योंदोरव-दविदोव

कथा ही नाण्यांची



ललित विज्ञान साहित्य

कथा ही नाण्यांची

प्राख्यात सोविएत इतिहासकार आणि संशोधक गेरमन अलेक्सेइविच फ्योदोरोव – दविदोव यांनी लिहिलेल्या या पुस्तकामध्ये नाण्यांच्या इतिहासाचा परामर्ष घेण्यात आला आहे. इतिहासातील अनेक अत्यंत महत्वाच्या आणि मनोरंजक घटनांचा नाण्यांशी दाट संबंध आहे. नाण्यांच्या उदयापूर्वीच्या काळापासून ते आधुनिक नाण्यांच्या जन्मापर्यंतचा कालखंड हा अशा मनोरंजक घटनांनी पूर्णपणे व्यापलेला आहे. इतिहासामध्ये आणि त्याचप्रमाणे नाण्यांमध्ये स्वारस्य असलेल्या सर्व वयोगटातील वाचकांसाठी हे पुस्तक अत्यंत उपयुक्त ठरेल.

Г.А.Федоров-Давыдов

Монеты рассказывают

Москва «Педагогика»

फ्योदोरव-दविदोव

कथा ही नाण्यांची

मीर प्रकाशन
मॉस्को

अनुवाद : डॉ. रविंद्र रसाळ

На языке маратхи

© Издательство „Педагогика“ 1981
© मराठी अनुवाद, मीर प्रकाशन, १९८७

अनुक्रमणिका

पार्श्वभूमी

एका पडक्या घराचे तळघर. नाण्यांनी आणि दागदागिन्यांनी भरलेल्या भल्यामोठ्या उघड्या पेट्या. वृद्ध सरदार एका पेटीमध्ये सोन्याच्या नाण्यांनी भरलेली थैली रिकामी करीत आहे.

महान रशियन कवी अलेक्सांदर पुष्किननी आपल्या "कंजूस सरदार" या दीर्घ कवितेमध्ये सोने, पैसे आणि नाण्यांचे अत्यंत सुंदर रीतीने यथायोग्य वर्णन केले आहे. 'भारदस्त, वजनदार प्रतिनिधी' असा त्यांनी त्यांचा उल्लेख केला आहे. पैशाच्या जोरावर प्रचंड सत्ता प्राप्त केलेल्या अनेक लोकांचा सोन्याच्या नाण्यांशी अतूट संबंध होता.

परंतु केवळ नाण्यांपासून होणाऱ्या फायद्यामुळेच लोकांचे त्यांकडे लक्ष वेधले गेले नाही. लोकांच्या आणि राष्ट्रांच्या जीवनाशी असलेल्या नाण्यांच्या घनिष्ट संबंधांमुळे ती मानवी जीवनाची आणि इतिहासाची साक्षीदार बनली आहेत. एखाद्या झिजलेल्या जुन्या नाण्याचे केवळ मूल्यवान धातूचा तुकडा इतकेच मूल्य असत नाही तर भूतकाळात घडलेल्या घटनांची माहिती देणारे साधन म्हणून त्याचे फार मोठे महत्त्व असते. जुन्या वस्तूंचे

सौंदर्य अवर्णनीय असते यात मुळीच शंका नाही. त्या वस्तूंमध्ये त्या काळाचा आत्मा आणि सुगंध एकवटलेला असतो; जो पुन्हा कधीही परत येणार नसतो, जुने नाणे हातात घेताच असे वाटते की जणू काही ते आपणाला भूतकाळामध्ये फेरफटका मारण्यासाठी घेऊन जात आहे. यामुळेच जुनी नाणी संग्राहकांचे लक्ष्य बनली आहेत.

नाणी लोकांबद्दल, भूतकाळाबद्दल आणि इतिहासाबद्दल बरेच काही कथन करतात. त्यांची स्वतःची अशी खास भाषा असते. त्या खास भाषेमधून कथा ऐकताना असे वाटते की जणू काही आपल्या भोवतालचा आसमंत भूतकाळातील अवशेषांच्या आवाजाने भरून गेला आहे. त्यातील काही नाणी अत्यंत स्पष्ट व मोठ्या आवाजात या घटनांचे वर्णन करीत असतात, त्यामुळे ती अस्तित्वात येतात. तर दुसऱ्या नाण्यांचा आवाज अतिशय संदिग्ध असतो व त्यामुळे ती काय सांगत आहेत याचा आपणाला केवळ अंदाजच बांधावा लागतो. तिसरी नाणी अशा एखाद्या भाषेत बोलत असतात की ती भाषा मुळातच आपणास माहीत नसते. या नाण्यांना कोणी, केव्हा व कोणत्या घटनांच्या निमित्ताने अस्तित्वात आणले याचा काहीच पत्ता नसतो.

नाण्यांचे रूपांतर "इतिहासाच्या केरकचऱ्यात", पूर्व शतकांच्या अनावश्यक अडगळीत किंवा अर्थहीन वस्तूंच्या संग्रहामध्ये न होता त्यांनी कथाकार व कधी कधी एकमेव कथाकार, इतिहासकार म्हणून भूमिका वटवावी या हेतूनेच एका खास शास्त्रशाखेचा जन्म झाला. आणि हे शास्त्र म्हणजे – मुद्राशास्त्र (numismatics) होय (नाणे या अर्थाने असलेल्या numisma या लॅटिन भाषेतील शब्दापासून).

मुद्राशास्त्राचा ऐतिहासिक निष्कर्षाकडील मार्ग कधी कधी अत्यंत कठीण आणि दीर्घ असतो. नाण्यांची छायाचित्रे असलेल्या सर्वसाधारण सूचींवर अनेक पुस्तके लिहिली गेली आहेत. त्यांमध्ये केवळ नाण्यांविषयीची माहिती व त्यावरील मुद्रणाचे वर्णन आहे. कोणती नाणी कोणत्या काळात पाडण्यात आली हे कशाप्रकारे निश्चित करता येते या विषयावर हजारो लेख लिहिले गेले आहेत.

या पुस्तकामध्ये मात्र नाण्यांच्या सहाय्याने प्राप्त होणारी वेगळ्या प्रकारची ऐतिहासिक माहिती दिली गेली आहे. सामाजिक रचना, तिच्या विकासाचे नियम, सत्ताधारी आणि पददलित वर्गांचे स्वरूप, अनेक शतकांपूर्वी घडलेल्या घटनांचे स्वरूप इ. अर्थात ही गोष्ट खरी आहे की जर आपण मुद्राशास्त्रातील केवळ तयार निष्कर्षच लक्षात घेतले तर आपणाला कदाचित असे वाटेल की ही सारी माहिती अगदी तयार स्वरूपात आहे मग अशीच घ्यावयास काय हरकत आहे? अशी शंका आपल्या मनात उत्पन्न होऊ नये यासाठी आम्ही आपणास काही उदाहरणांच्या सहाय्याने मुद्राशास्त्रज्ञांच्या कठीण संशोधनांविषयी माहिती देऊ. या छोट्या-छोट्या वाटणाऱ्या संशोधनांच्या आधारावरच इतिहासशास्त्राची ही प्रचंड वास्तु उभी राहिली आहे.

मुद्राशास्त्र प्राचीन नाण्यांना कशा प्रकारे 'बोलण्यास' भाग पाडते हे पाहण्यापूर्वी एकंदरीत नाण्याचे स्वरूप असते तरी कसे व आपल्या जीवनामध्ये ती कोणते स्थान व्यापतात या संबंधीची माहिती घेऊ.

नाणी म्हणजे सर्वप्रथम पैसे. परंतु सर्वच पैसे काही नाणी असत नाहीत. सर्वप्रथम आपण पैशांचा इतिहास पाहू.

प्रारंभीचे पैसे

फार फार शतकांपूर्वी, अगदी प्राचीन काळीदेखील लोक आपल्या श्रमाद्वारे प्राप्त झालेल्या वस्तूंची आपापसात देवाण-घेवाण करीत असत. पुराणवस्तु संशोधकाना असे आढळून आले आहे की आगदी अश्मयुगामध्ये देखील टोळयांची आपा-पसात देवाण-घेवाण चालत असे. देवाण-घेवाण पद्धतीच्या विका-साचे प्रमुख कारण होते श्रमविभागणी. एक टोळी अशा ठिकाणी रहात असे की तेथील दगडांपासून उत्कृष्ट प्रकारची हत्यारे बनवता येत तर दुसरी टोळी ज्या ठिकाणी रहात असे त्या ठिकाणी अशा प्रकारचे दगड नसत. काही शतकांचा काळ लोटला आणि काही लोक आपल्या शेजाऱ्यांकडून तांबे किंवा ब्रॉंझ तयार करण्या-साठी तांब्यात मिसळले जाणारे धातु खरेदी करू लागले.

आफ्रिका खंडाचा प्रवास करणाऱ्या एका प्रवाशाने या पद्धतीचे पुढीलप्रमाणे वर्णन केले आहे: "नदी पार करण्यासाठी जरूरी असलेल्या होडीच्या बदली नावाड्याने माझ्याकडून हस्तिदंताची मागणी केली ... परंतु तो माझ्याजवळ नव्हता, पण मला आठवले की माझ्या सोबत्याकडे, महंमद-इब्न-सलिबाकडे हस्तिदंत आहे व त्याला मात्र कपड्यांची आवश्यकता आहे. माझ्याकडे कपडे नसल्याकारणाने या "जादा" माहितीचा मला विशेष उपयोग झाला नाही, परंतु नंतर मात्र तिचा बराच उपयोग झाला. मला असे कळले की महंमद-इब्न-गारीबाजवळ कपडे आहेत, पण त्याला एका दोरखंडाची जरूरी आहे व असा दोरखंड सुदैवाने माझ्याजवळ होता. अशा प्रकारे मी महंमद-इब्न-गारीबाला आव-श्यक तेवढा दोरखंड दिला व त्याने महंमद-इब्न-सलिबाला कपडे



नाण्यांचा वापर अनेकदा आभूषणा सारखा केला जातो.

दिले. शेवटी महंमद-इब्न-सलिबने मला दिलेला हस्तिदंत मी नावाड्याला दिला व होडी घेतली.

मानवजाती-वर्णनामध्ये अत्यंत प्राचीनकालीन देवाण-घेवाणीची उदाहरणे आढळून येतात. ज्यांचा योग्य पातळीवर विकास होऊ शकला नाही त्या टोळ्या आणि जमाती आपल्या शेजारच्या

टोळयांबरोबर अदला-बदल करण्यासाठी ठराविक ठिकाणी वस्तु आणीत. विक्रेत्यांच्या अनुपस्थितीत ग्राहक पूर्वी ठरल्याप्रमाणे वस्तु आणीत आणि ठराविक ठिकाणी ठेवून त्याबद्दल आवश्यक वस्तु घेऊन जात.

हळूहळू या अदलाबदलीच्या क्रियेमध्ये एका अशा वस्तूची निवड झाली की जिच्या मदतीने बाकी वस्तूंची किंमत ठरविली जाई. थोडक्यात सांगायचे म्हणजे या एका वस्तूच्या ठराविक प्रमाणावरून बाकी वस्तूंची किंमत निश्चित केली जाई.

अशा प्रकारेच बराच काळ आशिया, आफ्रिका आणि सागरी-प्रदेशातील प्राचीन जाती-जमाती सागरी शंखांचा वापर पैशाच्या स्वरूपात करीत होत्या. याच पद्धतीने उच्च प्राचीन संस्कृती असलेल्या चीन, जपान आणि भारतासारख्या देशांमध्ये कवडयांचा वापर पैशाप्रमाणे केला जात असे. अनेक कमी विकसित जाती-जमातींमधून या शंख-पैशांची माळ बनविली जात असे आणि जेव्हा धोक्याची चाहूल लागे तेव्हा हे शंख-पैसे जमिनीत पुरले जात असत. मेलानेसियामध्ये तथाकथित वराहमुद्रा वापरल्या जात. शंखांच्या, काचेच्या मण्यांच्या, कुत्र्याच्या दातांच्या आणि शिवाय डुकरांच्या शेपटांच्या या माळा असत. या पैशांचे मूल्य जाणून घेणे खरोखरच मनोरंजक ठरेल: डुकरे आणि बायको विकत घेण्यासाठी या पैशाचा वापर केला जाई. कधी कधी या पैशांच्या माळेची लांबी कल्पनेबाहेर, म्हणजे १२ मीटर इतकी होत असे.

नाण्यांचा शोध लागण्यापूर्वी प्राचीन काळी पैसे म्हणून गुरांचा वापर करण्याची पद्धत बरीच रूढ होती. खरोखरीचे पैसे अस्तित्वात येण्यापूर्वी गायी, बैल व गुरे हेच काय ते पैसे होते. प्राचीन ग्रंथांमध्ये (उदा: "इलियड" आणि "ओडिसेई" मध्ये) देखील धातूंच्या पैशांचा काहीच उल्लेख नाही परंतु व्यापाराचा मात्र

सर्वत्र उल्लेख आहे. वस्तूचे मूल्य बैलांमध्ये, गायींमध्ये किंवा बकऱ्यांमध्ये केले जात असे. प्राचीन रोममध्येदेखील गुरांचा वापर पैशाच्या स्वरूपात केला जाई.

पैशाच्या प्राचीन स्वरूपाची माहिती करून घेणे मुद्राशास्त्रज्ञांकरिता जरी जरूरी असले तरी या सर्व बाबींचा विचार करताना प्रमुख संशोधक मुद्राशास्त्रज्ञ नव्हे, तर मानवजातीशास्त्रज्ञ होय. परंतु जेव्हा पुरातन काळातील पैशांविषयी चर्चा होते तेव्हा मुख्य भूमिका पुराणवस्तू संशोधक वटवितात. जोपर्यंत नाणी अस्तित्वात नव्हती तोपर्यंत मुद्राशास्त्रज्ञांना संशोधनासाठी काहीच साहित्य उपलब्ध नव्हते. धातूचे पैसे आणि नाणी केव्हा उदयास आली?

हजारो वर्षे चालू असलेल्या व्यापाराचे आणि विनिमयाचे फळ म्हणजे नाण्यांचा जन्म होय. या वेळेपर्यंत काही ठराविक वस्तूमध्ये इतर वस्तूंचे मूल्य केले जात होते.

अधिक सोयीस्कर आणि फायदेशीर अशा धातूंच्या नाण्यांचा वापर करण्यापूर्वी मानवाने इतर शेकडो भिन्न-भिन्न प्रकारच्या पैशांचा वापर करून पाहिला.


मेसोपोटामिया आणि इजिप्त या जगातील अत्यंत प्राचीन देशांमध्ये धातूंच्या लगडींचा वापर पैशाच्या स्वरूपात करण्यात येत होता. कधी कधी हे धातूंचे पैसे गोल चकत्या, अंगठ्या, अर्धगोल आणि तोड्यांच्या आकारासारखे असत. इटलीमध्ये नाणी व्यवहारात येईपर्यंत निरनिराळ्या वजनांच्या तांब्याच्या लडींचा पैसे म्हणून वापर केला जात असे. पुराणवस्तू संशोधकांना इटलीमध्ये अशा प्रकारच्या जवळजवळ ३०० कि. ग्रॅ. वजनाच्या लड्या सापडल्या आहेत. या लडी अपोलो देवाच्या मंदिरामध्ये भाविकाकडून पायांपासून मुक्तता मिळविण्याच्या हेतूने दान म्हणून

फेकल्या जात असत. हळूहळू लोकाना समजू लागले की एकाच ठराविक वजनाची नाणी बनविणे सोयीस्कर ठरते.

शंख, कवडचा, गायी व इतर पुरातन प्रकारच्या पैशांच्या तुलनेने धातूंच्या पैशांपासून कसा फायदा होतो व धातूची नाणी कशा प्रकारे सोयीस्कर ठरतात?

एकतर धातु खराब होण्याचा काहीच प्रश्न नव्हता व दुसरी गोष्ट म्हणजे धातूचे नाणे जागा देखील कमीच व्यापे. छोटचा खरेदीमध्ये वस्तूची किंमत ठरविताना त्याचे लहान भागात सहज विभाजन करता येई. परंतु शुद्ध सोन्याच्या किंवा चांदीच्या लडी-मध्ये तांबे किंवा कथिल मिसळून लडी हलकी करण्याचा प्रयत्न काही लोक करीत. यामुळे धातूची शुद्धता पडताळून पहावी लागे व लडीचे वजनसुद्धा तपासून पहावे लागे. बनावट पैसे तयार केले जाऊ नयेत म्हणून सत्ताधारी त्यावर मुद्रण करू लागले. एखाद्या लडीवर शिक्का आहे याचा अर्थ असा होई की ती लडी ठराविक गुणवत्तेच्या धातूपासून बनविण्यात आली आहे. अशा प्रकारे धातूच्या तुकडचाला "राष्ट्रीय पोशाख" चढविण्यात आला व पहिल्या नाण्यांचा जन्म झाला.

जेव्हा नाण्यावर राष्ट्राचा शिक्का उमटविला जाई किंवा त्याला जेव्हा "राष्ट्रीय पोशाख" चढविला जाई तेव्हा त्याला खास ऐतिहासिक महत्त्व प्राप्त होई. ऐतिहासिक माहितीचे ते एक साधन ठरे, कारण त्यावर त्या काळाची माहिती नोंदविली जाई. अशा प्रकारे नाणे आपणाला भूतकाळाची माहिती करून घेण्याच्या कामी मदत करू लागले. आणि मानवाला तर अगदी प्राचीन काळापासूनच भूतकाळ जाणून घेण्याची ओढ होती.


LA
SCIENCE
DES
MEDAILLES.

संग्रहाकडून शास्त्राकडे

नाण्यांचा संग्रह हे मुद्राशास्त्राच्या विकासातील पहिले पाऊल होते. काही अत्यंत श्रीमंत लोकांच्या हाती हळूहळू प्रचंड प्रमाणावर पुरातन वस्तु गोळा होत गेल्या. संग्राहक नाण्यांचा व्यवहार स्वतः करीत, परंतु अनेकदा ते संशोधक आणि तज्ज्ञांची मदत घेत. मुद्रातज्ज्ञ नाण्यांचा सूक्ष्म अभ्यास करीत, त्यांपासून मिळणाऱ्या संपूर्ण माहितीची नोंद करून सूची तयार करीत व इतर संग्राहकांकडे अशाच प्रकारच्या नाण्यांचा शोध घेत.

१४ व्या व १५ व्या शतकात जेव्हा इटलीमध्ये पुरातन वस्तूंचा संग्रह करण्याची लोकांमध्ये एक लाट उसळली होती तेव्हा सर्वत्र प्राचीन नाणी गोळा केली जाऊ लागली. विख्यात कवी पेट्रारका (१३०४-१३७४) आणि फ्लोरेनवासी चित्रकलेचा पुरस्कर्ता कजिमो मेदीची (१३८९-१४६४) यांच्याकडे नाण्यांचे उत्कृष्ट संग्रह होते.

युरोपमधील प्रत्येक सत्ताधाऱ्याची आपल्या प्रासादामध्ये नाण्यांचा संग्रह ठेवण्याची इच्छा असे. यामुळे नाण्यांचा संग्रह ठेवण्याच्या व त्यांचा अभ्यास करण्याच्या एका खास-दालनाचा सर्वत्र उदय झाला. आता तज्ज्ञाना केवळ आपल्या ठराविक संग्राहकांजवळीलच नव्हे तर इतर सर्व संग्राहकांजवळील नाण्यांची माहिती होऊ लागली.

प्रारंभीच्या मुद्राशास्त्रज्ञांमध्ये पादुईचा निवासी जोवानी कविनी (१४९९-१५७०) याचा जरूर उल्लेख करावा लागेल. त्याला प्राचीन नाण्यांची चांगली माहिती होती. परंतु त्याचे या क्षेत्रातील कार्य मुद्राशास्त्राची सेवा बजावू शकले नाही. मागणी असलेल्या

नाण्यांच्या संग्रहात. फ्रान्स, १८ वे शतक

प्राचीन नाण्यांवरील चित्राची हुबेहुब नक्कल करून तो बनावट नाणी तयार करीत असे.

प्रारंभीच्या मुद्राशास्त्रज्ञांनी मुख्यत: कोणत्या गोष्टीकडे आपले लक्ष वेधले होते? या शास्त्रज्ञांनी लिहिलेली काही पुस्तके पाहू. १५१७ साली रोममध्ये फुल्विओ या मुद्राशास्त्रज्ञाचे "नाण्यांवरील सुप्रसिद्ध व्यक्तींच्या प्रतिमा" हे पुस्तक प्रसिद्ध झाले. "पृथ्वीच्या जन्मापासूनच्या सुप्रसिद्ध व्यक्तींच्या प्रतिमा असलेल्या नाण्यांचे वर्णन आणि या व्यक्तींच्या जीवनाचा व कार्याचा परिचय" या नावाखाली मुद्राशास्त्रज्ञ गिल्योम रुल्ल याचे पुस्तक १५५३ साली लिओन येथे प्रसिद्ध झाले.

अनेक भाषांमधून प्रसिद्ध झालेले गिल्योम रुल्ल याचे पुस्तक अतिशय लोकप्रिय ठरले. लेखकाला नाण्यांवर केवळ रोमच्या सत्ताधाऱ्यांच्याच प्रतिमा नव्हे तर मध्ययुगीन राजांच्या, धर्मगुरुंच्या आणि बायबलमधील पात्रांच्या प्रतिमा आढळून आल्या. त्याला असे वाटले की जणू काही अहिल्लाची प्रतिमा सापडली: आपल्या पुस्तकामध्ये रुल्लने अरेय या युद्ध देवाची शिरस्त्राणधारी डोक्याची प्रतिमा असलेल्या एका पुरातन नाण्याखाली या वीराचे नांव दिले होते.

तर असे होते हे सुरुवातीचे मुद्राशास्त्रज्ञ. शास्त्रीय दृष्टिकोनातून मुद्राशास्त्राकडे आपणाला केवळ १८ व्या शतकापासूनच पाहता येईल. या वेळेपर्यंत नाण्यांच्या संग्रहामध्ये हळूहळू विशेष महत्त्वाच्या व मौल्यवान नाण्यांची भर पडत गेलेली होती.

व्हिएन्नामध्ये पहिल्या मॅक्सीमिलीअन राजाच्या संग्रहाचे रूपांतर एका प्रचंड राजेशाही दालनामध्ये झाले होते तर बर्लिनमध्ये अशाच प्रकारचे एक नाण्यांच्या संग्रहाचे दालन उघडण्यात आले होते. चौथ्या हेन्री आणि १४ व्या ल्युडोविकच्या संग्रहापा-

सून पॅरिसमध्ये एक राजेशाही दालन उघडण्यात आले. १८ व्या शतकामध्ये प्रमुख नाण्यांचे संग्रह ब्रिटनमधील वस्तुसंग्रहालयात ठेवण्यात आले.

रशियाच्या पहिल्या पिटर या झारने पिटर्सबुर्गमध्ये (आताच्या लेनिनग्रादमध्ये) कुन्स्टकामेरा नावाच्या वस्तुसंग्रहालयाची स्थापना केली (अत्यंत दुर्मिळ वस्तु असलेल्या या वस्तुसंग्रहालयाला वरील नाव १८ व्या शतकात मिळाले). खास वैज्ञानिक महत्त्व असलेल्या वस्तुंव्यतिरिक्त या वस्तुसंग्रहालयामध्ये नाण्यांचा आणि पदकांचा मोठा संग्रह होता. झारने काही नाणी व नाण्यांचे संपूर्ण संग्रह खरेदी करून त्यात मोठी भर घातलेली होती. या वस्तुसंग्रहालयामध्ये नाण्यांची पद्धतशीर वर्गवारी करण्यात येत असे. ही वर्गवारी करीत असताना ज्या तत्त्वांचा उपयोग करण्यात आला होता ती तत्त्वे बऱ्याच काळानंतर बनविल्या गेलेल्या रशियन नाण्यांच्या शास्त्रीय वर्गवारीमध्ये वापरली गेली. आज लेनिनग्रादमधील प्राचीन नाण्यांचा संग्रह युरोपमधील एक सर्वात मोठा संग्रह समजला जातो. एकसारखी नाणी वगळता वेगवेगळी तीन लाखाहून जास्त नाणी या संग्रहालयात आहेत.

अशा प्रकारे १८ व्या शतकामध्ये पॅरिस, लंडन, पिटर्सबुर्ग, व्हिएन्ना आणि बर्लिन या युरोपमधील पाच शहरांमध्ये प्राचीन नाण्यांचे मोठे संग्रह होते. याच संग्रहालयांमध्ये मुद्राशास्त्राचा जन्म झाला. या संग्रहालयांमध्ये उत्कृष्ट ग्रंथालये होती आणि मुद्राशास्त्रीय साहित्य एकाच ठिकाणी जतन करून ठेवले जाई.

सर्वप्रकारच्या अतिकल्पित विचारांविरुद्ध आणि नाण्यांच्या बनावटगिरीविरुद्ध लढा देणे हे १८ व्या शतकामध्ये मुद्राशास्त्रासमोरील सर्वात मोठे जिकीरीचे काम होते. प्राचीन वीरांच्या प्रतिमा असलेल्या नाण्यांच्या थोपवू न शकणाऱ्या शोधाला आणि केवळ

"एक नजर" टाकून त्यांचे मूल्य ठरविण्याच्या ढोबळ पद्धतीला संग्राहीत मुद्राशास्त्रीय साहित्याच्या आधारावर काटेकोर शास्त्रीय वर्गवारीने उत्तर देणे भाग होते.

हे अवघड काम हाती घेणाऱ्या प्रारंभीच्या संशोधकांमध्ये हंगेरीच्या जोसेफ-इलारीई एक्केल (१७३७-१७९८) या शास्त्रज्ञाचा उल्लेख करावा लागेल. "प्राचीन नाण्यांचे विज्ञान" हा आठ खंडाचा ग्रंथ एक्केल यांनी लिहिला. या ग्रंथानेच त्याना प्राचीन मुद्राशास्त्राचा पिता हा बहुमान मिळवून दिला.

नाण्यांच्या संग्राहकांजवळ असलेली नाणी निरनिराळ्या प्राचीन शहरांशी संबंधीत होती. या शहरांच्या भौगोलिक स्थानांनुसार एक्केलने नाण्यांची वर्गवारी करून सूची तयार केली: भूमध्य समुद्रकिनाऱ्यावर स्पेनपासून सिरीयापर्यंत आणि पुन्हा परत पश्चिमेच्या दिशेने तर दक्षिणेकडे आफ्रिकेच्या किनाऱ्यावर पसरलेल्या शहरांची ही सूची होती. एक्केलनी ७० हजाराहून जास्त प्रकारच्या नाण्यांची वर्गवारी केली.

पूर्वेकडील मुद्राशास्त्राच्या क्षेत्रात नाण्यांची शास्त्रीय वर्गवारी करण्याचा प्रथम मान मिळवला तो रशियातील कझान विद्यापीठातील प्राध्यापक ख्रिस्टन मार्टिन फ्रेन (१७८२-१८५१) यांनी. रशियाच्या शास्त्र आकादमीचा आकादमीशियन असलेला हा शास्त्रज्ञ मुळचा जर्मन होता. या क्षेत्रामध्ये यापूर्वी फ्रेनचा देशबंधू ओलूफ-गेरहार्ड टिखसन, फ्रान्सचा दे सासी, पिटर्सबुर्गचा आकादमीशियन क्रेर आणि इतर अरब अभ्यासक यांनी बरेच संशोधन केलेले होते.

१८०७ साली फ्रेनना कझान विद्यापीठामध्ये व्याख्यान देण्यासाठी निमंत्रित करण्यात आले. त्यांनी येथेच लिहिलेला "काही



ख्रिस्तीयान मार्टीन फ्रेन (१७८२-१८५१).

सामानिदच्या आणि बेवैखिदच्या नाण्यांचे वर्णन" हा निबंध लॅटीन टाईप उपलब्ध न झाल्याने अरब भाषेत प्रसिद्ध करण्यात आला. वोल्गा नदीकिनारी मोठ्या प्रमाणात सापडलेल्या सुवर्ण नाण्यांच्या संग्रहांनी सुवर्ण जमातीच्या काळाचा अभ्यास करण्यासाठी उत्कृष्ट साहित्य उपलब्ध करून दिले. या सुवर्ण भूमीवर सत्ता चालविणाऱ्या खानांची नावे मुद्रित करण्यात आलेल्या चारशेहून जास्त नाण्यांचे वर्णन फ्रेनने केलेले आहे. प्राचीन हस्तलेखांमध्ये यापैकी अनेक खानांचा काहीच उल्लेख आढळून येत नाही. आपल्या मायदेशी परत जाऊन रोस्तोक विद्यापीठामध्ये काम करण्याचा प्रस्ताव फ्रेनसमोर मांडण्यात आला होता.



यानसची प्रतिमा असलेले एक रोमन नाणे

परंतु आताच कुठे "बोलावयास" सुरुवात केलेल्या आपल्या या नाण्याना सोडून हा शास्त्रज्ञ जाऊ शकला नाही. पिटर्सबुर्ग-मध्येच राहण्याचा त्याने निर्णय घेतला. पूर्वेकडील नाण्यांनी फ्रेन आणि रशियाचे नाते जुळवून दिले. त्यांनी आपल्या नावात-देखील बदल करून ते काहीसे रशियन बनविले. आता त्याचे नाव होते ख्रिस्तिअन दानिलोविच.

"प्राचीन रशियन नाणी" हे ए. डी. चेर्तकोव या संशोधकाचे पुस्तक १८३४ मध्ये प्रसिद्ध झाले. प्राचीन रशियन नाण्यांच्या शास्त्रीय वर्गवारीचा पाया या पुस्तकाने घालून दिला.

अलेक्सेई वसिल्येविच ओरेशनिकोव (१८५५-१९३३) या संशोधकाची गणना प्रमुख रशियन मुद्राशास्त्रज्ञांमध्ये केली जाते. काळया समुद्राच्या उत्तरेकडील आणि प्राचीन रशियातील नाण्यांवर या शास्त्रज्ञाने अमूल्य संशोधन केले. इतर ऐतिहासिक दस्तऐवज, हस्तलेख, प्राचीन विद्वानांचे लेख इत्यादींशी नाण्यांचा तुलनात्मक अभ्यास करून ओरेशनिकोव यांनी दाखवून दिले की नाणी हा काही केवळ छंदाचा विषय नाही तर ते अत्यंत महत्त्वाचे ऐतिहासिक माहितीचे साधन आहे. या मुद्राशास्त्रज्ञाने आपल्या

"१५४७ पर्यंतची रशियन नाणी" या पुस्तकामध्ये रशियन नाण्यांची पुन्हा एकदा राज्य, शहर आणि राजांनुसार वर्गवारी केली. हे पुस्तक १८९६ साली प्रसिद्ध झाले. या संशोधनाच्या फलस्वरूप हजारो नाण्याना सूचीमध्ये कायमचे स्थान व ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले.

अशा प्रकारे मुद्राशास्त्राचा एक शास्त्र म्हणून जन्म झाला

मुद्राशास्त्र मुक्या नाण्याना कशाप्रकारे बोलावयास भाग पाडते ते आता आपण पाहू. या छोट्याशा पुस्तकामध्ये, अर्थातच, संपूर्ण मुद्राशास्त्राचा सविस्तर अभ्यास करता येणे शक्य नाही म्हणून काही उदाहरणेच आपण ध्यानात घेऊ.

प्राचीन जगातील देशांचा फेरफटका

प्रारंभीची नाणी

प्राचीन ग्रीस आणि रोममध्ये मुद्राशास्त्र अस्तित्वातच नव्हते. पहिल्या नाण्याच्या शोधाचा मान ग्रीक लोक आपल्या दंतकथातील वीराना देतात तर रोमन लोक यानस किंवा सॅटर्न या देवाना देतात. त्यांची अशी समजूत होती की दुतोंडी देवाच्या चेहऱ्याचे आणि वैरणीचे चित्र असलेली अतिप्राचीन नाणी यानसने समयदेवता सॅटर्नच्या सन्मानार्थ काढली होती. केवळ हेरोडोट आणि इतर काही प्राचीन शास्त्रज्ञांच्या साहित्यातच छोट्या आशियातील लिडिया राज्यात प्रथम नाणी पाडण्यात आल्याचा उल्लेख आहे. आता असे सिद्ध करण्यात आले आहे की त्या ठिकाणी अतिप्राचीन नाणी ख्रि. पू. ७ व्या शतकामध्ये अस्तित्वात आली व ती सोने आणि चांदीच्या मिश्रधातूपासून बनविण्यात आलेली होती.

काही दशकांचा काळ लोटला आणि ग्रीसमधील एगीना शहरात नाणी पाडण्यास सुरुवात झाली. लिडियामधील नाण्याशी तुलना करता ही नाणी संपूर्णपणे वेगळ्या स्वरूपाची होती व ती चांदीपासून बनविण्यात आलेली होती. यावरून असा तर्क करता येईल की एगीनामध्ये नाण्याचा शोध जरी उशिरा लागला असला तरी तो पूर्णपणे स्वतंत्र होता.

लिडिया आणि एगीनामध्ये नाणी अस्तित्वात आल्यानंतर संपूर्ण ग्रीसभर त्याच्या वसाहतीत, इराण, रोम आणि इतर ठिकाणी त्यांचा मोठ्या वेगाने प्रसार झाला.

भारत आणि चीनमध्ये नाण्यांचा उगम स्वतंत्रपणे झाला तर परंपरेनुसार चीनमध्ये तांब्याची छोटी नाणी इसवी सनापूर्वी साधारणपणे हजार वर्षे अस्तित्वात होती.

धातूंच्या नाण्यांचा उदय ही इतिहासामधील एक महत्त्वाची घटना होती. त्या त्या काळातील समाजांच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाच्या उच्च पातळीची प्रचिती या नाण्याद्वारे येते. त्याचप्रमाणे एखाद्या नाण्याचा उदय हे त्या राज्याचे प्रतिकात्मक चिन्ह ठरत असे. नाणे आहे याचा अर्थ त्या समाजाने राज्याची पातळी गाठली आहे असा होत असे. अर्थात, या आधारावर असे मात्र मुळीच म्हणता येणार नाही की नाणे नाही म्हणजे त्या समाजाला अद्यापि राज्याचा दर्जा प्राप्त झालेला नाही. नाणी नसलेली अनेक राज्ये पूर्वेकडे अस्तित्वात होती.

पूर्वेकडील राज्यांशी तुलना करता, ग्रीकमधील शहरे अधिक प्रगत होती. गुलामगिरीची पद्धतदेखील तेथे अधिक विकसित होती व सर्वत्र प्रसारित होती. प्राचीन ग्रीक व नंतर रोमने स्वीकारलेल्या गुलामगिरीच्या प्रथेमुळे प्राचीन राज्ये प्रगतीच्या अधिक उच्च व नवीन पातळीवर पोहोचली. परिणामतः ग्रीस आणि



एक अतिप्राचीन नाणे.

रोममध्ये नाणी पाडण्याच्या व्यवहारास जबरदस्त चालना मिळाली. अशा रीतीने आपणाला दिसून येते की नाणी एका अर्थी समाजाच्या सामाजिक दर्जाचे आणि समाजाच्या विकासाचे निर्देशक असतात.

मुद्राशास्त्राच्या मदतीने समाजाच्या इतिहासावर महत्त्वपूर्ण प्रकाश पाडला जातो.

नाण्यांचे प्रकार

नाण्याचा महत्त्वाचा व प्रमुख भाग म्हणजे त्यावर मुद्रित करण्यात आलेली माहिती – राज्यकर्ता किंवा राज्य करणारी जनता, देव किंवा पुज्य व्यक्ती इत्यादी विषयीची माहिती त्यांवरील लेख देतात. शेवटी नाणे हा धातूचा एक तुकडाच असतो व त्याचे वजन आणि धातूची शुद्धता ही शासनाद्वारे ठरविण्यात आलेली असते. नाण्यांवर शासनाद्वारे शिक्का मुद्रित करण्यात आलेला असतो व अशा प्रकारे ती कायदेशीर बनतात. हा शिक्का ती नाणी पाडणाऱ्या राज्याचा किंवा शहराचा असतो.

नाण्यांवर मुद्रित करण्यात आलेली प्रतिमा आणि मजकूर मुद्राशास्त्राच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असतात व त्या आधारावर नाण्याचा प्रकार ठरविण्यात येतो.



डेल्फीन माशाच्या आकाराचे नाणे.

प्राचीन ग्रीक नाण्यांवर अनेकदा ज्या शहरात ती पाडण्यात आलेली असत, त्या ठिकाणी पुज्य मानल्या जाणाऱ्या देवांच्या किंवा पवित्र समजल्या जाणाऱ्या प्राण्यांच्या प्रतिमा आढळतात. उदाहरणार्थ अथेन्समध्ये पाडण्यात येणाऱ्या नाण्यांवर या शहराच्या आश्रयकर्तीची म्हणजे अथीनाची प्रतिमा असे तर ऑलिंपियामध्ये पाडण्यात आलेल्या नाण्यांवर झेऊसची प्रतिमा आढळून येई.

ग्रीसच्या उत्तरेस काळया समुद्र किनाऱ्यावर असलेल्या ऑल्-वस नगरीत पाडण्यात येणारी नाणी प्रथम डॉल्फीन माशाच्या आकारासारखी होती व नंतर मात्र आपल्या नखांनी डॉल्फीनला फाडणाऱ्या गरुडाची प्रतिमा असलेली गोल नाणी पाडण्यात येऊ लागली.

याच किनाऱ्यावरील हेरसोनेस नावाच्या शहरात प्रचलित असलेल्या नाण्यांवर मरियम देवीची प्रतिमा होती. या देवीची या शहरात पूजा केली जाई. या प्राचीन शहरामधील नागरिक मरियम देवीसमोर आपण चांगले नागरिक बनू अशी शपथ घेत असत. या प्रतिज्ञेचा मजकूर उत्खननात सापडलेला आहे.



अथेन्सची चांदीची नाणी. नाण्याच्या एका बाजूवर अथेन्स देवीचे तर दुसऱ्या बाजूवर घुबडाचे चित्र आहे.

स्कायटिया येथील नाण्यांवर धनुधरि घोडेस्वाराचे चित्र आढळून आले आहे. ख्रि. पू. पाचव्या व चौथ्या शतकामध्ये स्कायटियावर राज्य करणाऱ्या अटेई राजाची ती प्रतिमा आहे. स्कायटिया राज्य अस्तित्वात होते या गोष्टीचाच हा पुरावा आहे असे म्हणावे लागेल. या दृष्टिकोनातून पाहता ऐतिहासिक शिलालेख आणि इतर हस्तलिखितांपेक्षा ही नाणी अधिक खात्रीदायक साधने ठरतात.

नाणी पाडणाऱ्या शहरांचा आणि राज्यांचा निर्देश करणारी इतरही काही चिन्हे आणि मुद्रा होत्या ज्या त्या त्या शहरांचा स्पष्ट उल्लेख करीत असत. ऑलंपस नगरीतील नाण्यांवर केवळ झेऊसचीच प्रतिमा नव्हती तर विजेचे चित्रदेखील होते. अथेन्समध्ये पाडण्यात येणाऱ्या नाण्यांवर देवतेच्या प्रतिमेव्यतिरिक्त घुबडाचे सुद्धा चित्र होते.



हेरसोनेसची चांदीची नाणी.

रोमन साम्राज्यातील नाण्यांवर देव-देवतांच्या प्रतिमांऐवजी सम्राटाचे चित्र असे व कधी कधी त्याच्या राजनीतीच्या प्रचारात्मक एखादे घोषवाक्य अथवा काही शब्द असत. आता नाणी एखाद्या शहराचे किंवा देव-देवतांचे नव्हे तर महान व प्रबळ साम्राज्यांचे आणि सम्राटांचे प्रतिनिधीत्व करू लागली.

दैनंदिन व्यवहारामध्ये निरनिराळ्या प्रकारची, अनेक शहरांची, वजनाने भारी व हलकी नाणी वापरात येऊ लागली. एका शहराच्या सोन्याच्या नाण्याची किंमत दुसऱ्या शहराच्या सोने व चांदीच्या मिश्रधातूपासून बनविलेल्या बऱ्याच नाण्यांइतकी होऊ लागली. काही प्रतिमा असलेल्या नाण्याना जास्त किंमत येऊ लागली कारण त्यांच्या धातूंची शुद्धता अधिक होती.

नाण्यांवरील सर्व चिन्हांचा आणि प्रतिमांचा व त्याचप्रमाणे नाण्यांच्या प्रकाराचा अभ्यास केल्यानंतर आपला सर्वप्रथम प्राचीन राज्यांच्या राजकीय परिस्थितीशी परिचय होतो. काही उदाहरणांचा आपण पुढे अभ्यास करूच. नाण्यांवरील प्रतिमांमध्ये

होणाऱ्या पारंपारिक बदलांमागे काहीतरी घटना असतेच. अनेकदा केवळ नाण्यांवरील प्रतिमांमध्ये झालेल्या बदलांच्या मदतीनेच आपणाला काही ऐतिहासिक घटनांची माहिती प्राप्त झालेली आहे. प्राचीन इतिहासकारांनी या घटनांसंबंधी लिहिले नसल्या-चेही आढळून आले आहे.

नाण्यांच्या प्रकारातील प्रत्येक बारीक-सारीक गोष्ट, त्यावरील मजकूर, प्रतिमा आणि राज्यकर्त्यांची चित्रे हे अमूल्य ऐतिहासिक पुरावे आहेत.

सिकंदरची नाणी

सिकंदर आणि त्याच्या कारकिर्दी विजयाची माहिती नाण्यां-द्वारा कशा प्रकारे मिळते ते आता आपण पाहू.

ख्रि. पू. चौथ्या शतकामध्ये ग्रीस आणि त्याच्या छोटचा-छोटचा राज्याना गंभीर सामाजिक व आर्थिक अडचणीना तोंड द्यावे लागले. त्याकाळी गुलाम, खाद्यपदार्थ या गोष्टींची टंचाई होती. वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न आ वासून उभा होता. या सर्व गोष्टींचा छोटचा राज्यांच्या अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होऊ लागला. या राज्यांचे आपआपसात वैर निर्माण होऊ लागले. या पेचप्रसंगातून बाहेर पडण्याचा मार्ग म्हणून युद्ध करून जिंकले-ल्या भूमीवर वसाहत स्थापन करण्याची धडपड ही राज्ये करू लागली. या युद्धाना आणि वसाहती स्थापन करण्याच्या प्रयत्नाना सिकंदरच्या वडिलांच्या – मॅकेडोनचा राजा – फिलीपच्या काळातच सुरूवात झालेली होती. सिकंदरने हे कार्य पुढे चालू ठेवले आणि आपल्या साम्राज्याचा कल्पनातीत विस्तार केला.

ख्रि. पू. ३३४ साली वसंतऋतूमध्ये हा बावीस वर्षाचा देखणा राजा हेल्लेस्पोंटसमोर उभा राहून आपले प्रचंड सैन्य कशा प्रकारे चाल करून विजय प्राप्त करीत पुढील वाटचाल

करीत आहे ते पहात होता. या प्रसंगाचे रेखाटन नाण्यांवर करण्यात आलेले होते.

मारमोरा समुद्रामधील प्रिन्स बेटांवर १९३० साली करण्यात आलेल्या उत्खननामध्ये ख्रि. पू. चौथ्या शतकामधील सोन्याच्या व इतर नाण्यांचा प्रचंड संग्रह आढळला. संशोधकांच्या मतानुसार ही नाणी असलेल्या पेटचा ख्रि. पू. ३३४ साली बंद करण्यात आल्या होत्या. या वेळी सिकंदरच्या फौजा चाल करून हेलेस्पोंड-मध्ये घुसलेल्या होत्या. सिकंदरच्या फौजांनी संपूर्ण समुद्रकिनारा व्यापला होता. त्यांची वाटचाल पुढे सतत चालू होती. घनघोर चकमकी उडत होत्या. अशा या परिस्थितीमुळेच एखाद्या व्यापाऱ्याला किंवा धनाढ्य व्यक्तीला आपल्या संपत्तीचा काही भाग अशा प्रकारे लपवून ठेवावा लागला असावा. त्या व्यक्तीने कदाचित असा विचार केला असावा की युद्ध संपताच बेटावर यावे व आपली संपत्ती पुन्हा गोळा करावी. परंतु या संपत्तीचा मालक मृत्युमुखी पडला असावा किंवा त्याला पेटचा पुरून ठेवलेली जागा सापडली नसावी. पण जवळजवळ २३०० वर्षे जमिनीत असलेली ही संपत्ती शेवटी शास्त्रज्ञांच्या हाती लागली.

सिकंदरच्या दहा वर्षांच्या युद्धाच्या कारकिर्दीने इतिहासाला एक वेगळेच वळण दिले. सिरीया, पॅलेस्टाईन, इजिप्त – पूर्वे-कडील या प्रदेशांवर त्याच्या फौजांनी विजय प्राप्त केला. हाव-हामेल येथे झालेल्या घनघोर लढाईमध्ये सिकंदरने पर्शियाच्या दारी राजाचा पराभव करून मध्य आशियाचा दक्षिणेकडील पूर्ण प्रदेश ताब्यात घेतला. या युद्धांच्या मोहिमेवरून परत आल्यानंतर त्याने बाबीलॉन येथे आपली राजधानी स्थापन केली आणि दुसऱ्या एका मोहिमेची तयारी करीत असतानाच त्याचा मृत्यु झाला. त्याच्या मृत्यूबरोबरच ग्रीसवादाला प्रारंभ झाला.

सिकंदरच्या वडिलांनी – राजा फिलीपने सुरू केलेल्या नाण्यांवर केवळ त्याचे नावच होते तर सिकंदरने सुरू केलेल्या नाण्यांवर लिहिण्यात येत असे: "राजा सिकंदर". ग्रीसमध्ये ही पद्धत नवी होती. ग्रीक लोक आपल्या राज्यकर्त्याचा उल्लेख अशा प्रकारे कधीच करीत नसत. या उल्लेखाद्वारे सिकंदरने आपल्या राजेशाही सत्तेची सर्वांना चांगलीच जाणीव करून दिली.

ग्रीक लोक पूर्वी पर्शियन सत्ताधिकाऱ्यांचा उल्लेख "राजा" असा करीत असत. सिकंदरने इराण जिंकल्यानंतर तेथील स्थानिक भाषा अवगत करून घेतली, पूर्वेकडील पद्धतीप्रमाणे कपडे घालण्यास सुरुवात केली, इतकेच नव्हे तर पूर्वेकडे आपले साम्राज्य बळकट व्हावे व आपणाला लोकप्रियता प्राप्त व्हावी या हेतूने त्याने बाक्तीरच्या राजकन्येशी लग्नदेखील केले. सिकंदरनंतरच्या सर्व ग्रीक राज्यकर्त्यांनी आपणाला राजा म्हणवून घेण्यास सुरुवात केली.

हाती असलेल्या अत्यंत प्रबळ सत्तेमुळे सिकंदरने जिंकून घेतलेल्या संपूर्ण अवाढव्य प्रदेशांमध्ये एकच नाणी सुरू केली. चांदीच्या नाण्यांवर त्याचे स्वतःचेच चित्र होते तर सोन्याच्या नाण्यांवर अथेन्स या देवतेची प्रतिमा होती. यापूर्वी ग्रीसमध्ये सर्व शहरे आपली स्वतःची नाणी पाडीत असत. पण आता राजाने मंजूर केलेल्या नमुन्याप्रमाणे व त्या वजनइतकीच सर्वत्र एकच नाणी पाडण्यात येऊ लागली. या छोटया छोटया शहरांच्या जीवनामध्ये जागतिक वर्चस्व प्राप्त करण्याचा ध्यास लागलेल्या राजेशाहीचा कशा प्रकारे शिरकाव झाला तेच यावरून दिसून येते.

चांदीची नाणी आपणाकरिता विशेष महत्त्वाची आहेत. त्यावर सिकंदरचे स्वतःचे चित्र आहे. त्याने स्वतःला देवाच्या



सिकंदरची प्रतिमा असलेले नाणे.

स्वरूपात प्रजेसमोर ठेवले व स्वत:चा आदर करण्यास भाग पाडले. त्याच्या मतानुसार यामध्येच त्याच्या सत्तेचा पाया होता.

सिकंदरनंतरच्या इतर सर्व ग्रीक राजांनी याच तत्त्वाचा वारसा घेतला. सर्वप्रथम सिकंदरने सिंहाचे कातडे अंगावर घेतलेल्या हेरॉकलची प्रतिमा असलेली नाणी पाडली. पण नंतर मात्र सिंहाच्या कातडयाच्या आवरणाखालील आपली चेहेरापट्टी मुद्रित केलेली नाणी सुरू केली. अशा प्रकारे त्याने या प्राचीन ग्रीक देवांची जागा घेतली.

सिकंदरच्या व्यक्तीमत्वाकडे बराच काळ लोटल्यानंतर पुन्हा एकदा लक्ष वेधले गेले. पश्चिमेकडील राष्ट्रांमध्ये सिकंदर आणि इस्कंदर यांच्याविषयीच्या कथांनी मध्ययुगामध्ये जन्म घेतला तर पूर्वेकडील राष्ट्रांमध्ये त्यांच्याविषयीच्या कथा २० व्या शतकात उदयास आल्या. सिकंदरच्या या अशा प्रकारच्या दीर्घकालीन स्मृतीची साक्ष आज नाणी देखील देत आहेत. सिकंदरच्या मृत्यूनंतर जवळजवळ पाचशे वर्षे लोटली. ख्रि. पू. चौथ्या शतकाच्या अखेरीस सिकंदरने जी नाणी ठरवून दिली होती, अगदी तशाच प्रकारची चांदीची नाणी दुसऱ्या शतकामधील रोमच्या सम्राटाने

व्यवहारात आणली. सिकंदरच्या कारकिर्दीनंतर ग्रीक साम्राज्याच्या दीर्घकालीन पर्वाला सुरुवात झाली.

ख्रि. पू. संपूर्ण चौथ्या शतकामध्ये मोठ्या प्रमाणावर प्रमुख सामाजिक-आर्थिक घडामोडी घडून आल्या. गुलामांची पिळवणूक, त्यांच्या मालकांची जुलूमशाही वाढू लागली. लोकांची लुबाडणूक करणाऱ्या एका वर्गाची निर्मिती झाली. राज्यकारभाराची प्रजासत्ताकीय पद्धती नष्ट झाली, राजेशाहीने तिची जागा घेतली. विज्ञान आणि तंत्रशास्त्राचा झपाट्याने विकास होऊ लागला. कट, सशस्त्र चकमकी, युद्धे, बंडे, रक्तपात यांनी संपूर्ण सामाजिक जीवन व्यापून गेले.

ग्रीसच्या या नव्या राज्यकर्त्यांची आपणाला ओळख करून देतात नाणी. सिकंदरनंतरच्या त्याच्या सुरुवातीच्या वारसदारांनी नाण्यांवर त्याच्यासारखे दिसण्याचा प्रयत्न केला. इजिप्तच्या प्तोलेमेई सोटेर या राजाने तर आपल्या नाण्यांवर अलेक्सांदर हे सिकंदरचे नाव मुद्रित केले होते. कधी कधी राजे सिकंदरचीच नक्कल करून नाण्यांवर स्वतःचीच सुंदर, तरुण व देवाच्या स्वरूपातील प्रतिमा मुद्रित करण्याचा आदेश देत असत. उदाहरणादाखल पॉन्टीच्या मिट्रीडेट एव्हपाटोर राजाचे नाणे घेऊ. हा राजा ख्रि. पू. दुसऱ्या शतकाच्या अखेरीस व पहिल्या शतकाच्या प्रारंभी छोट्या आशियावर राज्य करीत होता. प्रत्यक्षात हा राजा जुलमी, प्रबळ, संशयखोर, क्रूर आणि सुडाची भावना बाळगणारा होता. असे सांगितले जाते की त्याने आपल्या अत्यंत सहवासात असणाऱ्या नोकरांविरुद्ध मृत्युदंडाचे आदेश पूर्वीपासूनच तयार करून ठेवले होते – केव्हाही उपयोगी पडतील म्हणून! आपल्या विरुद्ध कट केल्याच्या संशयाने त्याने स्वतःच्या आईला, भावाला आणि बहिणीला ठार केले. लांब कुरळेकेस असलेली आणि आका-

शाकडे नजर असलेली त्याची प्रतिमा मुद्रित केलेली नाणी आज संग्रहात आहेत.

नाण्यांवरील प्रतिमांचे रेखाटन करणारे कलाकार अनेक वेळा या ग्रीक राजांचे स्वरूप वेगळ्या प्रकारे प्रकट करीत. कलेच्या विकासाच्या एकंदरीत स्वरूपामुळे चेहऱ्यातील साम्य, व्यक्तीमत्वाच्या प्रतिबिंबामागील मनोवैज्ञानिकता आणि प्रत्यक्ष परिस्थितीच्या वर्णनामधील वास्तवता या गोष्टींना विशेष महत्त्व प्राप्त झाले. राजांच्या डामडौल आणि दिमाखीपेक्षा कलेचे हे स्वरूप व कलाकारांकडून केल्या जाणाऱ्या या अपेक्षा अधिक वरचढ ठरल्या. त्या वेळच्या उत्कृष्ट कलाकारांनी अत्यंत क्रूर वास्तवतेचे नाण्यांवर रेखाटन करून त्यांच्या कडून केल्या जाणाऱ्या अपेक्षांची पुर्तता केली.

ही नाणी आज आपल्या दृष्टीने अत्यंत मौल्यवान ठरतात, कारण ती महत्त्वाच्या ऐतिहासिक साहित्याच्या स्वरूपात आपणासमोर आहेत.

उदाहरणादाखल एका दुर्बळ अशा राज्याचा इतिहास घेऊ. या राज्याच्या राज्यकर्त्यांनी काढलेल्या नाण्यांवर जणू काही सारा काही इतिहास सांगण्यात आला आहे.

हेलेनिअन कालखंड

ख्रि. पू. तिसऱ्या शतकाच्या मध्यंतरी मध्य आशियाच्या वाळवंटी प्रदेशात आणि अमुदरिया नदीच्या वरच्या पात्राजवळ ग्रेको-बाक्ट्रीया नावाचे राज्य उदयास आले. स्थानिक रहिवासी आपल्या देवांच्या पूजेबरोबरच ग्रीक राज्यकर्ते, ग्रीक संस्कृती आणि कला यांचा आदर करू लागले व त्यामुळे एक नवे ऐति-



प्राचीन बाक्ट्रीयामधील नाणी. या नाण्यांवर एवक्राटीड व अन्टीमाख या राजांच्या प्रतिमा आहेत.

हासिक पर्व सुरू झाले. परंतु ख्रि. पू. तिसऱ्या आणि दुसऱ्या शतकातील या ग्रेको-बाक्ट्रीया राज्यासंबंधी प्राचीन इतिहासकारांनी फारच कमी लिहिले आहे. त्यामुळे आपल्या मदतीला धावून येतात ती नाणी.

केवळ नाण्यांच्या मदतीनेच आपण या राज्याच्या कारकिर्दीसंबंधी व त्याच्या राज्यकर्त्यांविषयी माहिती मिळवू शकतो.

ग्रेको-बाक्ट्रीया राज्याच्या संस्थापकाचे – पहिल्या डिओडोटचे – चित्र एका मोठ्या चांदीच्या नाण्यावर मुद्रित करण्यात आलेले आहे. लांब नाक, भव्य कपाळ, कुरळे केस आणि शक्तिशाली मान असलेल्या या बुद्धिमान, महत्त्वाकांक्षी व्यक्तीने इतर राजांविरुद्ध बंड करून ग्रीक साम्राज्यापासून दूरवर संपन्न अशा बाक्ट्रीया प्रांतामध्ये स्वतःचे राज्य स्थापन केले. परंतु सिकंदरच्या असंख्य वारसदारांपैकी एक, अन्टीओख राजा पासून वेगळे

3–1187

होऊन देखील डिओडोट राजाने नाण्यांवर आपले स्वतःचे नांव लिहिण्याचा विचार टाळलेला दिसतो. नाण्यावर आपल्या प्रतिमे-खाली त्याने "राजा अन्टीओख" असे लिहिले. या नाण्याच्या दुसऱ्या बाजूस वीज आणि गरुड पक्षी हातामध्ये घेतलेल्या झेऊसचे चित्र होते. डिओडोट या देवाची उपासना करीत होता. बहुतेक त्याने प्रथम या देवाचा पुतळा तयार करून घेतला असावा व नंतर त्याची नाण्यावर प्रतिमा मुद्रित केली असावी. त्याच्या स्वतःच्या नावाचा – "डिओडोट"चा – अर्थदेखील 'देवाने दिलेला' असा होतो.

पहिल्या डिओडोटच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा दुसरा डिओ-डोट सिंहासनावर बसला. ख्रि. पू. २३० ते २२५ – फक्त पाचच वर्षे त्याने राज्य केले. आता आपल्यासमोर दुसरे नवे नाणे आहे. त्यावर चित्र आहे देखण्या, आपल्या वडिलांप्रमाणेच लांब व बांकदार नाक असलेल्या, हसऱ्या तरुण राजाचे – दुसऱ्या डिओ-डोटचे. या नाण्यांच्या दुसऱ्या बाजूवर देखील गरुड पक्षी व वीजे सह झेऊस देवाचे चित्र दिसते. परंतु या नाण्यांवर मात्र मुलाने आपले नाव लिहिले होते – डिओडोट. कालांतराने या स्वतंत्र राज्याचे वेगळेपण देखील नष्ट झाले.

एव्हतीदेम नामक दुसऱ्या एका ग्रीक राजाने दुसऱ्या डिओडो-टची राज्यसत्ता उलथून टाकली. नाण्यावरील देव मात्र डिओडो-टच्या मदतीला धावून येऊ शकला नाही. एव्हतीदेम राजाने नाण्यांवर हॅरक्यूलसची प्रतिमा मुद्रित करावयास सुरुवात केली. आपल्या शक्तिशाली गदेसह लेटलेल्या हॅरक्यूलसचे चित्र या नाण्यां-वर दिसून येते. कदाचित् चौथ्या शतकातील महान ग्रीक शिल्प-कार लिसीप्पने बनविलेल्या हॅरक्यूलसच्या पुतळ्याचीच ही प्रति-कृती आसावी. या नाण्यांवर जाड नाक, बांकदार भुवया आणि

खोलवर डोळे असलेल्या राजाची प्रतिमा आहे. एव्हतीदेमने बाक्ट्रीयावर तीस वर्षांहून जास्त काळ राज्य केले. त्याच्या कारकिर्दीच्या अखेरच्या काळातील नाण्यांवर आता नजर टाकू. या काळात राजामध्ये केवढा प्रचंड बदल घडून आलेला दिसतो! या वेळेच्या नाण्यांवर दिसून येतो त्याचा जाडजूड, चरबीने थपथपलेला, वेड्यावाकड्या ओठांचा, सुरकुत्यांनी व्यापलेला चेहरा. तथापि, आपल्याकरिता अज्ञात राहिलेल्या त्या काळातील महान कलाकारांनी अतिशय प्रभावीपणे त्याच्या चेहऱ्यावर राज्यकर्त्याचा, सत्ताधिकाऱ्याचा भाव व्यक्त केला आहे.

एव्हतीदेमचा वारसदार बनलेल्या बाक्ट्रीयाच्या नव्या राजाचा – देमेत्रीयचा – चेहरा, नजर व एकंदरीत बाह्य स्वरूप त्याच्या वडिलांसारखेच होते हे त्याने काढलेल्या नाण्यांवरील चित्रावरून दिसून येते. डोक्यावर त्याने प्रचंड सुळे असलेल्या हत्तीचे तोंड शिरस्त्राणाप्रमाणे घातले आहे – भारतावर यशस्वीरित्या काढलेल्या मोहिमेची ही जणू काही साक्षच. आपल्यापेक्षा सर्वबाबतीत श्रेष्ठ असलेल्या सिकंदरप्रमाणे बनण्याची हा राजा महत्त्वाकांक्षा बाळगून होता. म्हणूनच अनेकदा, अर्थात त्याच्या मृत्यूनंतर, नाण्यांवर सिकंदरप्रमाणेच शिरस्त्राण घातलेली त्याची प्रतिमा आढळून येते. देमेत्रीयने सुरू केलेल्या या नाण्यांच्या दुसऱ्या बाजूवर सिंहाचे कातडे व गदा घेतलेल्या हॅरक्यूलसची प्रतिमा दिसून येते. परतु हॅरक्यूलसच्या डोक्यावर मुकुटाच्या स्वरूपात मित्रा या स्थानिक इराणी सूर्य देवाचे शिरस्त्राण आहे, ग्रीक साम्राज्याच्या काळामध्ये ग्रीक संस्कृतीची आणि ग्रीक देवांची मध्य आशियन आणि इराणी संस्कृतीशी व देवांशी मिसळणूक झाली आणि परिणामी मिश्र देवांचा जन्म झाला. दूरवरील पूर्वेकडील देशावर राज्य करणाऱ्या देमेत्रीय या ग्रीक राजाने सुरू केलेल्या नाण्यांवर

अशाच प्रकारचा एक देव हॅरक्यूलस-मित्रा आपणाला आढळून येतो.

देमेत्रीयनंतर अन्तीमाह सिंहासनावर आरुढ झाला. त्याच्या चित्रावरून दिसते की तो तरुण आणि विद्वान होता. ही माहिती-देखील आपणाला फक्त नाण्यामुळेच प्राप्त झाली आहे. किंचितसा हसरा चेहरा आणि झोपाळू डोळे असलेल्या या राजाने देखील आपल्या कारकिर्दीत युद्ध करून शेजारचे फेरगाना राज्य व त्या पलीकडील भटक्यांचे राज्यदेखील काबीज केले. त्याने सुरू केलेल्या नाण्याच्या दुसऱ्या बाजूवर नैसर्गिक जलआपत्तीच्या रक्षकाचे – पॉसीडॉन देवाचे – चित्र होते. या वंशाचे दैवत असलेल्या हॅरक्यूलसचे चित्र का नाही? पॉसीडॉनचे चित्र का? शास्त्रज्ञांचा असा तर्क आहे की अमुदरीया किंवा इंडस नदीमधील एखाद्या मोठ्या विजयाच्या स्मरणार्थ या सागरी दैवताची प्रतिमा नाण्यांवर चित्रीत करण्यात आली असावी.

आता दुसऱ्या एवतीदेमच्या काळामध्ये चांदीपासून बनविलेले टेट्राहमाचे नाणे पाहू. त्यावर मित्राप्रमाणेच हॅरक्यूलसची मुकुटधारी, हातात फुलांची माळ घेतलेली प्रतिमा आहे. याद्वारे एवतीदेमला जणू काही स्पष्ट करावयाचे होते की तोच आपल्या वडिलांचा आणि आजोबांचा – देमेत्रीय राजाचा आणि पहिल्या एवतीदेमचा – कायदेशीर वारस आहे. दुसऱ्या एवतीदेमची कारकीर्द काही दीर्घकाळ नव्हती, त्याच्या राज्यकारभारासंबंधीची माहिती उपलब्ध नाही. परंतु उपलब्ध असलेल्या नाण्यांवरून दिसून येते की तो दुर्बळ, सर्वसाधारण रागीट आणि असमाधानी वृत्तीचा होता.

आपणाला या सर्व गोष्टी जाणून घेण्याची जरूरी का आहे? फार पूर्वी होऊन गेलेल्या या राजांचे चेहरे न्याहाळण्याची, नाण्यां-

वरील स्वतःची स्तुती करणारे खोटे शब्द वाचण्याची, त्यांच्या जीवनाची माहिती करून घेण्याची काय आवश्यकता आहे? कुणाला त्याची गरज आहे? इतिहासाला हे सर्व जाणून घेण्याची जरूरी आहे. जितक्या खोलवर आपण या राजांचा, त्यांच्या जीवनाचा, त्यांच्या वृत्तीचा अभ्यास करू, तितक्याच अचूकतेने आणि सविस्तरपणे आपण एकंदरीत ऐतिहासिक नियमांची माहिती करून घेऊ शकतो.

आपणाला ठाऊक आहे की गुलामांचे श्रम आणि स्वतंत्र लोकांच्या परोपजीवी जीवनावर आधारित प्राचीन जगामध्ये अनेकदा अत्यंत गंभीर समस्या निर्माण होत होत्या: गुलामांची बंडे, उठाव, उत्पादनात घट, अत्यंत गंभीर स्वरूपाची अंतर्गत युद्धे, क्रूर अतिक्रमणे... या सर्व गोष्टींवर मात करण्यासाठी प्राचीन जगाला सर्व शक्ती एके ठिकाणी, एखाद्या सिकंदरसारख्या सम्राटाच्या आणि त्याच्या साम्राज्याच्या स्वरूपात एकवटावी लागली.

या सर्व ग्रीकबाक्ट्रियन राजांच्या इतिहासाच्या तुलनेने ग्रीक राजांच्या कारकिर्दीचा दीर्घकाळ काहीच नाही.

हे शतक सर्व दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे, अमूल्य असे पर्व होते. याच काळात असंख्य पंथांचा आणि वैयक्तिक समाजांचा उगम झाला. राजांना देवाप्रमाणे मानले जाऊ लागले. त्यांचे नाते सरळ सरळ अपोलो, डिओनिस आणि हॅरक्यूलस सारख्या देवांशी जोडले जाऊ लागले परंतु याच वेळी देवावरील विश्वास मात्र वाढत गेला. कोणत्याही परिस्थितीत राजा शक्तिशाली असलाच पाहिजे असे त्या वेळचे लोक समजत असत.

नाण्यांशिवाय इतर कुणीही त्या वेळच्या या राजांच्या स्वरूपाचे, स्वभावाचे वर्णन स्पष्टपणे व यथार्थपणे केलेले नाही.

भूतकाळातील घटनांचा नाण्यांकडून सादर केला जाणारा पुरावा

प्राचीनकालीन लेखकांची हस्तलिखिते व पुराणवस्तु संशोधनातून प्राप्त झालेल्या माहितीमध्ये नाणी नव्या माहितीची भर घालतात. नाण्यांवर असलेल्या प्रतिमांची आपण प्राचीन कला, वस्तूंशी तुलना करू शकतो. फलस्वरूप आपणाला भूतकाळाची वास्तविक कल्पना येते. प्रत्येक सत्यघटनेला आणि प्रत्येक बारीकसारीक गोष्टीला इतिहासामध्ये स्वतःचे योग्य स्थान असते आणि त्या एकमेकीची साक्ष देत असतात.

रोमन साम्राज्यकालीन नाण्यांवर पुष्कळदा एखाद्या उत्सवाचे, खेळाचे, प्राचीन कथातील एखाद्या प्रसंगाचे चित्रण केले जात असे. प्राचीन जीवनाची आणि धर्माची माहिती करून घेण्यामध्ये ही नाणी मोठी मदत करतात. अनेकदा रोमन नाण्यांवर प्राचीन रोमच्या इतिहासातील काही घटनांचे चित्रण केल्याचे दिसून येते. रोम शहर कशा प्रकारे वसविले गेले याचे वर्णन करणारे चित्रण काही नाण्यांवर आढळून आले आहे. या नाण्यांवर रोमुल आणि रेम या जुळया भावंडांचे आणि लांडग्याचे चित्र आहे. त्यांच्या शेजारीच ही जुळी भावंडे ज्या धनगरास सापडली त्याचे देखील चित्र आहे. अशाच एका नाण्यावर प्राचीन रोममधील एका संस्थेत चालू असलेल्या मतदानाचे तर एका नाण्यावर शूर वीर एनेयने ट्रॉयमधून केलेल्या पलायनाचे चित्रण आहे. सुल्ला या हुकूमशहाच्या स्मरणार्थ त्याच्या मुलाने नाण्यांवर कैदी युगुर्ताला मॉरीटानीयाचा राजा बोख सुपूर्द करीत असल्याचे चित्र आहे. या प्रसंगावरून सुल्लाने युगुर्ताविरुद्धच्या लढयामध्ये प्राप्त केलेल्या नेत्रदिपक विजयाचीच साक्ष पटते.

खि. पू. १२९ सालातील एक रोमन नाणे – दीनार. रोमूल आणि रेम या जुळया भावडांव्यतिरिक्त नाण्यावर फावस्टूक या धनगराची प्रतिमा पहावयास मिळते.



ऐतिहासिक घटनांचे नाण्यांवरील चित्रण अनेकदा प्रतिकात्मक असल्याचे दिसून येते. उदाहरणार्थ, ताड वृक्षावर रडत असलेल्या युदे स्त्रीच्या प्रतिमेद्वारा रोमन सम्राटाने जेरुसलेमच्या केलेल्या नाशाचे वर्णन काही नाण्यांवर आढळून आले आहे.

रोमने जिंकून घेतलेल्या व क्रूरपणे पिळवणूक केली जात असलेल्या काही प्रांतांनी बंड करून रोम ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला असल्याचे काही नाणी सांगतात. खि. पू. ९०-८८ या काळात तथाकथित "रोमच्या दोस्तराष्ट्रांनी" इटलीच्या महा-द्विपामध्ये आपल्या विजेत्याविरुद्ध युद्ध पुकारून काही नाणी पाडली. या नाण्यांवर रोमनचे प्रतिक असलेल्या लांडग्याविरुद्ध लढत असलेल्या इटालियन बैलाचे चित्र आहे. भोळेपणाने का होईना पण अतिशय प्रतिकात्मकरित्या रोमच्या शत्रूंनी आपल्या ध्येयाची नाण्यांवरील चित्राद्वारे कल्पना दिली.

रोमन साम्राज्याचा संस्थापक सिझरच्या काळातील रोमम-धील तणावपूर्ण सामाजिक लढयाची साक्ष पटवून देणारी नाणी आज आपल्या हाती आहेत. रोमचे सामर्थ्य टिकवून ठेवून त्याला



एक सिराकुस नाणे. आपल्या उत्कृष्ठ कलात्मकतेबद्दल या नाण्यांना मोठे महत्त्व दिले जाते.

अधिक बळकटी प्राप्त करून देण्याचा एकमेव मार्ग म्हणजे साम्राज्याची स्थापना करून सर्व शक्तीचे एका संयुक्त सत्तेखाली केंद्रीकरण करणे ही भूमिका सिझरची होती. आपले चित्र, नाव व शक्तीचे प्रतिक असलेल्या हत्तीची प्रतिमा असलेली नाणी त्याने सुरू केली. त्याच्या शत्रूने, प्रतिस्पर्धी गटातील एका नेत्याने— ब्रुटने त्याचा खून केला. वेगवेगळी पूर्वीची स्वतंत्र प्रजासत्ताके ठेवण्याला पाठिंबा देणाऱ्या या सिझरच्या हत्याकाराने नवी नाणी सुरू केली. दोन खंजीरासह असलेले शिरस्त्राणाचे चित्र स्वातंत्र्याचे प्रतिक होते व सिझरच्या खुनाचे स्मरण करून देत होते. कोणाच्याही मनात शंका राहू नये म्हणून त्यावर लिहिले होते: "इडी मार्ना"—म्हणजेच सिझर मारला गेलेला दिवस.

ही नाणी स्पष्टपणे दाखवून देतात की रोमन राज्यकर्त्यांना हजारो लोकांच्या हातातून प्रवास करणाऱ्या या नाण्यांचे प्रचाराच्या दृष्टीने असलेले महत्त्व चांगलेच ठाऊक होते. आपली ऐपत, सत्ता, साम्राज्य व आपले अधिकार यांची संपूर्ण प्रजेला माहिती करून देण्यासाठी, त्यांचा प्रचार करण्यासाठी या काळचे सम्राट नाण्यांचा यथायोग्य उपयोग करून घेत असत.

नाण्यांच्या अभ्यासाद्वारे आपणाला केवळ राजकीय इतिहासासंबंधीचीच माहिती प्राप्त होते असे नव्हे तर, कलेच्या इतिहासाचा अभ्यास करणाऱ्या संशोधकाना पण मुद्राशास्त्रज्ञ मोठी मदत करतात.

डाव्या हातावर डिओनिस घेतलेल्या हेरमेसचा ख्रि. पू. चौथ्या शतकातील महान ग्रीक शिल्पकार प्राकसितेलने बनविलेला पुतळा आपल्या स्मरणात असेलच. हेरमेस कसा उभा होता? या हातात काय होते? जोपर्यंत अन्खील शहराचे नाणे आपल्या हातात नव्हते वरील प्रश्नांची उत्तरे आपणाला देता येत नव्हती. या नाण्यावर हेरमेसची अगदी सुरुवातीची प्रतिमा होती: आपल्या उंचावलेल्या हातात द्राक्षांचा घड असलेली फांदी घेऊन तो ती छोटचा दिओनिसला दाखवित होता.

पॅरिसमधील लुव्र वस्तुसंग्रहालयामध्ये विजयदेवतेचा संगमरवरी दगडांपासून बनविलेला सुंदर पुतळा आहे. हा पुतळा केव्हापासून अस्तित्वात आहे आणि कोणत्या घटनेच्या स्मरणार्थ त्याची उभारणी करण्यात आली? या प्रश्नाचे उत्तर दिले ते ख्रि. पू. चौथ्या शतकातील मॅकीडोनच्या देमेत्रीय पोलिओरकेट राजाच्या काळातील नाण्यांनी. या नाण्यांवर अगदी तशाच प्रकारची देवता सागरी जहाजावर उभी असल्याचे दृश्य आहे. यावरून असे आढळून आले की ख्रि. पू. ३०६ साली देमेत्रीय राजाने सायप्रसमधील सालामीन येथे राज्य करणाऱ्या प्टोलेमेय राजावर मिळविलेल्या सागरी विजयाच्या स्मरणार्थ विजयदेवतेचा संगमरवरी पुतळा बनविला होता. तोच सध्या लुव्रमध्ये आहे ही घटना इतिहासकाराना अर्थातच ठाऊक होती, पण तिचा लुव्र इथल्या पुतळयाशी असलेला संबंध मात्र त्याना काही जोडता आला नाही. केवळ ही नाणी सापडल्यानंतरच हे शक्य झाले.



ख्रि. पू. ४५ सालातील एक रोमन दीनारचे नाणे – टिता करीजीया. नाण्याच्या एका बाजूवर यूमोनाची प्रतिमा व 'नाणे' हा शब्द आहे तर दुसऱ्या बाजूवर नाणी पाडण्यासाठी वापरली जाणारी हत्यारे दिसत आहेत.

प्राचीन वास्तुकलेच्या अभ्यासामध्ये मुद्राशास्त्राने मोठी मोलाची मदत केलेली आहे. नाण्यांवर कितीही छोट्या आकारात प्राचीन वास्तूंचे चित्रण करण्यात आले असले तरीही उध्वस्त झालेल्या प्राचीन वास्तूंच्या पुनर्‌उभारणीमध्ये ही नाणी मदत करतात.

रोमन सम्राटाने अथेन्स येथे पाडलेल्या एका नाण्यावर अथेन्सच्या अक्रोपोलच्या पार्श्वभूमीवर दिओनिस रंगमंदिराचे चित्र आहे. अक्रोपोलच्या टेकडीवर जेव्हा पुराणवस्तुसंशोधकांनी उत्खनन केले तेव्हा त्यांचे लक्ष या नाण्यांकडे गेले. या टेकडीवर वास्तु कशा पद्धतीने उभ्या होत्या हे ध्यानात घेता दिओनिस रंगभूमीच्या वास्तूचा शोध टेकडीच्या कोणत्या बाजूकडून सुरू करावयाचा ते ठरविता आले. नाण्यांच्या मदतीने ही उत्कृष्ट प्राचीन कला आणि सांस्कृतीचे प्रतिक असलेली वास्तु शोधून काढणे शक्य झाले.



सिराकुज नाण्यावरील अरेतुसची प्रतिमा.



दिमीत्रेय पलीओरकेटने सुरू केलेले एक नाणे. नाण्यावरील गलबतावर निकाची प्रतिमा दिसत आहे.

१८ व्या शतकातील विख्यात ब्रिटिश इतिहासकार गीब्बोन यांनी लिहिले आहे की दुसऱ्या शतकातील रोमन सम्राट आद्रिआनच्या प्रवासासंबंधीची माहिती देणारी हस्तलिखिते अथवा लिखित पुरावा जरी आपल्या हातात मुळीच आला नसता, तरीही मुद्राशास्त्राच्या आधारावर याविषयी बरेच काही सांगता आले असते. प्राचीन नाणी अत्यंत माहितीपूर्ण असतात या गोष्टीची ही मान्यताच नव्हे काय?

नाण्यांची रेखिवता, त्यावरील चित्रांचा प्रभावीपणा, त्यावरील नाजुक काम, साधी परंतु सुंदर रचना या गोष्टींमुळे काही नाणी अमूल्य ठरतात. ख्रि. पू. पाचव्या शतकातील सिसिलीयाची नाणी विशेष महत्त्वपूर्ण आहेत. या नाण्यांवर शर्यतीमध्ये भाग घेण्यासाठी तयार असलेल्या रथांचे चित्र आहे.

नाणी पाडणाऱ्या कलाकारांमध्ये एवेनेत आणि किमोन हे दोन कलाकार विशेष प्रसिद्ध आहेत. या दोघांनी बनविलेले प्रत्येक नाणे कलेचा उत्कृष्ट नमुना होय.

मायकेलअँजेलो सिसिलियन आणि ग्रीक नाण्यांवरील कलेचे कौतुक करीत असे. प्रसिद्ध कवी गेएटेने या नाण्यांबद्दल लिहिले आहे की, "ही सुंदर नाणी म्हणजे वसंतऋतूमधील अनंत फुलांचा बहार आहे, ही नाणी कलेची स्वादिष्ट फळे आहेत."

उत्खननात सापडलेल्या नाण्यांचे आरेखन


नाण्यांचा अभ्यास करण्यासाठी मुद्राशास्त्रज्ञ नेहमी नाणी ज्या ठिकाणी सापडली त्या प्रदेशाचा नकाशा तयार करतात. या नकाशावरून व्यापारी संबंध, नाण्यांचा प्रसार, एखाद्या राज्यातील व्यापाराचा विकास, त्या राज्याची आर्थिक परिस्थिती इत्यादी गोष्टींची माहिती प्राप्त होते. प्राचीन जगातील अत्यंत महत्त्वाचे आणि कधी कधी व्यापार व अर्थव्यवस्थेसंबंधी माहिती पुरविणारे एकमेव साधन म्हणजे नाणी.

उदाहरण म्हणून रोमन साम्राज्याच्या काळातील अनेक नाणी ज्या ठिकाणी सापडली त्या आधारावर तयार करण्यात आलेला नकाशा पाहू. उत्तर आफ्रिका, युरोपचा प्रमुख भाग, पूर्व युरोप (विशेषतः युक्रेन), भारत आणि उत्तर आशिया या ठिकाणी ही नाणी आढळून येतात. व्यापारी संबंधांच्या झालेल्या प्रचंड विकासाची साक्षच या नाण्यांद्वारे पटते.

रोमन साम्राज्याच्या चांदीच्या नाण्यांच्या प्रतिष्ठेविषयी प्राचीन ग्रंथकारांनी जे काही लिहिले आहे त्या सर्व गोष्टीना या नकाशामुळे पुष्टीच मिळते. प्राचीन काळी असे समजले जात

असे की नाण्यांचा हा प्रसार देवांच्या रोमवर असलेल्या कृपादृष्टीचे प्रतिक आहे. प्लिनी या ग्रंथकाराने लिहिले आहे की पहिल्या शतकामध्ये गुलामगिरीमधून सुटका करून घेतलेली एक व्यक्ती सागरी वादळात सापडली व जोरदार वाऱ्याच्या प्रवाहामुळे त्याची होडी भारताच्या किनाऱ्याला लागली. भारतात ती व्यक्ती त्या ठिकाणच्या स्थानिक राजाकडे गेली. आपल्या जवळची निर-निराळया रोमन राज्यकर्त्यांच्या प्रतिमा असलेली विविध नाणी त्या व्यक्तीने राजाला दाखविली. सर्व नाण्यांचे वजन एकसारखे होते. ती नाणी पाहून राजा आश्चर्यचकित झाला आणि लागलीच त्याने या महान प्रबळ राष्ट्राबरोबर संपर्क प्रस्थापित करण्याच्या हेतूने आपला वकील रोमच्या दिशेने धाडला. या राजाला आपल्या आर्थिक अडचणींमुळे कायम आपल्या नाण्यांच्या वजनात घट करावी लागत होती. त्यामुळे समान वजनाची निरनिराळी रोमन नाणी पाहून हा देश बलाढ्य असावा असे त्याला वाटणे साह-जिकच होते. राजाचे वकील रोमच्या सम्राटाच्या – क्लाव्डीय-च्या दरबारात येऊन पोहोचले.

आपणाला ठाऊकच आहे की रोम छोट्या छोट्या प्रांतावर प्रचंड कर लादून त्यांची पिळवणूक करीत होते, आपल्या सैन्याच्या जोरावर अनेक देशाना त्याने जणू काही गुलामगिरीत जखडून टाकले होते, त्यांच्यावर आपली संस्कृती, सामाजिक पद्धती लादली होती. परिणामी गुलामगिरीच्या पद्धतीमुळे एका नव्या प्रकारच्या संस्कृतीचा उदय झाला. गुलाम या पद्धतीचा मोठा द्वेष करीत होते व शेवटी त्यांनीच ही पद्धत नष्ट केली. या संस्कृ-तीचे एकंदरीत स्वरूप, वित्त व्यवहार, व्यापारी उलाढालीचा विकास, प्रादेशिक विस्तार इत्यादी गोष्टींची माहिती आपणाला मुद्राशास्त्राच्या सहाय्यानेच प्राप्त होते.



रोमन नाण्यांचा प्रसार.

अशा प्रकारे आपणाला दिसून येते की प्राचीन जगाने आपल्यासाठी राखून ठेवलेली नाणी आपणाला भूतकाळातील अनेक घटनांची माहिती देतात, त्या वेळेच्या समाजाच्या निरनिराळ्या

अंगाचे अचूक वर्णन करतात. प्राचीन कला, संस्कृती आणि राजकीय पद्धतींचे स्वरूप नाण्यांमधून उत्कृष्टरित्या प्रतिबिंबित होते.

मध्ययुगीन नाणी

मध्ययुगीन युरोपमधील पहिली नाणी

जेव्हा गुलामांच्या रोमन साम्राज्याच्या पूर्व आणि पश्चिमेकडील भाग ताब्यात घेतलेल्या गून आणि टयूटनांच्या असंख्य टोळयांपुढे रोमने हार खाल्ली तेव्हा युरोपमधील नाण्यांच्या व्यवहारामध्ये प्रचंड मंदी आली. सुरुवातीला व्यापार-व्यवहारामध्ये जुनी रोमन नाणी वापरात येत होती. या नव्या छोटया छोटया राजाना नाण्यांचे कोणतेही सोयरे सुतक नव्हते. रोमची किंवा इतर कोणतीही नाणी वापरण्यात त्याना कोणतीच अडचण वाटत नसावयाची.


या राजांच्या दृष्टीने एकच गोष्ट महत्त्वाची होती. आणि ती म्हणजे नाण्यांवर त्यांच्या नावाच्या सुरुवातीची अक्षरे मुद्रित करणे. अशा रीतीनेच उध्वस्त रोमन शहरांच्या ठिकाणी इटलीमध्ये नव्या राज्याची स्थापना केलेल्या टयोडोरिख राजाच्या नाण्यांवर रोमन सम्राटाची प्रतिमा आहे व दुसऱ्या बाजूवर खुद्द टयोडोरिखच्या नावाची आद्याक्षरे आहेत. नाण्यांची कलात्मकता, त्यांचे प्रचाराचे एक साधन म्हणून असलेले महत्व या गोष्टींकडे या राजांचे मुळीच लक्ष नव्हते. रोमच्या राजा महाराजाना नाण्यांसंबंधीत ज्ञान होते. त्या गोष्टींबाबत मध्ययुगीन जर्मन राजे पूर्णतः अज्ञानी होते. या राजांनी सुरू केलेली नाणी अगदी ओबडधोबड आणि प्राचीन नाण्यांच्या तुलनेने फारच "पुरातन"

होती. खरे पाहता आद्ययुगातून मध्ययुगाकडे आणि गुलामगिरी पद्धतीतून सरंजामशाहीकडे होणाऱ्या संक्रमणाच्या काळातील एकंदरीत रुची आणि संस्कृतीच अशी होती.

मध्ययुगीन प्रारंभीची नाणी जरी बरीचशी कलाहीन व ओबडधोबड असली तरी मुद्राशास्त्राच्या आणि इतिहासाच्या दृष्टीने असलेले त्यांचे महत्त्व मुळीच कमी होत नाही. या काळातील काहीशा क्रूर अशा या राजांच्या आणि ख्रिश्चन धर्ममंदिरांच्या दरम्यानच्या अन्योन्य संबंधांची म्हणजेच या काळाच्या राजकीय, सामाजिक आणि धार्मिक-नैतिक स्वरूपाची कल्पना आपणाला नाण्यांवरून येते.

हे राजे स्वतःला ख्रिश्चन समजत असत. परंतु हे कशा प्रकारचे ख्रिश्चन होते? मेरोविंगच्या टच्यूडोबेर्ट राजाच्या नाण्यांवर क्रूस घेतलेल्या देवदूताचे चित्र दिसून येते. सहाव्या आणि सातव्या शतकामध्ये उदयास आलेल्या प्रारंभीच्या मध्ययुगीन राज्यांमधील ख्रिश्चन धर्माकडे पाहता मूर्ति पूजा पद्धतीचीच आठवण येते. या उलट तिसऱ्या आणि चौथ्या शतकातील रोमन साम्राज्यामध्ये धार्मिक शिकवणीला महत्त्व होते.

मेरोविंगच्या ह्लोदविग राजाने ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केलेला होता. एकदा अलेमान टोळ्यांबरोबर युद्ध चालू असताना त्याने हात वर केला आणि आकाशाकडे पहात तो मोठ्याने बोलू लागला: "मी माझ्या देवाना मदतीसाठी बोलाविले पण ते मला सोडून गेले आहेत. येसु ख्रिस्त! जर तू मला शत्रूवर विजय मिळवून दिलास आणि तुझी उपासना करणाऱ्या लोकांच्या भावनेप्रमाणे तू शक्तिशाली आहेस याची जर मला प्रचिती आली तर मी तुझी उपासना करेन आणि तुझ्या नावाने सिंहासनावर बसेन." तर असा होता हा राजा. केवळ विजयासाठी आणि त्याद्वारे




सोने, चांदी, मौल्यवान खडे, गुलाम आणि अमूल्य भेटी मिळविण्यासाठी कोणत्याही देवाची उपासना करावयास तो तयार होता. येसु ख्रिस्ताला भोगाव्या लागलेल्या यातनांविषयी जेव्हा पादरी त्याला सांगू लागला तेव्हा राजा चटकन उद्गारला "जर त्यावेळी मी तेथे असलो असतो तर मी सूड घेतला असता." तथापि देवाच्या मृत्यूचा सूड घ्यावयास निघालेल्या या राजाला आपल्या एका प्रतिस्पर्ध्याला भित्रेपणाबद्दल मारताना कोणतीच अडचण वाटली नाही. एवढेच नव्हे तर एकाला वडिलांची हत्या केल्याच्या आरोपावरून त्याने मारले, जी हत्या त्याने स्वतःच कट रचून केली होती. युद्धामध्ये शत्रूची बळकावलेली संपत्ती तो आपला उदारपणा दाखविण्यासाठी धर्ममंदिराना भेट देत असे. त्यामागे हा ही हेतू असे की त्याने केलेल्या सर्व वाईट गोष्टीपासून, पापांपासून त्याला मुक्ती मिळावी.

मेरोविंगचे इतर राजेदेखील अशाच प्रकारचे "ख्रिश्चन"-धर्मिय होते.

या कारणामुळेच या राजांच्या नाण्यांवर येसु ख्रिस्ताचे प्रतिक किंवा प्रतिमा आढळून येते. ख्रिश्चन धर्ममंदिराना कशा प्रकारे नवे स्वरूप प्राप्त होत गेले व नव्या नव्या राजांबरोबर त्याना कसे वाढते महत्त्व प्राप्त होत गेले याची कल्पना आपणाला नाण्यांवरून येते. या नाण्यांवरील ख्रिश्चन धर्मीय प्रतिकात्मक चिन्हे याच गोष्टीची साक्ष देतात की ज्याच्या जवळ खरे सामर्थ्य आहे त्याच्या मागेच धर्ममंदिर उभे आहे. तर दुसरीकडून हीच नाणी आणखी एका गोष्टीची साक्ष देतात की जेथे सत्ता आहे तेथे पावित्र्यासाठी आणि सत्ता नियंत्रणाच्या कामी प्रजेला मदत करण्यासाठी धर्माची आवश्यकता आहे.

प्रारंभीच्या मध्ययुगीन नाण्यांच्या मदतीने आपणाला त्या


ROM ET AVG

काळाची बरीच माहिती प्राप्त होते ; या व्यतिरिक्त या नाण्यांमध्ये बरेचसे रहस्य दडलेले आहे. यापैकी एक रहस्य एकाचवेळी मुद्राशास्त्राशी आणि राजकीय अर्थशास्त्राशी संबंधित आहे, ते रहस्य म्हणजेच "नाण्यांचे धातु" होय.

नाणी ही निरनिराळ्या धातूंपासून पाडण्यात येत होती. कधी कधी फक्त सोन्याचीच तर कधी कधी फक्त चांदीचीच नाणी पाडण्यात येत. अशा प्रकारच्या वित्तव्यवस्थेस एक धातुमय वित्तव्यवस्था म्हणतात. इतर काळांमध्ये व इतर देशांमध्ये एकाच वेळी सोन्याची व चांदीची नाणी पाडली जात असत तसेच तांब्याची नाणी पण पाडली जात असत, अशा प्रकारच्या वित्त-व्यवस्थेस द्वीधातुमय किंवा बहुधातुमय वित्तव्यवस्था असे म्हटले जाते.

पैशाच्या स्वरूपातील धातूंचा प्रश्न हा मुद्राशास्त्र आणि अर्थव्यवस्थेच्या इतिहासातील एक अत्यंत कठीण आणि गुंतागुंतीचा प्रश्न आहे. ही गोष्ट स्पष्ट करणारे एक उत्कृष्ट उदाहरण म्हणजे, १९ व्या शतकामध्ये इतिहासकार आणि पुराणवस्तुशास्त्रज्ञांचे फ्रान्समध्ये भरलेले अधिवेशन होय. या अधिवेशनामध्ये एक प्रश्न उठविण्यात आला होता: मेरोविंग राजे (सहाव्या आणि सातव्या शतकातील फ्रेंच राजे) फक्त सोन्याचीच नाणी का पाडत असत व कॅरोलिंग राजे (आठव्या आणि नवव्या शतकातील राजे) चांदीचीच नाणी का पाडत असत? काही शास्त्रज्ञांनी असे प्रतिपादन केले की सोन्याचा साठा या वेळेपर्यंत समाप्त झाला असावा तर दुसऱ्या शास्त्रज्ञांनी असे मत मांडले की मेरो-विंग राजांच्या वेळी बरीच जुनी रोमन नाणी शिल्लक होती व त्यामुळे नवी चांदीची नाणी पाडण्याची आवश्यकता नव्हती आणि जेव्हा कॅरोलिंग राजांच्या काळात रोमन नाणी हळूहळू



लुप्त होत गेली तेव्हा नवीन, चांदीची नाणी सुरू करावयाची आवश्यकता भासली. मेरोविंग राजांच्या सत्ताकाळात पैशाची एकंदरीत गरज कमी होती व त्यामुळे नवी चांदीची नाणी पाडण्याची गरज नव्हती हा सिद्धांत बऱ्याच अंशी वास्तविक ठरतो. सोन्याच्या नाण्यांचा वापर व्यवहार व देवाण-घेवाणीपेक्षा साठवणूक करण्यासाठी, नोकर आणि इमानदार सेवकांचा गौरव करण्यासाठी, भेट देण्यासाठी व संपत्तीच्या प्रदर्शनासाठी केला जात असे. पैसा म्हणून नाण्यांची अद्यापि मागणी अशी नव्हती. जेव्हा पैशाची मागणी वाढू लागली तेव्हा अधिक अधिक प्रमाणात चांदीची नाणी पाडली जाऊ लागली.

नाणी ज्या धातुंपासून बनवली जात होती त्या धातूंवरील "जबाबदारी"चे जणू काही वाटप केले गेले: चांदीच्या नाण्यांचा वापर व्यवहारात आणि व्यापारात केला जाऊ लागला तर सोन्याच्या नाण्यांचा वापर संचय करण्याकरिता आणि मोठ्या व्यापारी उलाढालीमध्ये केला जाऊ लागला. अशा प्रकारची वाटणी प्राचीन काळी अनेक शतके व अनेक देशात अस्तित्वात होती.


पहिल्या कार्ल राजाने नवे मूल्य, परिमाण सुरू केले. ते होते पौंड. या राजानेच सर्व वित्तव्यवहारांचे केंद्रिकरण केले. परंतु या वेळेपर्यंत नाणे-व्यवस्था इतकी मोडखळीस आलेली होती की वित्तव्यवहारांचे केंद्रिकरण करणे पहिल्या कार्लला शक्य झाले नाही. त्याने अशी अज्ञाप्ती काढली की राजाच्या निवासस्थानाव्यतिरिक्त इतर कोठेही नाणी पाडली जाऊ नयेत. परंतु प्रत्यक्षात मात्र त्याचे अनेक सरदार नाणी पाडत होते. मेरोविंग राजांच्या काळापर्यंत ही परिस्थिती तशीच होती; जवळजवळ प्रत्येक मोठ्या बाजारामध्ये टांकसाळ होती. राजाच्या निवासस्थानी पाडण्यात आलेल्या नाण्यांच्या तुलनेने ही नाणी


ROMA·IM·AVGVST
DVX SAXONIE
15 66

मोठ्याप्रमाणात उपयोगात आणली जात. राजाची नाणी स्वीकारण्यास नकार देणाऱ्यांविरुद्ध आणि दुसऱ्यांची नाणी स्वीकारणाऱ्यांविरुद्ध कडक कारवाई केली जाईल असा इशारा राजा कार्लने दिला. परंतु याचा काहीही उपयोग झाला नाही. बेकायदेशीररित्या पाडण्यात आलेली नाणी राजाच्या नाण्यांशी यशस्वी स्पर्धा करीत होती.

या सर्व मुद्राशास्त्रीय वस्तुस्थितींचा काय अर्थ होतो? ज्याला कार्ल दि ग्रेटच्या साम्राज्याचा काळ समजले जाते त्या काळाचे म्हणजेच मध्ययुगाच्या प्रारंभी युरोपमध्ये असलेल्या अल्पकालीन एकतेच्या आणि राजकीय केंद्रिकरणाच्या काळाचे उत्कृष्ट दर्शन आपणाला या गोष्टींद्वारे घडून येते. याच वेळी किसानाना गुलामगिरीत जखडून टाकण्यात आले. भावी सरंजामशाहीची बीजे रोवण्यात आली. याशिवाय आणखी एका गोष्टीचा उल्लेख करणे जरूरी आहे. ती गोष्ट म्हणजे राजा कार्ल याने केलेल्या सुधारणांचा परिणाम होय. या सुधारणांमुळे चांदीच्या नाण्यांच्या वजनात, मूल्यात वाढ झाली खरी पण त्यामुळे किसानांची मात्र जास्तच पिळवणूक होऊ लागली, कारण त्याना पूर्वी इतकाच पण आता अधिक वजनदार नाण्यांद्वारे कर द्यावा लागू लागला.

सरंजामशाहीच्या विकासाची परिणती शेवटी विकेंद्रीकरणामध्ये होते हे आपणाला ठाऊक आहेच. आणि झाले देखील असेच. लवकरच चार्लस् दि ग्रेटचे साम्राज्य कोसळले. त्याचा वारसा घेतलेल्या इतर राजांनी अस्तित्वात असलेली वित्तव्यवस्था टिकवून ठेवण्याचा प्रयत्न केला. उदाहरणार्थ कार्लने ८६४ साली एक आज्ञापत्र काढले. नाणी विनिमयासंबंधित जपून ठेवण्यात आलेला हा अत्यंत प्राचीन असा मध्ययुगीन दस्तऐवज आहे. या आज्ञापत्रा-



वरून आपणाला कळते की नाणी पाडण्याचे काम फक्त राजाच्या प्रासादात व रुआन, ऱ्हाईम्स, सान, पॅरिस, ऑरलीआन, शालोन, लिल्ल आणि सारबोन्न याच शहरात केले जाई. नाणी तयार करण्यासाठी लागणारी चांदी घेण्यासाठी कारागीराना दोन सरदार व दोन सर्वसंपन्न लोकांसह राजाच्या खजिन्यात पाठविण्यात येत असे. ठरवून दिलेल्या मुदतीत या टांकसाळींना तीच चांदी, तेवढ्याच वजनाच्या नाण्यांच्या स्वरूपात खजिन्यात परत आणावी लागे. जेव्हा नाण्यांच्या शुद्धतेबाबत संशय निर्माण होई तेव्हा त्यांची अग्नी आणि उकळत्या पाण्याद्वारे "दैवी परीक्षा" घेतली जाई. जर नाणी या परीक्षेस उतरली नाहीत तर फसवेगिरीबद्दल टांकसाळीच्या मालकाचे हात तोडले जात. अशा प्रकारच्या कडक शिक्षेद्वारे वित्तव्यवहारामध्ये शिस्त आणण्याचा प्रयत्न फ्रान्सचा हा राजा करीत होता.

नाण्यांची हानी

काही काळातच नाणी-व्यवसाय आणि टांकसाळींचे विकेंद्रीकरण झाले. सरंजामशाहीने या वित्तव्यवसायाची एकही निशाणी ठेवली नाही.

मध्ययुगीन युरोपमध्ये अनेक ठिकाणी नाणी पाडणारे प्रासाद होते. त्या काळात प्रत्येक सरदार टांकसाळ उघडण्याची महत्त्वाकांक्षा बाळगून असे. याचे कारण असे की या व्यवसायात नफा भरपूर होता: एकाच, ठराविक वजनाच्या चांदीच्या तुकड्यापासून जास्तीत जास्त नाणी पाडली जात होती. कारण असा विचार केला जाई की १ पौंड चांदीतून काही नाणी जास्त पाडली गेली तर जास्त वस्तू विकत घेता येतील. काही काळापुरती ही वस्तुस्थिती होती खरी पण लौकरच अशा प्रकारच्या हलक्या

नाण्यांनी आपले मूल्य गमावले आणि त्यांची क्रय-किंमत फारच कमी झाली. परिणामी, राजे, महाराजे आणि सरदार भविष्य-काळाचा काडीमात्र विचार न करता पुन्हा १ पौंड चांदीतून आणखी काही जास्त नाणी पाडू लागले. अशा प्रकारे नाण्यांची हानी होण्यास सुरुवात झाली.

आपल्या राज्याचा, प्रजेचा आणि व्यापाराचा मुळीच विचार न करणाऱ्या जहागीर आणि त्यांच्या राजांच्या स्वार्थीपणाचा, अप्पलपोटीपणाचा हा परिणाम होता. याच स्वार्थी लोकांनी सूंपर्ण वित्तव्यवस्था धुळीस मिळविली, चांदी बाजारातून नाहीशी झाली आणि शेवटी अर्थव्यवस्था मोडकळीस आली.

एखाद्या शहरामध्ये २ ते ५ वर्षे नाणी पाडली जात असत व मग हे काम बंद पडत असे. ह्या छोटचाशा काळात पाडल्या जाणाऱ्या नाण्यांमागे कधी कधी केवळ आर्थिकच नव्हे तर राजकीय हेतू असे: याद्वारे राज्यकर्ता आपली ग्वाही फिरवीत असे, आपल्या सार्वभौम राष्ट्राची किंवा हे शहर जिंकून घेतल्याची घोषणा करीत असे. कधी कधी यामागे यामुळे आर्थिक हेतू असत: जसे की नाणे पाडणाऱ्यांच्या आणि त्या देशाच्या सरकारच्या मतानुसार या ठराविक भागाकरिता योग्य असतील तितक्या वजनांची नाणी पाडून ती व्यवहारात आणणे. नव्या वजनपद्धती-नुसार नाणी पाडून ती व्यवहारात आणण्यासाठी व संपूर्ण वित्त-व्यवस्थेची पुनर्उभारणी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात धातूची-चांदीची आणि इतर साधनांची आवश्यकता होती. परंतु छोटचा छोटचा टांकसाळींची हा खर्च पेलण्याइतकी शक्ती नव्हती. म्हणू-नच नाण्यांच्या दोन-तीन मालिका काढून झाल्यावर ह्या टांकसाळी बंद पडत असत.

त्यामुळे संपूर्ण वित्तव्यवहार दुसऱ्याला चालविण्यासाठी देण्याची

किंवा विकण्याची पद्धत सर्वत्र पसरली. टांकसाळींना भरपूर नफा होऊ लागला. टांकसाळीला होणाऱ्या नफ्याची रक्कम एखाद्या व्यापाऱ्याकडून अनेक वर्षासाठी आगाऊ म्हणून घेणे त्या वेळच्या राज्यकर्त्यांना फायदेशीर वाटू लागले. या रकमेच्या बदली या व्यापाऱ्याना एखाद्या शहरामध्ये, ठराविक अटींवर नाणी पाडण्याचा हक्क देण्यात येत असे. परंतु नाण्यांच्या प्रकारासंबंधीच्या व त्यावर मुद्रित करण्यात येणाऱ्या मजकुराविषयीच्या नियमांचे पालन त्याना करावे लागे. प्राचीन रोममध्येदेखील अशा प्रकारचे व्यापारी होते. मध्ययुगीन युरोपमध्ये मात्र अशा प्रकारच्या व्यापाऱ्यांच्या संख्येत मोठी वाढ झाली.

ही गोष्ट स्पष्टच होती की या व्यापाऱ्यांनी टांकसाळींना होणाऱ्या नफ्याचा जास्तीत जास्त मोठा घास आपल्या तोंडात घालण्यासाठी या नाण्यांची हानी केली, त्यांच्या वजनात मोठी घट केली.

१६२१ ते १६२३ या काळात नाण्यांच्या हानीने जर्मनीमध्येतर राष्ट्रीय आपत्तीचे स्वरूप धारण केले. नाण्यांच्या व्यापाऱ्यांनीतर रस्त्या-रस्त्यांवरून आपले छोटे कारखाने सुरू केले. आता कोणताही कंगाल सरदार आपल्या वाड्यामध्ये टांकसाळ सुरू करू शकत होता; कोणतेही चांगले, वजनदार नाणे खरेदी करून ते वितळून त्यापासून दुसरी कमी वजनाची व कमी शुद्धतेची नाणी तयार करू शकत होता. "राजे लोक सैनिकाना लोकाना लुबाडू देत नाहीत, परंतु नाण्यांच्या व्यापाऱ्याना मात्र लोकाना व देशाला लुबाडण्याची पूर्ण मुभा देतात," – असे या काळातील सर्वसामान्य लोक बोलू लागले. जसजसे या सरदाराना आणि नाण्यांच्या व्यापाऱ्याना अधिक स्वातंत्र्य मिळत गेले तसतसे जर कधी एखाद्या बनावट नाणी बनविणाऱ्या लबाड व्यापाऱ्याला अटक

केली गेली तर ते अधिक जोरजोराने आवाज उठवू लागले. या काळातील काही टांकसाळींच्या खर्चाविषयीच्या दस्तऐवजांमध्ये फसवेगिरी करणाऱ्या, बनावटनाणी बनविणाऱ्या व्यापाऱ्याना जाळून ठार मारण्यासाठी ज्या भट्टया तयार केल्या गेल्या त्याचा खर्च दाखविण्यात आलेला आहे.

बनावटनाणी बनविणाऱ्या लोकाना कडक शिक्षा जरी करण्यात येत होती तरीही अशा प्रकारची फसवेगिरी व बनावटगिरी करणाऱ्या सरदारांचा गुन्हा तेवढयाच गंभीर स्वरूपाचा होता हे विसरले जात नव्हते. फ्रान्सचा राजा, चौथ्या फिलीपचा उल्लेख 'फिलीप-खोटया पैशांचा व्यापारी' असा केला जात असे कारण त्याने आपल्या प्रासादातील टांकसाळयांमध्ये अनेक नाण्यांची हानी केली होती.

नाण्यांची हानी करण्याच्या कृत्याची परिणती शेवटी नाण्यामधील चांदीचे अस्तित्व कमी होण्यामध्ये झाली. १२८० पर्यंत केल्नच्या फेनींगचे वजन – त्यातील चांदीचे वजन – १.३१५ ग्राम होते. १४ व्या शतकाच्या अखेरीस हे वजन घटून ०.०७५ ग्राम पर्यंत पोहोचले.

मध्ययुगामध्ये ग्रोश हे सर्वात मोठे व वजनदार चांदीचे नाणे होते. या नाण्यातील चांदीचे प्रमाण इतके कमी होत गेले की शेवटी हेच नाणे सर्वात छोटे व हलके नाणे म्हणून वापरले जाऊ लागले.

बनावट नाण्यांच्या व्यापाऱ्यांच्या फसवणुकीला बळी पडून खोटी नाणी स्वीकारण्याची अर्थातच कोणाचीही इच्छा नसायची. १४ व्या शतकातील एका जर्मन काव्यातील खालील संवाद पहा. धर्मोपदेशक काईआफा जेऊदाला तीस चांदीची नाणी देत आहे:

जेऊदा – हे फेनींगचे नाणे लाल रंगाचे आहे.

काईआफा – ते देऊन तू पाव आणि मांस घेऊ शकतोस.

जेऊदा – या फेनींगचा काही उपयोग नाही.

काईआफा – त्याचा आवाज जरा ऐकून पहा.

जेऊदा – पण ते कापलेले आहे.

काईआफा – हे दुसरे घे.

जेऊदा – पण त्याला भोक आहे.

काईआफा – ठीक आहे, दुसरे घे.

जेऊदा – पण त्यावरील शिक्का बनावट आहे.

काईआफा – जर ते देखील तुला आवडत नसेल तर मी तुला दुसरे देईन.

जेऊदा – पण हे तर काळ्या रंगाचे आहे.

काईआफा – मग तू दुसरे नाणे घे आणि शांत हो.

जेऊदा – हे कथलाचे आहे.

काईआफा – तू काय आम्हाला त्रास द्यायचे ठरविले आहेस काय?

एकंदरीत असे दिसून येते की शेवटी येसू ख्रिस्ताविषयी माहिती मिळविण्यासाठी काईआफाने जेऊदाला तीस पुरेशा वजनाची फेनींगची नाणी दिली.

पूर्वेकडील मध्ययुगीन नाणी

मुस्लीम देशांमध्ये उदयास आलेल्या वित्तव्यवहाराचा प्राचीन-कालीन नाण्यांशी दाट संबंध होता. पूर्वेकडील नाण्यांच्या नावाव-रूनच या गोष्टीची प्रचीती येते.

ग्रीसमधील व्यवहारामध्ये नाणी अस्तित्वात येईपर्यंत लोखं-

डाच्या कांडया वापरल्या जात व त्याना ओबल असे म्हणत (ग्रीक भाषेमध्ये ओबल म्हणजे कांडी) . अशा सहा कांडयांच्या गठडीला एक द्राचमा म्हणत. ही कांडयांची गठडी एकाच वेळी वजनाचे परिमाण म्हणून व पैसे म्हणून वापरली जाई. या शब्दापासूनच – द्राचमापासूनच – दिरचेम हे नाव पूर्वेकडील चांदीच्या नाण्याना मिळाले .

रोममध्ये एके काळी दिनारी नावाचे नाणे होते. त्याला दिनारी असे म्हणत कारण त्याचे सुरुवातीचे मूल्य १० पौंड तांब्याइतके होते. (दिनारी या लॅटिन शब्दाचा अर्थ दहा, दशक असा होतो) . दिनारी हे नाव मध्ययुगामध्ये व त्या नंतरही टिकून राहिले : उदाहरणार्थ, फ्रेंच नाणे देन्ये . मध्ययुगीन पूर्वेकडील अरब देशांमध्ये दिनारीचे रूपांतर दिनारमध्ये झाले व त्याद्वारे सोन्याच्या नाण्याचा उल्लेख केला जाऊ लागला .

तांब्याच्या नाण्याना फेल्स म्हटले जाऊ लागले (तांब्याच्या नाण्याना ग्रीक फोल्लीस म्हणत) .

अरबांच्या विजयानंतर, सातव्या शतकाच्या अखेरीस अरबांची स्वतःची नाणी अस्तित्वात येईपर्यंत अतिपूर्वेस आणि मध्य दक्षिणेकडील प्रदेशामध्ये अरबी आणि बायझनटाईन व अरबी आणि पर्शियन अशी द्विभाषीय नाणी व्यवहारात येत होती. पूर्वीच्या बायझनटाईन नाण्यांप्रमाणेच अरब-बायझनटाईन नाण्यांवर बायझनटाईनच्या सम्राटाची क्रूस व पृथ्वीचा गोल हाती घेतलेली प्रतिमा होती. नाण्यांच्या दोन्ही बाजूस ग्रीक व अरब दंतकथांचे चित्रण होते. त्यानंतर मात्र सम्राटाच्या प्रतिमेची जागा तलवार घेतलेल्या अरब खलिफाच्या प्रतिमेने तर ग्रीक दंतकथांची जागा कुराणातील वचनांची घेतली .

हीच गोष्ट अरब-पर्शियन नाण्यांच्या बाबतीत घडली. त्यावर

इराणच्या ससानिद घराण्यातील राजांची प्रतिमा व अरब दंतकथांचे चित्रण होते.

अरब खलिफांमध्ये प्रारंभीच्या काळात – ८-९ व्या शतकांमध्ये – वित्तव्यवहार आणि विशेषत: सोन्याच्या आणि तांब्याच्या नाण्यांचे व्यवहार पूर्णत: व काटेकोरपणे केंद्रित करण्यात आलेले होते. दंतकथांमध्ये देवाचे – अल्लाहचे नाव होते, त्यानंतर अल्लाहचा संदेश देणाऱ्या दूताचे – खलीफाचे व मग सम्राटाचे किंवा सुलतानाचे नाव लिहिण्यात येत असे. तांब्याच्या नाण्यांवर मात्र स्थानिक राज्यकर्त्याचे नाव लिहिलेले असे. लौकरच ही पद्धत सैल पडली आणि स्थानिक राज्यकर्त्यांनीदेखील चांदीची नाणी पाडण्यास सुरुवात केली. परंतु केंद्रीय सत्तेच्या प्रति असलेली निष्ठा व इमानदारी प्रकट करण्यासाठी नाण्यांवर खलिफाचे नाव लिहिणे मात्र आवश्यक होते. नाण्यावर खलिफाचे नाव नसेल तर ती एखाद्या गंभीर संघर्षाची, पेचप्रसंगाची निशाणी ठरे.

उदाहरणार्थ, १३ व्या शतकाच्या सुरुवातीस मध्य आशियामध्ये शाह महंमदचे एक प्रबळ राज्य होते. एक मुसलमान राजा असल्यामुळे तो खलिफाकडे दुर्लक्ष करु शकत नव्हता. सर्वसाधारणपणे शाह आपल्या नाण्यांवर आपल्या नावाबरोबरच खलीफ नसीर-लिद-दीनचे नाव लिहित असे. परंतु काही प्रकारच्या नाण्यांवरून खलिफाचे नाव लुप्त झाले. याचे कारण महंमद शाह आणि खलिफ यांमध्ये निर्माण झालेला वाद आहे असे आढळून आले. या वादाचा शेवट महंमद आणि नसीर यांचे संबंध तुटण्यामध्ये झाला. परिणामी अनेक वेळा दोघांच्या सैन्यांच्या दरम्यान अनेक सशस्त्र चकमकी घडून आल्या. खलिफाच्या नावाशिवाय नाणी काढण्याचे काम फक्त एखादा अत्यंत प्रबळ व शक्तिशाली राजाच करू शकत होता.

पूर्वीच्या काळी नाण्यांचा व्यवहार हा नेहमीच सत्ताधाऱ्यांच्या हाती असे. मध्ययुगीन युरोपप्रमाणेच पूर्वेकडील मुसलमान राजे आपल्या सत्तेची ग्वाही फिरविण्यासाठी नाण्यांवर आपले नाव लिहित. परंतु पूर्वेकडील या राजांची ही प्रचार पद्धती कधी कधी कळस गाठी. उदाहरणादाखल ११ व्या शतकातील मध्य-आशियायी काराखानीद घराण्यातील राजाची नाणी घ्या. "बाद-शहा", "अत्यंत गौरवशाली", "देवांचा वरदहस्त असलेला सामर्थ्यशाली", "न्यायदेवतेचा दूत", "धर्म रक्षक", "राज्या-चा सुवर्णतारा", "जनतेचा अग्रदूत" आणि "राष्ट्राचे आशा-स्थान" अशा प्रकारे हा राजा स्वत:ला संबोधित असे. आपली सत्ता टिकवून ठेवण्यासाठी हे राजे किती व कसे प्रयत्न करीत याचीच साक्ष या "पदव्यां"वरून पटते. कराखानीद राजे अशा काळात राज्य करीत होते. स्थानिक राजे शक्यतो एकाकी, अलिप्त राहू पहात होते. मध्ययुगीन युरोप आणि रशियामधील सरंजामशाहीचे हे एक वैशिष्टय होते. काराखानीद राजांच्या नाण्यांवर देखील या वैशिष्टयाचा चांगलाच प्रभाव पडल्याचे आढळून येते: या राजांच्या भरमसाठ पदव्याकडे, बहुमानांकडे दुर्लक्ष करून अगदी दूरवरील छोटे छोटे राज्यकर्ते देखील आपली स्वत:ची नाणी पाडत असत. जगाच्या इतिहासाचे सर्वसामान्य नियम विश्वाच्या सर्व, अगदी छोटया छोटया भागांमध्येसुद्धा समानरित्या कार्यरत होतात.


एक राजकीय साधन म्हणून नाण्यांचा उपयोग करणे हे पूर्वेकडील देशांतील राजांचे व राज्यांचे एक खास वैशिष्टय होते. यामुळे मुद्राशास्त्राला चांगलीच धार चढते, कारण ज्या घटनां-विषयी ऐतिहासिक दस्तऐवजांमध्ये काहीही लिहिण्यात आलेले नाही त्या घटनांची आपणाला बरीच माहिती प्राप्त होते.

5-1187

इतिहासामध्ये अशा घटनादेखील कमी नाहीत की जेव्हा एखाद्या राजाने एखादे शहर किंवा राज्य अद्यापि जिंकून घेतलेले नाही, आपली सत्ता त्या ठिकाणी प्रस्थापित केलेली नाही, परंतु आपल्या विजयाच्या स्मरणार्थ त्याने नाणी मात्र पाडून सुरू केली. चौदाव्या शतकातील झानीबेक खानाने कॉकेशससाठी इराणबरोबर घनघोर युद्ध केले व अल्पकाळातच तेब्रीज शहर जिंकून घेतले. आपल्या विजयाच्या स्मरणार्थ झानीबेक खानाने आपल्या नावाचे नाणे पाडले, ज्यावर त्या सालाची व ह्या शहराची नोंद होती. केवळ या नाण्यांच्या मदतीनेच मुद्राशास्त्रज्ञाना हे कळून आले की १३५३ साली खरोखरच झानीबेक खानाने तेब्रीज शहर जिंकून घेतले होते.

चौदाव्या शतकाच्या ७ व्या आणि ८ व्या दशकांमध्ये एका-पाठोपाठ एक, झपाट्याने खान बदलत गेले. दीर्घकाळ सत्तेवर राहणे जवळजवळ कोणालाच शक्य झाले नाही. या काळात इतक्या वेगाने सर्व घडामोडी घडत गेल्या की हे खान आपल्या अल्पशा कारकिर्दीत कोणतेही महत्त्वाचे कार्य करू शकले नाहीत. परिणामी प्राचीन इतिहासकारांच्या दस्तऐवजांमध्ये या खानांच्या कारकिर्दींचा उल्लेख नाही व काही ठिकाणीतर काही खानांच्या नावाचा सुद्धा उल्लेख नाही. परंतु आपल्या अल्पशा कारकिर्दीत हे खान जरी काहीही करू शकले नाहीत तरी आपल्या नावाची नाणी मात्र पाडू शकले.

मुसलमान राज्यांच्या अतिधार्मिक स्वरूपाची छाप त्या राज्यांच्या नाण्यांवर पडलेली दिसून येते. नाणी पाडणे हा राज्ययंत्रणेचा महत्त्वाचा विशेषाधिकार होता आणि म्हणूनच, वरील दोन्ही कारणांमुळे, नाण्यांवर धार्मिक सुत्रांचे व घोषवाक्यांचे मुद्रण करण्यात येत होते.


КНАЗ

मध्ययुगीन पाश्चात्य देशांप्रमाणेच पूर्वेकडील मुसलमान राज्यांच्या नाण्यांवर, त्या वेळी सत्तेवर असलेल्या वर्गाचा शिक्का मुद्रित करण्यात आलेला असे. या नाण्यांचा वापर विशेषत: धर्माला बळकटी आणण्यासाठी केला जाई. या वर्गाचा इतिहास, त्याची युद्धे, तंटे, संघर्ष, राज्य प्रतिनिधींचा दाम – दिमाख या नाण्यांमधून प्रतिबिंबित होत असे. सत्ताधारी वर्गाद्वारे केल्या जाणाऱ्या जनतेच्या पिळवणुकीची, नाण्यांच्या व्यवहारातून अमर्याद नफा मिळविणाऱ्या उच्चाधिकाऱ्यांच्या स्वार्थीपणाची आणि कंजूसपणाची कल्पना आपणाला या नाण्यांवरून येते.

मध्ययुगातील पूर्वेकडील आणि विशेषत: मध्यआशियातील मुसलमान राज्यांच्या बाबतीत ही गोष्ट प्रामुख्याने आढळून येते. या वेळेच्या नाण्यांमधील मिश्रधातूंचे प्रमाण वाढत गेले व चांदीचे प्रमाण अतिशय कमी झाले. केवळ नावापुरतीच चांदी त्यांमध्ये शिल्लक राहिली. ही एक प्रकारची नाण्यांची हानीच होती. परिणामी दिरहेम नाणी व्यवहारात आली. जनतेला ठाऊक होते की या नाण्यांचे खरे मूल्य अतिशय कमी आहे परंतु व्यवहारात त्यांचा वापर करणे अनिवार्य होते. या नाण्यांचे नावापुरते असलेले मूल्य बळजबरीनेच टिकवून ठेवण्यात येत होते. ही नाणी स्वीकारण्यास नकार देणाऱ्याला फाशीची शिक्षा देण्यात येईल असा आदेश त्या वेळेच्या सत्ताधिकाऱ्यांनी दिलेला होता. हा आदेश प्रत्यक्ष नाण्यांवरच मुद्रित करण्यात आलेला होता. आदेश खालील स्वरूपाचा असावयाचा: "हे नाणे स्वीकारण्यास नकार देणाऱ्याला देहांत शिक्षा देण्यात येईल." अर्थात, ही गोष्ट स्पष्ट आहे की अशा प्रकारचे नाणे फक्त त्या सत्ताधिकारी राज्यकर्त्याच्या शहरात आणि जवळच्या उपनगरात व्यवहारात असे. राज्यांदरम्यानच्या आणि शहरांदरम्यानच्या व्यापारामध्ये

आणि व्यवहारामध्ये ही नाणी उपयोगात आणली जात नसत.

अशा प्रकारची कमी मूल्य असलेली नाणी पाडणे सत्ताधिकाऱ्यांच्या फायद्याचेच होते. नाण्यांचे प्रत्यक्ष मूल्य फार कमी असे पण उच्च मूल्य असलेल्या नाण्यांच्या स्वरूपात ती व्यवहारात वापरली जात, त्यामुळे सत्ताधिकाऱ्याना प्रचंड नफा होऊ लागला. व्यापारामध्ये ही काळया रंगाची स्वस्त नाणी वापरली जात, पण कर देण्यासाठी किंवा सत्ताधिकाऱ्याना भेट करताना मात्र फक्त चांदीचीच नाणी वापरली जात असत, नव्हे – तसा नियमच होता. अर्थात, याबाबतीत काही मर्यादा बाळगणे हे आवश्यक होते. पूर्वेकडील राज्यकर्त्यांना आणि त्यांच्या वित्त सल्लागाराना वित्तव्यवहाराचे चांगले ज्ञान होते, या मर्यादाही ठाऊक होत्या, तरीसुद्धा अनेकदा असे घडत असे की लोक कडक नियम व कायद्याना धाब्यावर बसवून काळी दिरहेम स्वीकारण्यास नकार देत.

कधी कधी जुनी नाणी पुन्हा पाडून व्यवहारात आणली जात. आलम अलेआरी या युरोपियन प्रवाशाने १७ व्या शतकामध्ये इराणमध्ये पुन्हा व्यवहारात आणल्या गेलेल्या जुन्या नाण्यांच्या संदर्भात लिहिले आहे: "तांब्याच्या नाण्यांच्या बाबतीत बोलायचे झाल्यास एका गोष्टीचा उल्लेख करावा लागेल: प्रत्येक मोठ्या शहराची स्वतःची तांब्याची नाणी होती आणि ती केवळ या शहरातच व्यवहारात वापरली जात, इतकेच नव्हे तर ती जास्तीत जास्त वर्षभर व्यवहारात असत कारण या नाण्यांवरील मजकूर प्रत्येक वर्षी बदलेला जाई. या नाण्यांवर हरण, बोकड, मासा, सर्प अशा प्राण्यांची चित्रे असत. आलमच्या वेळी शमाह शहरातील नाण्यांवर वनदेवतेचे किंवा सैतानाचे चित्र होते, कशानमधील नाण्यांवर कोंबड्याचे तर इस्पगानमधील नाण्यांवर सिंहाचे व किल्यानमधील नाण्यांवर माशाचे चित्र होते. नव्या

वर्षाच्या आगमनाबरोबर जुनी नाणी बंद केली जात. एका नव्या नाण्यासाठी आता दोन जुनी नाणी द्यावी लागत म्हणून ही सर्व नाणी टांकसाळीमध्ये जमा करावी लागत. तेथे ही नाणी काहीशी वितळवून त्यावर नवा शिक्का उमटविला जाई.

जुनी नाणी व्यवहारातून काढून घेण्यात आली. लोक ही नाणी राजाच्या खजिन्यामध्ये किंवा टांकसाळयांना परत करीत असत व त्या बदली नवी नाणी घेत असत. जुन्या नाण्यांचे मूल्य घटत गेले आणि नव्या नाण्यांचे मूल्य वाढत गेले परिणामी टांक-साळयांना आणि राजाला सरळसरळ मोठा नफा होत गेला."

नाण्यांच्या टांकसाळीमध्ये

नाण्यांचा अभ्यास करीत असताना मध्ययुगीन टांकसाळीचे अंतरंग जाणून घेणे मनोरंजक ठरेल यात शंका नाही.

१६ व्या शतकातील ऐतिहासिक कालवृत्तांताच्या छोटया प्रतिकृती आपणाला प्राचीन रशियातील टांकसाळयांच्या अंतर-गातून फेरफटका मारण्यात मदत करतात. या चित्रामध्ये आप-णाला दुहेरी हातोडा घेतलेला टांकसाळीतील लोहार दिसतो. त्याच्या समोर ऐरणीवर एक धातूची तबकडी व त्यावर एक शिक्का चिमटयांच्या सहाय्याने बसविण्यात आल्याचे दिसत आहे. शेजारीच कदाचित चांदी वितळवली जात असावी: एक कारागीर हातात मूस घेऊन उभा आहे तर दुसरा कारागीर भाता चालवीत आहे.

१५ व्या शतकातील एका दुसऱ्या चित्रामध्ये आपणाला पॅरिस-मधील एका टांकसाळीचे दर्शन घडते. या चित्रामध्ये एक कारा-गीर कात्रीने गोल चकत्या कापत आहे तर दुसरा कारागीर



१५ व्या शतकातील पॅरिसमधील नाणी पाडण्याचा उद्योग.

चांदीची पातळ पाने तयार करीत आहे. त्यांच्या शेजारीच आणखी एक कारागीर असून तो या गोल चकत्यांवर शिक्का उमटवित आहे. एका मोठ्या गोल मेजावर नाण्यांची मोजणी चालू आहे. या मेजा शेजारीच एक तराजू असून त्यासमोर हिशोब लिहिण्यासाठी मोठी जाड वही ठेवलेली आहे. मोठा जाडजूड शिक्का, कात्री, हातोडे आणि चिमटे – या सर्व गोष्टी म्हणजे प्राचीन काळातील नाणी बनविण्याचा कारखाना.

मध्ययुगीन छोट्या कलाकृती म्हणजे जणू काही आपल्यापासून फार दूर गेलेल्या जगाचे दर्शन घडविणारी एक खिडकी आहे. फक्त त्याची काच फार धूसर आहे: आकृत्या अस्पष्ट आहेत, छोटे छोटे भाग अस्ताव्यस्त पडलेले आहेत आणि हालचाल थंडावलेली आहे. आता मॉस्कोमधील एका पुराणवस्तुसंग्रहालयातील काही प्राचीन कलाकृतींचे निरीक्षण करू. या कलाकृती आणि दस्तऐवजे आपणाला १७ व्या शतकातील मॉस्कोतील एका टांकसाळीची माहिती करून देतात.

१६७६ साली वरव्रोमेय मिल्लेर या विदेशी व्यापाऱ्याने मॉस्कोमधील टांकसाळीत चांदी आणली. ही चांदी छोट्या छोट्या तुकड्यांच्या आणि अखंड कांड्यांच्या स्वरूपात होती. त्या वेळेच्या रशियन झारच्या आदेशानुसार रशियन नाणी पाडण्यासाठी ही चांदी वितळविण्यास कारागिरांनी सुरुवात केली. पण जेव्हा बरीच चांदी वितळविण्यात आली तेव्हा असे आढळून आले की या तुकड्यांमध्ये आणि कांड्यांमध्ये बरीच भेसळ असून त्यामध्ये मोठ्या प्रमाणात कथील, तांबे, जस्त इत्यादी सारखे धातु आहेत आणि त्यामुळे नाण्यांसाठी ही चांदी वापरण्यास योग्य नाही. सर्वसाधारणपणे अशा प्रकारच्या कांड्या वितळविताना त्यातील कथील आणि तांबे जळून जात असे. परंतु या वेळी मिश्रधातुचे –

भेसळीचे – प्रमाण अत्यंत मोठे होते. कारागिरांनी याबाबतीत तक्रार केली परंतु आपण आणलेली चांदी शुद्ध आहे असे मिल्लेरने ठामपणे सांगण्यास सुरुवात केली. प्रकरण शेवटी रशियन झारा-पर्यंत पोहोचले. झारने आदेश दिला की ही चांदी पूर्णपणे वितळ-विण्यात यावी आणि जितकी शुद्ध चांदी कमी पडेल तितकी विदेशी व्यापारांकडून वसूल करून घेण्यात यावी. या वेळी संबं-धित व्यक्तींसमोर चांदी वितळविण्यात आली: वारव्रोमेय मिल्लेर, त्याचे साथीदार, इतर काही व्यापारी, टांकसाळीतील कारागीर आणि चांदी काम करणारे कारागीर. तपासणीसाठी मिल्लेरकडून घेतलेल्या २० पौंड चांदीमधून जवळ जवळ २ पौंड म्हणजे १० टक्के भेसळ निघाली. मिल्लेरची चांदी नाकारण्यात आली.

हट्टी मिल्लेर आणि त्याचे साथीदार पुन्हा मागे पडले आणि झारने पुन्हा एकदा चांदी वितळविण्याचा आदेश दिला. परंतु याचा काहीच उपयोग झाला नाही. वितळलेली चांदी फाटली आणि तिचे तुकडे तुकडे झाले.

या प्रकरणाचा शेवट काय झाला ते आपणाला ठाऊक नाही. मिल्लेर पुन्हा एकदा झारकडे गेला हे ठाऊक आहे, पण पुढे काय झाले देव जाणे. दस्तऐवजातील शेवटची काही पाने उपलब्ध नाहीत.

१७ व्या आणि १८ व्या शतकात टांकसाळीचे रूपांतर नाणी बनविणाऱ्या कारखान्यात झाले. या कामाला पूर्वी असलेले हस्तव्यवसायाचे स्वरूप नष्ट झाले. नाण्यांची अधिकाधिक गरज भासू लागली. पुरेशा नाण्यांचे उत्पादन करण्यासाठी खास यंत्रांची उभारणी करण्यात येऊ लागली. महान लिओनार्दो दा विन्चीने नाण्यांसाठी धातूच्या गोलाकार चकत्या बनविणारे यंत्र निर्माण केले.

प्राख्यात शिल्पज्ञ बेनवेनुतो चेल्लीनी याने नाण्यांवर प्रतिमा उमटविण्यासाठी दाबयंत्राचा शोध लावला. परंतु या तंत्रज्ञानाचा वापर मात्र १७ व्या शतकाच्या अखेरीस केला जाऊ लागला.

पहिल्या पिटरच्या काळात रशियामध्ये यंत्राद्वारे नाणी पाडली जाऊ लागली. खास यंत्राद्वारे प्रथम धातुच्या पट्टया बनवल्या जाऊ लागल्या व दुसऱ्या यंत्रावर त्यातून वर्तुळाकार चकत्या पाडल्या जाऊ लागल्या. त्यानंतर दुसऱ्या खास यंत्रांद्वारे या चकत्यांच्या किनाऱ्यावर व इतर ठिकाणी मुद्रण केले जाऊ लागले. यासाठी खास यांत्रिक हातोडयांचा वापर केला जात असे. त्यापूर्वी (जेव्हा हाताने नाणी बनवली जात असत) हाताने हातोडयाच्या सहाय्याने हे मुद्रण केले जात असे. हळू हळू ही पद्धत देखील लुप्त झाली आणि मुद्रणासाठी दाबयंत्रांचा वापर केला जाऊ लागला.

मुक्या नाण्यांना कशाप्रकारे बोलण्यास भाग पाडले जाते?

मुद्राशास्त्र प्राचीन टांकसाळयांकडे केवळ मनोरंजनाच्या दृष्टीनेच पहात नाही. प्राचीन नाणी कशा प्रकारे पाडली जात होती ते तंत्र मुद्राशास्त्राला जाणून घ्यावयाचे असते. या तंत्राची माहिती करून घेतल्यानंतरच अनेक नाण्यांचे रहस्य उलगडणे मुद्राशास्त्राला शक्य होते. कारण केवळ अशीच नाणी की ज्यांवर साल, राज्यकर्त्याचे नाव, देशाचे नाव मुद्रित केले गेले आहे – मुद्राशास्त्राच्या अभ्यास क्षेत्रात येत नाहीत तर पुष्कळदा अशी ही अनेक नाणी आढळतात ज्यांवर कोणत्याही प्रकारचे मुद्रण दिसून येत नाही. अशी नाणी आपल्या 'मालका'ची, देशाची आणि काळाची काहीच माहिती आपणाला देत नाहीत. परंतु अशी नाणी ऐतिहासिक

'कचऱ्या'मध्ये फेकून देता कामा नये. याच, संपूर्णतः 'मुक्या' नाण्यांच्या सहाय्याने बरीच माहिती गोळा करता येते. दीर्घकालीन, खडतर श्रमानंतर हीच नाणी आपणाला भूतकाळासंबंधी मौल्यवान माहिती उपलब्ध करून देतात.

नाणी पाडण्याच्या प्राचीन तंत्रावरील एक उदाहरण आपण आता पाहू.

व्यापारिक संबंधांचा जसजसा विकास होत गेला तसतशी बाजारामध्ये नाण्यांची गरज वाढत गेली. यामुळे टांकसाळ्यांमधून नाण्यांवर मुद्रण करण्याच्या क्रियेला कसा वेग देता येईल यावर विचार केला जाऊ लागला. नाण्यांवर मुद्रण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर कारागिरांची आवश्यकता भासू लागली. शिवाय हे मुद्रण नाण्यांवर फार काळ टिकतही नसे.

मध्ययुगीन काळात युरोपमध्ये नाण्यांवर अक्षरे मुद्रित करण्यासाठी दाबयंत्रांचा वापर केला जात असे. प्रत्येक अक्षरासाठी वेगळे दाबयंत्र वापरले जाई. नाण्यांवर एखादा मजकूर अथवा एखादे वाक्य मुद्रित करण्यापूर्वी कारागिरांना दाबयंत्रावर आवश्यक अक्षरांची प्रत्येक वेळी मांडणी करावी लागत असे.

हे काम सुलभ करण्याच्या हेतूने १५ व्या शतकामध्ये रशियात सर्व अक्षरांची मांडणी केलेल्या खास दाबयंत्रांचा वापर केला जाऊ लागला. नाण्यांवर हव्या असलेल्या प्रतिमेनुसार लोखंडाच्या शिक्क्यावर चित्राची मांडणी केली जाई मग ज्या शिक्क्याच्या मदतीने नाण्यांवर मुद्रण केले जाई त्या शिक्क्यावर उमटविला जाई. अशा प्रकारे या प्रत्यक्षपणे वापरल्या जाणाऱ्या शिक्क्यावर मूळ शिक्क्याचे आरशाप्रमाणे प्रतिबिंब मिळे. परिणामी एका मूळ शिक्क्याच्या सहाय्याने अनेक शिक्के एकाच वेळी तयार केले जात.

आज एकही प्राचीन मूलभूत शिक्का संशोधनासाठी उपलब्ध

नाही. केवळ उपलब्ध असलेल्या नाण्यांच्या आधारावरच अशा शिक्क्यांच्या अस्तित्वाची कल्पना आपणाला करता येते.

आपल्यासमोर १६ व्या व १७ व्या शतकातील सत्ताधारी रशियन झारांची नावे असलेली नाणी आहेत. त्यापैकी अनेक नाण्यांवर टांकसाळीचा उल्लेख करणारे अक्षर आहे परंतु नाण्यांवर सालाचा उल्लेख नाही. आपण फक्त एवढेच सांगू शकतो की कोणत्या झारच्या काळात कोणती नाणी पाडण्यात आली. एखादी झारशाही दीर्घकाळ अस्तित्वात असू शकेल. या काळात नाण्यांच्या व्यवहारासह इतर अनेक क्षेत्रांमधून प्रचंड उलाढाली घडून येणे शक्य आहे. परंतु जर एखाद्या झारच्या कारकिर्दीच्या प्रारंभाचे आणि अखेरीचे साल आपणास ठाऊक नसेल तर या महत्त्वाच्या घटनांचा मागोवा कसा घेता येईल? त्याशिवाय अशीही नाणी आहेत की ज्यावर टांकसाळीचा उल्लेख करणारी अक्षरे नाहीत. ही नाणी कोठे पाडण्यात आली होती?

नाण्यांची एकमेकांशी तुलना करता मुद्राशास्त्रज्ञाना असे आढळून आले की बऱ्याच वेळा काही नाण्यांची एक बाजू एक-सारखी असते तर दुसरी बाजू वेगवेगळी असते. याचे एक असेही कारण असू शकेल की नाण्यांवर शिक्के एकाच वेळी उमटविले जात नसावेत. बाह्य शिक्क्यावर नेहमी हातोडीचे घाव घातले जात असावेत व नाण्याच्या गोलाकार चकतीवर शिक्का व्यव-स्थित ठेवला जात नसावा. कधी कधी हा शिक्का नाण्याच्या कडेवरून घसरल्याचे दिसते. यामुळे नाण्यांला कड अशी रहात नसे व शिक्का बदलावा लागे. पण खालच्या बाजूसाठी असलेला शिक्का मात्र तसाच या पुढेही वापरला जात असे. शेवटी तो देखील झिजून जात असे व बदलावा लागे. परंतु त्यावेळी वरील बाजूसाठी असलेला शिक्का मात्र नवाच असल्यामुळे तो तसाच

ठेवला जाई. अशा प्रकारे प्रत्येक वेळी वरील आणि खालील बाजूसाठी – दोन्ही बाजूंसाठी असलेल्या शिक्क्यांपैकी कोणतातरी एक शिक्का एकदम नवा असे तर दुसरा थोडासा, किंवा अत्यंत झिजलेला असे. परिणामी नाण्यांची एक मालिकाच तयार होते. ही नाणी पाहताच आपण हे सांगू शकतो की ही नाणी एकाच ठिकाणी पाडण्यात आलेली आहेत. अगदी क्वचितच शिक्के एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हालविले जात असत. टांक-साळीमध्येच हे शिक्के कायम ठेवले जात असत.

कधी कधी अशा प्रकारच्या एखाद्या मालिकेतील सर्व नाण्यांची अशाप्रकारे मांडणी करणे शक्य होते की कोणती नाणी सुरुवातीला पाडली व कोणती नंतर ते आपणाला सहज समजू शकेल. शिक्के हे काही नाण्यांवर नेहमीच एकसारखे उठवले जात नाहीत. यामुळे सर्वप्रथम चित्राचे बारकावे, सूक्ष्म भाग नाण्यांवर उमटत नसत. शिक्क्यावरून असे सूक्ष्म भाग व बारकावे हळू हळू झिजून जात. हीच गोष्ट १ कोपेकच्या रशियन नाण्यांच्या बाबतीत घडली: घोडेस्वाराचे चित्र असलेल्या या नाण्यावरील घोड्याचे पाय हळू हळू नाहीसे झाले तर घोडेस्वाराच्या खांद्यावरील अंगरखा दिसेनासा झाला.

केवळ एकाच शिक्क्याने पाडण्यात आलेल्या नाण्यांमध्ये आपण कोणती नाणी प्रारंभीची व कोणती नंतरची हे ठरवू शकतो. उदाहरणार्थ, अशी दोन नाणी ज्यांची एक बाजू सारखी आहे पण दुसरी वेगवेगळी. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे झाल्यास, एका बाजूसाठी असलेला शिक्का झिजून गेला व त्यामुळे तो बदलून नवा शिक्का वापरण्यात येऊ लागला. दुसऱ्या बाजूसाठी असलेला शिक्का पूर्वीप्रमाणेच वापरला जाऊ लागला. आता आपणाला हे ठरवावयाचे आहे की या दोन नाण्यांवरील फरक पडलेल्या

बाजूंकडे पाहता कोणते नाणे जुने, "वयस्कर" आहे व कोणते नवे. या गोष्टीचा उलगडा करण्यामध्ये आपल्या मदतीला धावून येते ती दुसरी बाजू, जी एकाच शिक्क्याने मुद्रित केली गेली. असे दिसून येते की जरी ही बाजू दोन्ही नाण्यांवर एकाच शिक्याने मुद्रित करण्यात आली असली तरी ती दोन्ही नाण्यांवर पूर्णपणे सारखी नाही. एका नाण्यावर सर्व बारकावे, चित्राचे सूक्ष्म भाग स्पष्ट दिसतात तर दुसऱ्यावर काहीसे अस्पष्ट दिसतात. तसेच कडा व रेषा तीक्ष्ण दिसत नाहीत. याचा अर्थ पहिल्या नाण्यासाठी नवा शिक्का (तुलनात्मकरित्या) वापरण्यात आला होता तर दुसऱ्या नाण्यासाठी झिजून गेलेला, जुनाच शिक्का वापरला गेला. यावरून आपणाला अगदी ठामपणे असे म्हणता येईल की दुसऱ्या नाण्याच्या फरक पडलेल्या बाजूसाठी पहिल्या नाण्याच्या तुलनेने नवाच शिक्का वापरला गेला होता.

वरील निरीक्षणे आपणाला नाण्यांच्या मालिकेची पुनर्मांडणी करण्यामध्ये मदत करतात कारण कोणते शिक्के कोणत्या क्रमाने वापरले गेले हे आपणाला ठाऊक होते. परंतु अडचणी आपली पाठ काही सोडत नाहीत: अनेकदा कोणत्यातरी अज्ञात कारणाने जुनाच शिक्का नाणी पाडताना वापरण्यात येत असे. यापूर्वी मात्र तो वापरला जात नसे. इतरही काही कारणे आहेत ज्यामुळे बरीच गुंतागुंत निर्माण होते, पण मुद्राशास्त्रज्ञांची सहनशक्ती अचाट आहे. ते या सर्व अडचणींवर मात करून यश संपादन करतात. आता त्यांच्यासमोर केवळ एखाद्या झारच्या अथवा राजाच्या कारकिर्दीतील नाणी नसतात तर ह्या झारच्या अथवा राजाच्या कारकिर्दीतील एका छोट्याशा कालखंडात पाडण्यात आलेल्या नाण्यांचा गट असतो, म्हणजेच कालक्रमगणनेनुसार त्यांची मांडणी केली जाते.

कालक्रमगणनेनुसार नाण्यांच्या मांडणीला प्राप्त होणाऱ्या महत्त्वाच्या बाबतीत मुळीच शंका निर्माण होत नाही. ज्यांचे 'जन्मस्थान' आणि 'जन्मकाळ' ठाऊक नाही अशा हजारो नाण्यांची ओळख केवळ अशा प्रकारच्या मांडणीच्या फलस्वरूपच पटते. आणि मगच त्यांना ऐतिहासिक महत्त्व प्राप्त होऊन ती एक ऐतिहासिक माहितीचे साधन बनतात. अशा प्रकारच्या मांडणीमध्ये स्थान प्राप्त झाल्यानंतर ही नाणी निरनिराळया राज्यकर्त्यांच्या कारकिर्दीमध्ये घडून आलेल्या वित्तघडामोडींची आणि सुधारणांची माहिती देऊ लागतात. याचे फळ म्हणजे आपणाला आर्थिक इतिहासाची, वित्तव्यवस्था आणि वित्तव्यवहारातील समस्या, सामाजिक संघर्ष व युद्धे इत्यादीविषयीची अमूल्य माहिती प्राप्त होते.

वित्तव्यवहार आणि वित्तव्यवस्थेतील नियम व मुद्राशास्त्र

आपणाला कदाचित असे वाटेल की प्राचीन नाण्यांचे संशोधनकार्य छोटया छोटया भागांमध्ये विखुरले गेले आहे व मुद्राशास्त्र निरनिराळया सत्यघटनांची जुळणी करून त्यांना त्यांचे ऐतिहासिक महत्त्व पुन्हा प्राप्त करून देऊन आपणाला त्यांच्या आधारे एखाद्या नाण्याची माहिती देते. परंतु प्रत्यक्षात मात्र परिस्थिती फार वेगळी आहे. मुद्राशास्त्रापुढे स्वतःची ध्येये आणि कामगिऱ्या आहेत. वित्तव्यवस्था आणि वित्तव्यवहाराशी संबंधित भूतकाळातील खास घटनांचा मुद्राशास्त्र अभ्यास करते. या घटनांचे स्वतःचे असे नियम असतात ज्यांनुसार त्यांचा विकास झालेला असतो. नाण्यांची हानी, नाणी पाडण्याचे तंत्र, टांकसाळयांचे स्वरूप आणि व्यवस्था, नाण्यांसाठी एखाद्या धातूची निवड – या साऱ्या गोष्टींचा एकमेकांशी फार दाट संबंध असतो.

सोविएत मुद्राशास्त्राने वित्तव्यवहाराच्या नियमांवरील संशोधनामध्ये मोठ्या सफलता प्राप्त केलेल्या आहेत. या ठिकाणी मध्ययुगीन वित्तव्यवहाराचा विशेष उल्लेख करावा लागेल. सिद्ध करून दाखविण्यात आले आहे की चांदीची नाणी व्यवहारातून लुप्त होण्याचे कारण म्हणजे त्यांच्या मूल्यात झालेला बदल. चांदीच्या नाण्यांच्या आणि एकंदरीत चांदीच्या बाबतीत त्रुटी निर्माण होते. चांदीची नाणी वितळून त्याच्या लडी तयार करणे किंवा ज्या देशांमध्ये तिचे मूल्य अधिक आहे त्या देशात घेऊन जाणे अधिक फायदेशीर ठरते. यामुळे वित्तव्यवहारात पेचप्रसंग निर्माण होतात. लोक ही नाणी साठवून ठेवू लागतात, खर्च करत नाहीत, व्यापारी लोक चांदी दुसऱ्या ठिकाणी पाठविण्यास सुरुवात करतात या सर्वांची परिणती शेवटी आर्थिक पेचप्रसंगामध्ये होते.

अशा प्रकारच्या घटना, उदाहरणार्थ, किएव रशियाच्या काळात आढळून येतात. या राज्याची वित्तव्यवहार व्यवस्था चांगलीच विकसित झालेली होती. पूर्वेकडील मुसलमान देशांमधून आणि विशेषत: मध्य आशियातून व्यापारी चांदीची नाणी घेऊन येत असत. बाजारामध्ये त्यांचे वजन बरेच होते. यामुळे, या व्यवहारामुळे या राज्यात अरब दिरहेमचे – मोठ्या चांदीच्या नाण्यांचे – मोठाले साठे उपलब्ध झाले. परंतु ११ व्या शतकाच्या अखेरीस पूर्वेकडील देशांमध्ये चांदीची टंचाई निर्माण झाली. आजतागायत आपणाला या टंचाई मागील कारणांची माहिती नाही. कदाचित पूर्वयुरोपीय देशांमध्ये प्रचंड प्रमाणात चांदी आणण्यात आली होती व त्यामुळे पूर्वेकडील चांदी कमी कमी होत गेली असावी. आता पूर्वेकडील देशांमधून रशियाकडे वाहणारा चांदीच्या नाण्यांचा ओघ बंद पडला. याचा परिणाम काय

झाला? बाजारात लागलीच चांदीची एक धातु म्हणून टंचाई निर्माण झाली. चांदीच्या नाण्यांकरिता त्यांच्या असलेल्या मूळ मूल्यापेक्षा कितीतरी जास्त मूल्य बाजारात दिले जाऊ लागले. शेवटी तर चांदी बाजारातून गायब झाली. आता तिला संपत्तीचे, ऐवजाचे स्वरूप प्राप्त झाले. लोक चांदीची नाणी वितळून त्याच्या लड्या बनवू लागले, मौल्यवान भांडी वगैरे सारख्या गोष्टी बनवू लागले. रशियामध्ये बिननाण्यांचा कालखंड सुरू झाला व या वेळी नाण्यांची जागा माळा व इतर मौल्यवान वस्तूंनी घेतली.

नाण्यांच्या हानीमुळेदेखील चांदीची टंचाई उत्पन्न होण्याला प्रत्यक्षात मदत मिळाली. लोकांनी नाणी लपवून ठेवू नये व चांदीची नाणी व्यवहारातून काढून घेऊ नये म्हणून राज्य-कर्त्यांनी त्यांचे मूल्य वाढविण्याचा प्रयत्न केला. त्यांनी असा अंदाज केला की जर अधिक हलकी नाणी पाडली आणि सोने, तांबे किंवा इतर वस्तूंचे तेच मूल्य या नाण्यांच्या रूपात टिकवून ठेवले तर नाण्यांमधील चांदीचे मूल्य वाढेल आणि त्यांचा व्यव-हारात वापर केला जाईल, मग यासाठी बळजबरी करावी लागली किंवा ही नाणी न घेणाऱ्याना शिक्षा द्यावी लागली तरी चालेल. परंतु हे सारे राजे आणि त्यांचे वित्त सल्लागार – सर्वच – सरंजाम होते व प्रत्येक गोष्टीतून नफा मिळविण्याची छोटीशी संधीदेखील ते कधीही सोडत नसत. बहुतेक वेळी या पेचप्रसंगातून बाहेर पडण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रमाणापेक्षा कितीतरी अधिक कमी प्रमाणात नाण्यांतील चांदीचे प्रमाण कमी केले जात असे. समतोलपणा क्वचितच आढळून येई. आपणाला दिसून येतच आहे की राज्यकर्त्यांनी या पेचप्रसंगामधूनही प्रथम आपला फायदा कोठे व कसा होईल याचाच शोध घेतला. यामुळे लोकही अनेक

वेळा ही नाणी स्वीकारण्यास नकार देत असत. पूर्वेकडील देशांमध्ये तर काही असेही प्रसंग घडले की पूर्ण मूल्य लिहिलेले पैसे – कागदीनोटा – सुरू करण्यात आले. त्यांचे प्रत्यक्ष मूल्य नगण्य असे, जवळ जवळ काहीच नसे, परंतु त्यावर लिहिलेले मूल्य मात्र कितीतरी जास्त असे. अशाप्रकारचे पैसे केवळ आजच्या नव्या परिस्थितीत शक्य आहेत कारण आज वित्तपद्धतीचा आणि उधारीव्यवस्थेचा पूर्ण विकास झालेला आहे. मध्ययुगीन काळामध्ये अशा नोटा, कागदी पैसे सुरू केले जात असत परंतु नियमानुसार, सर्व प्रयोगांची परिणती शेवटी अर्थव्यवस्था कोलमडण्यामध्ये आणि जनतेच्या उठावामध्येच होत होती.

नाण्यांच्या वजनामध्ये घट हे मध्ययुगाचे एक खास वैशिष्टच आहे. मुद्राशास्त्राने अनेक मालिकांमधील नाण्यांची वजने करून हे उत्कृष्टरित्या दाखवून दिलेले आहे. नाण्यांच्या वजनांची नोंद करणे ही मुद्राशास्त्रातील एक आवश्यक व महत्त्वाची बाब आहे. कारण नाणे हा सर्वप्रथम धातूचा एक तुकडा आहे आणि त्यामध्ये असलेल्या धातूच्या वजनानुसार त्याचे मूल्य असते. अनेक नाण्यांची नावे ही त्यांच्या वजनांच्या एककावरून प्रचलित झालेली आहेत. नाण्यांच्या वजनाचा आणि वजनांच्या एककांशी असलेल्या त्यांच्या संबंधांचा अभ्यास करणाऱ्या मुद्राशास्त्राच्या शाखेला मुद्राशास्त्रीय मापनपद्धती असे म्हणतात.

मुद्राशास्त्रीय मापनपद्धतीचा आणि हजारो नाण्यांच्या वजनांची नोंद करण्याच्या कंटाळवाण्या कामाचा संबंध मुद्राशास्त्रातील इतर समस्यांशी आहे. असे दिसून येते की एखाद्या काळी कोणत्या धातूंची गणना नाण्यांकरिता वापरल्या जाणाऱ्या धातूंमध्ये केली जात असे, एकधातूय किंवा द्विधातूय – कोणती पद्धत या काळी

अस्तित्वात होती, चांदी आणि सोन्याचे किती साठे या काळात उपलब्ध होते, खाणींमधून या धातूंचे किती उत्पादन केले जात असे व त्यापैकी किती धातु व्यवहारामध्ये वापरात येत होता, बाजारामधील चांदीची आणि सोन्याची सापेक्ष किंमत या वेळी किती होती आणि ही किंमत व नाण्यांच्या धातूंचे मूल्य यामधील या परस्परसंबंधाला एककांच्या वित्तव्यवस्थेमध्ये कशा प्रकारे संघटित केले जात असे – या सर्व गोष्टींवर नाण्याच्या धातूची हानी व बऱ्याच वेळा नाण्यांच्या वजनांच्या एककांची निवड अवलंबून असे.

नाण्यांच्या व्यवहाराच्या व वित्तव्यवस्थेच्या नियमांचा अभ्यास करून मुद्राशास्त्र आपल्या सर्व वस्तुस्थितीचे संघटन करून इतर ऐतिहासिक अभ्यास शाखांचे लक्ष वेधून घेत नाही, तर मुद्राशास्त्रीय वस्तुस्थिती व ऐतिहासिक घटना यांच्या दरम्यानच्या पारस्पर संबंधांविषयी सिद्धांताची उभारणी करते.

प्राचीन रशिया

वित्तव्यवहारामध्ये आणि वित्तदेवाणघेवाणीमध्ये सर्व गोष्टी एकमेकींशी संबंधित असतात हे आता स्पष्ट झालेच आहे. नाण्यांवरील मुद्रणाचे संशोधन आणि या नाण्यांच्या नावांच्या विश्लेषणाबरोबरच त्यांच्या वजनांचा अभ्यास केला जातो. पैशांच्या साठ्यांचा अभ्यास केल्याशिवाय आपणाला प्राचीन नाण्यांच्या आणि त्यांच्या वजनांच्या पद्धतींचा व त्यांच्या पुनर्उभारणीचा अभ्यास करता येणे शक्य नाही. उदाहरणादाखल या प्रकरणामध्ये आपण प्राचीन रशियामधील पैशांच्या आणि नाण्यांच्या इति-

हासातील तीन घटनांचा विचार करू, ज्या आपणाला दाखवून देतात की सर्वांगीण अभ्यासामुळे नाण्यांचे रूपांतर अमूल्य ऐतिहासिक माहिती साधनांमध्ये कसे होते.

किएवकालीन रशियामधील पैशांची एकक पद्धती

शंभर कोपेकचा मिळून एक रूबल बनतो. २० शिलींगाचा एक ब्रिटिश पौंड बनतो तर एक शिलींग १२ पेन्सचा असतो. आता अतिप्राचीन ग्रीसवर नजर टाकू. अथेन्स ज्याची राजधानी होती त्या एट्टीकमधील नाणेव्यवस्था अशी होती: साठ मिनाचा एक टॅलन्ट; १०० द्राखमाचा एक मिना; सहा ओबोलचा एक द्राखमा तर आठ (कधी कधी सहा) हाल्कचा एक ओबोल आणि हाल्कचे विभजन अनेकदा लेप्टामध्ये केले जाई.

वरील सर्व तिन्ही बाबतीत आपणाला एक गोष्ट समान आढळून येत ती म्हणजे ज्यास मुद्राशास्त्रामध्ये पैशांची मोजणी पद्धती म्हणतात ती होय. मुद्राशास्त्रातील ही एक महत्त्वाची गोष्ट आहे. प्रत्येक मोजणी पद्धतीमध्ये एक मूलभूत एकक मानला जातो: रशियन पद्धतीमध्ये रूबल, ब्रिटिश पद्धतीमध्ये पौंडस्टर्लिंग आणि प्राचीन ॲट्टीक पद्धतीमध्ये द्राखमा. पैशांच्या दुनियेतील या अत्यंत महत्त्वाच्या 'व्यक्ती' आहेत. त्यांच्या नावानेच अनेकदा संपूर्ण पद्धतींचा उल्लेख केला जातो: रुबल पद्धती, ब्रिटिश पौंड पद्धती किंवा अमेरिकन डॉलरचे प्रभाव क्षेत्र, स्टर्लिंग क्षेत्र (पौंड-स्टर्लिंग) इत्यादी. इतर सर्व एककांची निर्मिती या मूलभूत पायावर केलेली असते. कोपेक, सेंट, फेनींग इत्यादी एकके म्हणजे अनुक्रमे रुबल, डॉलर, मार्क यांचे शंभरावे भाग असतात.

आधुनिक जगातील सर्व देशांतील नाणे – पद्धतींची सूक्ष्म माहिती

देणारे साहित्य आज उपलब्ध आहे. परंतु एखाद्या देशाच्या प्राचीन नाणे-पद्धतीतील बारकावे जाणून घ्यावयाचे असतील तर काय करावे लागेल?

एखाद्या देशाच्या प्राचीन नाणे-पद्धतीची पुनर्उभारणी करण्यामध्ये येणाऱ्या अडचणी आणि समस्या जाणून घेण्यासाठीच नव्हे तर एकंदरीत इतिहासाच्या दृष्टीने या अभ्यासाचे असलेले महत्त्व जाणून घेण्यासाठी आपण एका मुद्राशास्त्रीय रहस्याचा उलगडा कसा करण्यात आला ते पाहू या. हे रहस्य, कोडे सोडविण्याचे श्रेय मिळाले ते विख्यात सोविएत शास्त्रज्ञ व्ही. एल्. यानीन यांना.

११ व्या आणि १२ व्या शतकांमध्ये रशियन कायद्यानुसार कायदाभंग केल्याबद्दल व इतर गुन्ह्यांबद्दल एका ठराविक दंडाची शिक्षा होती. उदाहरणार्थ, चोरी आणि घोड्याला ठार मारल्याबद्दल दोन ग्रिव्हने दंड द्यावा लागत असे. घोडीच्या हत्येबद्दल – ६० रेजान, बैलाच्या हत्येबद्दल – एक ग्रिव्हना, गो हत्येबद्दल – ४० रेजान तर बकऱ्याला ठार मारल्याबद्दल एक नोगाता दंड म्हणून द्यावे लागत असत. नोगाता, ग्रिव्हना, कुना, रेजाना म्हणजे काय? थोड्या फार प्रमाणात आपणाला ठाऊक असलेले एकक म्हणजे ग्रिव्हना.

आता सर्वांना ठाऊक आहे की घोड्याची किंमत बकऱ्यापेक्षा जास्त असते आणि घोडीची किंमत गायीपेक्षा अधिक. "रशियन सत्य" या प्राचीन रशियन कायदापुस्तकामध्ये गुरांचा अनुक्रम महाग जनावरांपासून स्वस्त असलेल्या जनावरांप्रमाणे आहे. यावरून आपणाला पुढील निष्कर्ष काढता येतो: दोन ग्रिव्हनांचे मूल्य ६० रेजानांहून जास्त आहे, ६० रेजानांचे मूल्य एक ग्रिव्हनाहून जास्त आहे; एक ग्रिव्हनाचे मूल्य ४० रेजानांहून जास्त

आहे ; एक ग्रिव्हनाचे मूल्य १५ कुनांहून जास्त आहे ; १५ कुनांचे मूल्य अर्ध्या ग्रिव्हनाहून जास्त आहे, अर्ध्या ग्रिव्हनाचे मूल्य ५ रेजानांहून जास्त आहे व १५ रेजानांचे मूल्य एक नोगाताहून जास्त आहे.

एका ग्रिव्हनाचे मूल्य १७ नोगातांइतके किंवा १७ कुनांइतके असावे असा अंदाज करणेही जरा कठीणच आहे. आपल्या अंदाजाप्रमाणे शक्यतो, ग्रिव्हनाचे मूल्य पूर्णांकामध्ये असेल कारण ग्रिव्हनाचे मूल्य ६० रेजानांपेक्षां कमी व ४० रेजानांपेक्षा जास्त आहे म्हणून आपण असा तर्क करू शकतो की ग्रिव्हनाचे मूल्य ५० रेजाना इतके आहे.

नाण्यांच्या नावांच्या या गोंधळांमधून आपणाला एक अचूक गोष्ट ठाऊक होते की १ ग्रिव्हनाचे मूल्य ५० रेजाना इतके होते.

या गोष्टीच्या आधारावर शेवटी आपण पुढील निष्कर्ष काढू शकतो : १ ग्रिव्हना–२० नोगाता–२५ कुना–५० रेजाना. ही गोष्ट आपणाला अगदी गेल्या शतकामध्येच आढळून आलेली आहे. परंतु ही गोष्ट फक्त नाणे-पद्धतीची माहिती करून घेण्याकरिता किंवा तिची पुनर्रचना करण्याचीच नाही. एकंदरीत आपणाला वित्त-वजन पद्धतीची पुनर्रचना करावयाची आहे.

मुद्राशास्त्रामध्ये वित्तवजन व्यवस्थेचे महत्त्वदेखील फार मोठे आहे. या व्याख्येची व्याप्ती फार मोठी आहे. प्राचीन काळामध्ये कागदाच्या स्वरूपात पैसे नव्हतेच. सर्व नाणी ही धातूंपासूनच बनविण्यात येत असत आणि नियमानुसार त्याचे मूल्य हे त्यामध्ये असणाऱ्या मौल्यवान धातूच्या वजनावर अवलंबून असे. जेव्हा आपण म्हणतो की एका ग्रिव्हनाचे मूल्य २० नोगाता इतके होते, याचा अर्थ असा होतो की तराजूच्या एका पारड्यात चांदीचे

१ ग्रिव्हनाचे नाणे घातल्यास समतोल होण्यासाठी दुसऱ्या पारड्यात २० नोगातांची नाणी घालावी लागत असत.

अशा प्रकारे वित्तवजन पद्धतीमध्ये केवळ पैशांचाच विचार केलेला नसतो तर वित्त एककांच्या वजनांना देखील विचारात घेतले जाते. जेव्हा शास्त्रज्ञांनी प्राचीन रशियाच्या वित्तवजन व्यवस्थेचा अभ्यास करावयास सुरुवात केली तेव्हा अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. असे वाटत होते की या अडचणींवर मात करता येणे शक्यच नाही. सर्वात पहिली अडचण निर्माण केली ती नाण्याच्या नावांनी.

कुना? अर्थात हा शब्द आला होता कुनीत्सा (छोटेसे हिंस्त्र जनावर) याचे कातडे यापासून. त्यावेळी रशियाच्या शेजार देशांमध्ये आणि विशेषतः पूर्वेस हे कातडे मौल्यवान समजले जाई. परंतु नोगाता म्हणजे काय? कदाचित, प्राण्यांच्या पाय किंवा खुराच्या भागातील चमड्यावरून हा शब्द प्रचलित झाला असावा? एक छोटेसे एकक वेकशा किंवा वेरेनित्सा हे खारीचे चमडे होते.

कुनाची तुलना कुनीत्सा या हिंस्त्र जनावराच्या चमड्याशी करण्याचा विचार हा शेवटी यशस्वीच ठरला. अनेक स्लाविक भाषामध्ये 'कुना' या शब्दाचा अर्थ 'कुनीत्सा' असाच होतो. परंतु अनेक शास्त्रज्ञांचे असे मत होते की कुना आणि नोगाता ही धातूंची नाणी होती. पण जर ही गोष्ट खरी असेल तर ते धातु कोणते? विसाव्या शतकाच्या सुरुवातीस सुरू केलेल्या मोठ्या संशोधनाच्या शेवटी असे सिद्ध करून दाखविण्यात आले की १४ व्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये रशियात चांदीची व तांब्याची नाणी पाडावयास सुरुवात झाली होती. जर असे असेल तर प्राचीन

रशियामध्ये धातूची नाणी कशी काय वापरात आणली जात असत? प्राचीन रशियातील चांदीची नाणी आपणाला ज्ञात आहेत. एकंदरीत काळानुसार ती तशी वाटतात खरी. मुद्राशास्त्राने ती नाणी दहाव्या व अकराव्या शतकातील असल्याचे सिद्ध केले आहे. परंतु अशा प्रकारची फारच थोडी नाणी उपलब्ध आहेत. प्राचीन रशियासारख्या मोठ्या देशाच्या व्यापारी उलाढालीमध्ये व वित्तव्यवहारामध्ये ही नाणी वापरली जात काय? प्राचीन रशियाच्या प्रदेशामध्ये सापडणारी त्या काळातील इतर नाणी तर व्यवहारात वापरली जात नसावीत? शेवटी असे आढळून आले की अशा प्रकारची नाणी अस्तित्वात आहेत.

प्राचीन रशियाच्या प्रदेशामध्ये मोठ्या प्रमाणात पूर्वेकडील नाण्यांचे साठे सापडतात. हे साठे आहेत चौथ्या, पाचव्या, दहाव्या आणि अकराव्या शतकातील. परंतु प्राचीन रशियाच्या प्रदेशामध्ये फक्त पूर्वेकडील नाणीच व्यवहारात नव्हती. अकराव्या आणि बाराव्या शतकांमध्ये हजारो पश्चिम युरोपीय नाण्यांनी प्राचीन रशियामध्ये प्रवेश केला. मध्ययुगातील पश्चिम युरोपीय नाण्यांचा अभ्यास करणाऱ्या मुद्राशास्त्रज्ञांना या नाण्यांचे बरेचसे साठे ठाऊक आहेत.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीस प्राचीन रशियामध्ये अस्तित्वात असणाऱ्या कुना, नोगाता आणि रेजाना या नाण्यांसंबंधी रशियन, पाश्चात्य आणि पूर्वेकडील मुद्राशास्त्रज्ञांमध्ये वादविवाद चालू होता. रशियाच्या वित्त-वजन व्यवस्थेचा उगम पूर्वेकडून झाला असे मानणाऱ्या शास्त्रज्ञांचा असा दावा होता की रशियाच्या आर्थिक जीवनामध्ये रशियन-पूर्व व्यापारी संबंधाचे मोठे वर्चस्व होते. त्यांनी असे प्रतिपादन केले की ग्रिव्हनाने पूर्वेकडून रशियात प्रवेश केला तर कुना आणि नोगाता ही दुसरी तिसरी कोणतीही



पूर्वेकडील दिरहेमचा एक तुकडा.

नसून अरब नाणी होती. मग रेजानाच्या बाबतीत काय? अरब नाण्यांच्या साठ्यांमधून अनेक नाण्यांचे तुकडे आढळतात. यावरून असे म्हणता येते की जर पैसे वजनानुसार दिले-घेतले जात असत तर आवश्यक वजनाची चांदी देण्यासाठी, किंवा आवश्यक वजन प्राप्त करण्यासाठी पूर्ण नाण्यांबरोबरच त्यांच्या तुकड्यांचा वापर केला जाई. या मुद्राशास्त्रज्ञांच्या मते नाण्यांच्या या तुकड्यांनाच रेजाना म्हणत असत. नाण्यांचे हे तुकडे म्हणजे अरब नाण्यांचे भाग आहेत हे सिद्ध करून दाखविण्यासाठी ए. आय. चेरेपनीन या शास्त्रज्ञांनी मोठे किचकट काम पार पाडले. अशा प्रकारच्या हजारो तुकड्यांच्या वजनांची त्यांनी नोंद केली. दिरहेम या अरब नाण्याच्या १/३, १/४, १/८, १/१२, १/२४ आणि अगदी १/४० भागांइतक्या वजनाच्या नाण्यांच्या तुकड्यांचे त्यांनी वर्गी-करण केले. या तुकड्यांचे जितके जास्त वजन ते करत गेले तेवढ्याच तीव्रतेने त्यांना एक गोष्ट स्पष्ट होत गेली की या तुकड्यांमध्ये कोणत्याही प्रकारची पद्धती दडलेली नाही.

काही मुद्राशास्त्रज्ञांचे मत होते की ग्रिव्हनाचा उगम पश्चिमे-कडून झालेला आहे. स्कँडिनाव्हीयातून आलेल्या नोर्मनांनी प्राचीन

रशियन राज्याची स्थापना केली व नोर्मनांच्या मुळेच रशियन संस्कृतीचा विकास झाला. या नोर्मनवादी इतिहासकारांच्या सिद्धांतांचा या शास्त्रज्ञांवर पगडा होता ही गोष्ट विसरून चालणार नाही.

उपलब्ध असलेल्या ऐतिहासिक साहित्याचा अभ्यास करून मगच वस्तुस्थितीपासून ठराविक सामान्य विधान करता येते, उलट नाही. पाचव्या शतकामध्ये ग्रीक लोकांशी झालेल्या करारामध्ये रशियन ग्रिव्हनाचा उल्लेख करण्यात आला आहे त्याचा आता थोडासा, उदाहरणादाखल विचार करू. या करारासंबंधीच्या कागदपत्रांवरून असे दिसून येते की १२ ग्रिव्हना ५ बाझेंटाईन लिटर बरोबर होते. बाझेंटाईन लिटर सर्वांच्या परिचयाचा आहेच. तो ३२७. ४५६ ग्राम इतका होता. यावरून असे दिसून येते की ग्रिव्हनाचे वजन होते १३६.४४ ग्राम, कुनाचे ५.४५ ग्राम, नोगाताचे ६.८२ ग्राम व रेजानाचे २.७२ ग्राम.

परंतु ही नाणी प्राचीन रशियाच्या प्रदेशामध्ये कधीच वापरात आली नाही. हिशोबामध्ये काहीतरी चूक होती. आणि खरोखरच, असे आढळून आले की बाझेंटाईन लिटर व्यतिरिक्त (३२७.४५६ ग्राम) दुसरे एक लिटर अस्तित्वात होते. ते प्राचीन रशियाच्या दृष्टीने अधिक संवयीचे होते व त्याचे वजन बाझेंटाईन लिटरच्या बरोबर निम्मे होते – म्हणजेच १६३.७२८ ग्राम. ही गोष्ट विचारात घेता: ग्रिव्हनाचे वजन होते ६८.२२ ग्राम, कुनाचे – २.७३ ग्राम, नोगाताचे – ३.४१ ग्राम, रेजानाचे – १.३६ ग्राम. हा सैद्धांतिक विचार जर पडताळून पहावयाचा असेल तर हाती तराजून घ्यायला हवा. प्राचीन रशियाच्या प्रदेशामध्ये ९ व्या व १० व्या शतकांमध्ये व्यवहारात असलेल्या हजारो नाण्यांचे वजन करता असे आढळून आले की काही नाण्यांचे

वजन २.७–२.८ ग्राम व इतर नाण्यांचे वजन ३.४–३.५ ग्रामच्या आसपास केंद्रित झाले आहे.

या अर्थी पहिल्या गटातील नाणी ही कुना होती, ज्यांचे सैद्धांतिक वजन २.७३ ग्राम होते तर दुसऱ्या गटातील नाणी नोगाता होती त्यांचे सैद्धांतिक वजन ३.४१ ग्राम होते. १० व्या शतकाच्या अखेरीस रेजाना हे नाणे अस्तित्वात आले. ही नाणी म्हणजे ग्रिव्हना नाण्यांच्या, त्याच्या वजनाच्या १/५० भागाचा तुकडा होता.

योगायोग खरोखरच विलक्षण आहे. प्राचीन रशियाच्या कायद्याच्या पुस्तकात दिलेली वित्तव्यवहाराच्या पुनर्रचनेसंबंधीत माहिती किंवा ग्रीस बरोबरील करारामध्ये अंतर्भूत असलेला पैशांचा हिशोब जर खोटा किंवा बेआधार असता अथवा जर आपण बाझेंटाईन लिटरचे चुकीचे वजन गृहित धरले असते तर आपली चूक आपणाला लागलीच दिसून आली असती. परंतु सर्व गोष्टींचा अचूक मेळ बसला असल्यामुळे आपणाला कुना, नोगाता आणि ग्रिव्हनाचे वजन बरोबर आहे असे साधार म्हणता येईल.

प्राचीन दस्तऐवज, प्रतिकृती आणि खुद्द नाण्यांच्या वजनासंबंधित माहितीची तुलना करण्याच्या पद्धतीच्या आणि त्याचप्रमाणे सैद्धांतिकरित्या प्राप्त झालेल्या नाण्यांच्या वजनांची अचूकता नाण्यांचे प्रत्यक्ष वजन घेऊन तपासून पाहण्याच्या पद्धतीच्या परिणामाचे फळ म्हणजे आज आपणाला या नंतरच्या काळातील वित्तपरिमाण पद्धतीची पुनर्रचना करणे शक्य झाले आहे.

सैद्धांतिक मूल्ये आणि प्रत्यक्ष मूल्ये यांची तुलना करण्याच्या पद्धतीमुळे ११ व्या आणि १२ व्या शतकातील रशियाच्या वित्तव्यवहार पद्धतीची पुनर्रचना करणेदेखील शक्य झाले आहे.

असे आढळून आले आहे की १० व्या शतकाच्या उत्तरार्धात एका संयुक्त रशियन वित्तपद्धतीच्या जागी दोन पद्धतींचा उगम झाला. त्या वित्तपद्धती म्हणजे उत्तर रशियन वित्तपद्धती आणि दक्षिण रशियन वित्तपद्धती होय. उत्तरेकडील वित्त-परिमाण पद्धतीमध्ये पश्चिमेकडील नाणी महत्त्वाची भूमिका बजावीत होती.

इतिहासाच्या दृष्टीने नाणी म्हणजे एक स्मृतीचिन्ह आहे. प्राचीन वित्तव्यवहाराची आणि व्यापाराची ती एक जिवंत खूण आहे. कोठे, कशाप्रकारे व केव्हा व्यापाराचा विकास झाला? जीवनाच्या सर्व क्षेत्रांमधून वित्तव्यवहारांचा किती प्रमाणात शिरकाव झाला होता व शेवटी कोणती अवस्था त्याने गाठली होती? या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी शास्त्रज्ञ धडपडत असतात. आणि मुद्राशास्त्राशिवाय इतिहासशास्त्राची कोणतीही शाखा ह्या कोड्यांचा पूर्णपणे उलगडा करू शकत नाही.

प्राचीन रशियन वित्त-परिमाण पद्धतीवर करण्यात आलेल्या संशोधनातून आपणाला काय माहिती मिळते ते आता पाहू.

सर्वप्रथम ही गोष्ट स्पष्ट झाली की रशियामध्ये ९ व्या शतकापासून विकसित वित्तव्यवहार पद्धती अस्तित्वात होती. दुसरी गोष्ट म्हणजे पैशाच्या हिशोबाची पद्धत रशियात स्वतंत्रपणे उदयास आली. पूर्वेकडील किंवा पश्चिमेकडील देशांमधून नव्हे. ९ व्या शतकापासून १२ व्या शतकापर्यंत रशियामध्ये मूलभूत नाण्यांच्या स्वरूपात असलेल्या विदेशी नाण्यांचे वजनदेखील वित्तव्यवहार पद्धतीमध्ये विचारात घेतले जात असे. परंतु पैशाची मापन पद्धती – ग्रिव्हना, कुना, रेजाना आणि नोगाता पद्धती – ही मूळची रशियनच होती. तिसरी गोष्ट म्हणजे १० व्या शतकामध्ये व्यापार आणि वित्तव्यवहाराने विकासाची इतकी उच्च पातळी



प्राचीन रशियामधील नाणी पाडण्याचा उद्योग.

गाठली होती की दोन वेगवेगळ्या वित्त-परिमाण पद्धती – उत्तर वित्त-परिमाण पद्धती आणि दक्षिण वित्त-परिमाण पद्धती निर्माण करण्याची आवश्यकता उत्पन्न झाली. स्थानिक परिस्थिती विचारात घेता व संयुक्त रशियन पद्धतीशी तुलना करता ह्या पद्धती अधिक सोयीस्कर होत्या.

किएव-रशियामधील या पद्धतीची निर्मिती म्हणजे रशियातील संरजामशाहीच्या विभाजनाचा प्रारंभ होता. अशाच प्रकारे कार्ल-दि-ग्रेटच्या साम्राज्याचे अनेक छोटचा छोटचा व जवळजवळ स्वतंत्र अशा राज्यांमध्ये विभाजन झाले आणि वित्तव्यवहाराचे शेवटी विकेंद्रीकरण झाले.

रशियाची मुक्तता

९ व्या शतकापासून ११ व्या शतकापर्यंत अरब आणि पश्चिम-युरोपियन नाण्यांचा व्यवहारात वापर केला जात होता. त्यानंतर स्वतःची नाणी पाडण्यास सुरुवात झाली. परंतु त्यानंतरचा १२ व्या शतकापासून १४ व्या शतकापर्यंतचा काळ हा रशियामधील बिन-नाण्यांचा काळ ठरला. केवळ १३८० साली द्मीत्रीय दोनस्कोयने प्रथम मॉस्को, नोवगोरद आणि ऱ्याजानमध्ये व त्यानंतर इतर संस्थांनांमधून स्वतःची नाणी पाडण्यास सुरुवात केली.

१४ व्या शतकामधील आणि १५ व्या शतकाच्या पूर्वार्धामधील नाण्यांवरील मुद्रण आणि एकंदरीत त्यांचे स्वरूप अगदी विभिन्न होते. काही नाण्यांवर टांकसाळीतील कारागिराच्या हातात हातोडा आणि शिक्का घेतलेले चित्र आढळून येते तर काही नाण्यांवर हातात तलवार घेतलेल्या दोव्हमोंट राजाचे चित्र दिसून येते.

अनेक नाण्यांवर दंतकथांमधील सिंहासनावर आरूढ, हाती



१५ व्या शतकातील एक नाणे.

तलवार घेतलेल्या राजकुमाराचे चित्र आढळून येते. इतिहासकारांच्या आणि मुद्राशास्त्रज्ञांच्या दृष्टीने मॉस्कोची १४ व्या आणि १५ व्या शतकातील ही सुवर्ण नाणी अत्यंत महत्त्वाची आहेत. आता या नाण्यांचे थोडे निरीक्षण करू.

१५ व्या शतकातील सर्व रशियन नाण्यांच्या एका बाजूवर अरब मुळाक्षरात "सुलतान तोखतामिश" असे लिहिल्याचे दिसून येते व केवळ दुसऱ्या बाजूवर रशियन भाषेत रशियन राजांचे नाव, पद लिहिल्याचे दिसते.

असा तर्क केला जातो की १४ व्या शतकामध्ये रशियाने बतीय खानाची वित्तव्यवहार पद्धती स्वीकारली होती आणि केवळ यामुळेच बिननाण्यांच्या काळावर मात करण्यात आली होती.


परंतु जेव्हा रशियन आणि या नाण्यांच्या प्रसाराचा अभ्यास करण्यात आला म्हणेजच ज्या ज्या ठिकाणी ही नाणी सापडली त्या ठिकाणांच्या आधारावर नकाशा तयार करून जेव्हा शोध घेण्यात आला तेव्हा असे आढळून आले की रशियाच्या प्रमुख भागांमध्ये आणि विशेषत: मॉस्को आणि सुझदल-निझेगोरदच्या प्रदेशांमध्ये ही नाणी पोहोचली नव्हती. आणि जर पोहोचली

असतील तरी देखील अत्यंत अल्पप्रमाणात आणि तीसुद्धा या प्रदेशांच्या सीमा रेषांवरच. या गोष्टीमुळे रशियन नाण्यांचा उगम ओर्दीटोळयांच्याद्वारे झाला आहे या सिद्धांताला आव्हानच दिले गेले.

याचप्रमाणे या नाण्यांच्या वजनांमुळेसुद्धा या सिद्धांताच्या बाबतीत शंका निर्माण होते. रशियन नाण्यांच्या वजनाची ओर्दी-टोळयांच्या काळातील चांदीच्या नाण्यांच्या वजनांशी तुलना करता प्रचंड फरक असल्याचे आढळून येते.

फक्त नाण्यांची नावे मात्र ततारियन होती: "देनगा"ची उत्पत्ती पूर्वेकडील "दानीक" (एखादा एककाचा १/६ भाग) या शब्दापासून झाली होती; "अल्तीन' – सहा दानीक – ततारियन पैशांचे एकक होते; "पुल" – रशियन आणि ओर्दीटोळयांमध्ये तांब्याचे एक नाणे होते. वरील सर्व नाण्यांची उत्पत्ती पूर्वेकडील भाषांमधून झालेली होती. रशियन वित्तव्यवहारातील नाण्यांच्या पुल, देनगा, अल्तीन – अशा नावांवरून संपूर्ण रशियन वित्तव्यवहार पद्धती ओर्दीटोळयांद्वारे निर्माण करण्यात आलेली होती, असे मानणे योग्य ठरणार नाही. रशियन नाण्यांवर तोखतामिश खानाचे नाव लिहिले जातच होते. असे बोलले जाई की ओर्दीटोळयांच्या दिरहेम नाण्यांची हुबेहुब नक्कल म्हणजे रशियन नाणी होती. परंतु संशोधनातून असे निष्पन्न झाले होते की ओर्दी-टोळयांची नाणी मॉस्कोच्या प्रदेशात अत्यंत कमी प्रमाणात पोहोचली होती. जेव्हा ही नाणी निरनिराळया प्रदेशात वापरली जात होती तेव्हा ओर्दीटोळयांच्या नाण्यांची नक्कल करण्याची गरज

१४ व्या आणि १५ व्या शतकाच्या प्रारंभीच्या रशियन, ओर्दी व पश्चिम – युरोपीय नाण्यांचा प्रसार.


250 0 250 500
मॉस्को
रशियन
नाण्यांच्या प्रसाराचा प्रदेश
ओर्दी
पश्चिम युरोपीय

रशियन किंवा मॉस्कोच्या टांकसाळ्यांना का पडावी? काही रशियन नाण्यांवर दिरहेमची नक्कल करण्यात येत होती तर काही नाण्यांवर खानाचे नाव व पद लिहिले जाई असे का? शेवटी, केवळ एकच खान आपले नाव रशियन नाण्यांवर लिहिण्यात यशस्वी कसा झाला आणि ते देखील फक्त मॉस्कोच्या संस्थानाच्या नाण्यांबाबतच कसे?

नंतर असे आढळून आले की नाण्यांवरील अरब छाप ही ओर्दीटोळयांपासूनच्या उत्पत्तीची छाप नव्हती तर रशिया राजकीयदृष्टया या टोळयांवर किती अवलंबून होता याचा हा पुरावा आहे. तेराव्या आणि चौदाव्या शतकामध्ये या ओर्दीटोळयांच्या दडपशाहीखाली रशिया गुदमरून गेला होता. शेवटी इ.स.१३८० साली रशियन सैन्याने कुलिकोव क्षेत्र येथे झालेल्या संग्रामामध्ये ओर्दीटोळयांवर गंभीर आघात केला.

द्मीत्रीय दोनस्कोयच्या नेतृत्वाखाली मॉस्कोने पुनर्जीवनाच्या दिशेने वाटचाल सुरू केली, ओर्दीटोळयांच्या सत्तेखाली असलेल्या रशियन भूमीची मुक्तता केली जाऊ लागली. निर्णायक संग्रामामध्ये रशियाने विजय मिळविला आणि हे वृत्त संपूर्ण जगभर पसरले. ओर्दीटोळयांच्या साखळदंडातून, रशियन भूमीची मुक्तता करण्याच्या कार्याला प्रारंभ झाला.

परंतु इ.स.१३८२ साली ओर्दीटोळयांच्या नव्या खानाने – तोखतामिशने – पुन्हा मॉस्कोवर हल्ला चढवला. लूटमार करून राजधानी ताब्यात घेतली व द्मीत्रीय दोनस्कोयला पुन्हा आपल्या पकडीत घेतले. दोनस्कोयच्या प्रारंभीच्या नाण्यांवर या दुर्दैवी घटनेचे चित्रण आढळून येते. नव्या आर्थिक आणि राजकीय विकासाचे तसेच स्वतंत्र्याचे प्रतीक म्हणून स्वतःची नाणी पाडण्यास दोनस्कोयने जी सुरुवात केली त्यास खान प्रतिबंध करू शकला

नाही. पण नाण्यांच्या दुसऱ्या बाजूवर असा मजकूर लिहिण्यास त्याला भाग पाडले गेले की ज्यावरून रशिया अद्यापि ओर्दीटोळयांच्या अधिपत्त्याखाली आहे, पारतंत्र्यात आहे त्याची साक्ष पटे. तथापि, या परावलंबनाचा शेवट केव्हाच झाला होता. सुझदल-निझेगोरदचा राजकुमार द्मीत्रीय कोन्स्तानतिनोविच आणि त्याच्या मुलांनी मात्र आपल्या नाण्यांवर ओर्दीटोळयांच्या दिरहेमची पुसटशी नक्कल केली होती, त्यावरील मजकूर वाचता येण्याजोगा नव्हता, ते परावलंबनाचे केवळ एक सवसाधारण प्रतीक होते. आणि द्मीत्रीय दोनस्कोयने मात्र तोखतामिशचे नाव मोठ्या व ठळक अक्षरात आपल्या नाण्यांवर लिहिले होते.

आपली स्वत:ची नाणी पाडणाऱ्या या दोन रशियन राजांच्या नाण्यांच्या स्वरूपामध्ये इतका फरक का असावा?

द्मीत्रीय दोनस्कोयचा दर्जा खास होता. ईशान्य रशियेकडील रशियन राजे व्लादीमिर संस्थानाचा महाराजा बनण्याची महत्त्वकांक्षा बाळगून होते. या पदाचा खास मान होता आणि आगळे, खास स्थान होते. इतर राजांच्या नेत्याला, वरिष्ठ राजाला हे पद दिले जात असे. हा बहुमान आता मॉस्कोचा होता, संपूर्ण रशियन भूमीचा प्रतिनिधि बनण्याची इच्छा द्मीत्रीय मनाशी बाळगून होता व कुलीकोव येथे झालेल्या संग्रामात हा निर्णायक क्षण आलाही होता. संपूर्ण रशियन भूमीचे संघटन आपल्या ध्वजाखाली करण्याचा विडा मॉस्कोने उचलला. ओर्दीटोळयाच्या खानांना तर ह्याच गोष्टींची भीती वाटत होती. आणि म्हणूनच इ.स. १३८२ मध्ये मॉस्कोनजीक मिळविलेल्या तात्पुरत्या विजयाचा फायदा उचलून तोखतामिशने मॉस्कोला आपल्या नाण्यांवर परावलंबनाचे सर्वसाधारण चिन्ह नव्हे तर तोखतामिश खानाच्या अधिपत्याखाली असल्यासंबंधीचा अगदी ठळक मजकूर – स्वत:चे नाव –

मुद्रित करण्यास भाग पाडले. आणि त्यानंतरच्या काळात – १४ व्या आणि १५ व्या शतकात मॉस्कोच्या राजांचा स्वातंत्र्यासाठी, मुक्ततेसाठी, विशेषत: नाण्यांवरील या पारतंत्र्याची समज देणाऱ्या चिन्हापासून मुक्तता मिळविण्यासाठी लढा चालू होता.

आता नाण्यांवरील अशा शब्दांकडे वळू, जे त्या राज्याच्या एकंदरीत राजकीय धोरणाचे मध्ययुगीन भाषेतून म्हणजे चिन्हे, प्रतिके आणि पदे यांच्या भाषेमधून स्वरूप स्पष्ट करतात. द्मीत्रीय दोनस्कोय आणि त्याच्या मुलाच्या – वासिली द्मीत्रियेविचच्या – नाण्यांवरून ही गोष्ट अधिक चांगल्या प्रकारे स्पष्ट होते.

प्रथम नाण्याच्या एका बाजूवर त्यांची नावे आणि पद-" महान राजा " यांचा उल्लेख होता, तर दुसऱ्या बाजूवर तोखतामिशचे नाव आणि त्याचे पद " सुलतान " लिहिले गेले होते.

त्यानंतर तोखतामिशचे अधिपत्य काहीसे दुर्बळ करण्याचा प्रयत्न केला गेला. कधी कधी नाण्यांवर " संपूर्ण रशियाचा महान राजा " असे लिहिले जात असे. हे पद काहीसे उच्च होते व त्यापूर्वी मात्र असे लिहिले जात नसे. रशियन राजांनी उचललेले हे पाऊल धाडसी आणि गंभीर स्वरूपाचे होते त्यामुळे सुलतानांना त्याला प्रत्युतरात्मक पाऊल टाकावे लागले व समझोता करावा लागला. परंतु अशा प्रकारची नाणी अद्यापि कमी प्रमाणात होती. कधी कधी तोखतामिशचे नाव छोटया छोटया अक्षरांमध्ये, वाचल्या जाणाऱ्या चिन्हांच्यामध्ये लिहिले जात असे किंवा अरब दंतकथातील एखाद्या घटनेमध्ये खानाच्या नावाबरोबर सशाची टोपी घातलेल्या माणसाचे डोके रशियन परंपरागत पद्धतीने चित्रीत केले जाई. शिवाय हे डोके अशा प्रकारे काढले जाई की जर ते सरळ ठेवले – तर अरब भाषेत लिहिलेले खानाचे नाव उलटे दिसे. आपणाला वाटते की ही बाब अगदी क्षुल्लक आहे,

परंतु मध्ययुगीन काळात हे एक खानविरोधी कृत्य ठरत असे.

शेवटी असा क्षण आला जेव्हा मॉस्कोच्या राजाने तोखतामिशबरोबरील आपले संबंध पूर्णपणे तोडून टाकले. नाण्यांवरून हळूहळू सुलतानाचे नाव व त्याची इतर चिन्हे लुप्त होत गेली. परंतु ही गोष्ट हळू हळूच करण्यात आली, एका झटक्यात सुलतानाबरोबरचे संबंध तोडून टाकले गेले नाहीत. दरबारातील विद्वानांनी राजा वसिली द्मीत्रियेविचला नाण्यांच्या स्वरूपामध्ये कशा प्रकारे बदल करत रहावयाचे ते सुचविले. अशा प्रकारे करण्यात आलेले हे बदल जाणून घेणे मनोरंजक ठरेल. तसेच ह्या सर्व गोष्टींवरून आपणाला स्पष्टपणे दिसून येते की मध्ययुगीन काळात नाण्यांच्या बाबतीत प्रत्येक बारीकसारीक गोष्टीला किती मोठे महत्त्व दिले जात होते.

नाण्यांवर ओर्दीटोळयांच्या नाण्यांची जी नक्कल उतरविली जात असे, तसेच सुलतानाच्या चिन्हांचे मुद्रण केले जात असे त्यावरून पारतंत्र्याची जाणीव होत असे. ही चिन्हे हळू हळू पुसट बनविली गेली व मजकूर वाचता न येण्याजोगे होत गेले. सुलतानाच्या चिन्हांच्या दरम्यान रशियन अक्षरे ठळकपणे उठविली जाऊ लागली. त्यानंतर मॉस्कोच्या राजाने पुढचे पाऊल उचलले: नाण्याच्या एका बाजूवर चार ओळीमध्ये त्याने "महान राजा" व आपले नाव "वसिली" लिहावयास सुरुवात केली. बाकी काहीही न लिहिता केवळ आपले पद व नाव लिहिण्यास सुरुवात केली, त्यामुळे नाण्यावरील त्याच्या नावाचा ठळकपणा जाणवू लागला.

हे महत्त्वाचे पाऊल पुढे टाकून झाल्यावर राजकीय दक्षता म्हणून वसिली राजा एक पाऊल मागे हटला. त्याने पुन्हा एकदा तोखतामिशचे नाव लिहावयास सुरूवात केली. पण तेही काही

काळापुरतेच. नाण्यांवरून सुलतानाचे नामोनिशाण नष्ट करण्याच्या कामी राजा वसिलीची वाटचाल पुढे चालूच राहिली.

नाण्यांवरून तोखतामिशचे नाव नष्ट झाले व त्या जागी अरब दंतकथेचे चित्रण व "सर्वोच्च सुलतान" ही अक्षरे दिसू लागली. तसे पाहिले तर सर्व नियमांचे पालन होत होते, पण महत्त्वाची गोष्ट म्हणजे खानाचे नाव रशियन नाण्यांवरून नाहीसे झाले होते. प्रचंड यश हाती आले होते. पण ते आता दृढ करावयाचे होते. आता सुलतानाचे स्वामीत्व दर्शविणाऱ्या नाण्याच्या बाजूसाठी नवा शिक्का तयार करण्यात आला. "सुलतान" ही अक्षरे नव्या शिक्यात नव्हती. आणखी एक पुढचे पाऊल टाकण्यात आले: या बाजूवर पुसटशी रशियन अक्षरे दिसू लागली. दुसऱ्या बाजूवर मात्र पूर्वीप्रमाणेच वसिली राजाचे नाव ठळक अक्षरात होते.

शेवटी नाण्यांच्या बाबतीतही पूर्णपणे स्वातंत्र्य मिळविण्यात आले. नाण्यांवरील सुलतानाचे अस्तित्व संपूर्णपणे समाप्त झाले. दोन्ही बाजू पूर्णपणे रशियन बनल्या. आता नाण्याच्या एका बाजूवर राजाचे नाव व पद तर दुसऱ्या बाजूवर फक्त चित्रण दिसू लागले. इ.स.१३९९-१४०० च्या आसपास पाडण्यात आलेल्या नाण्यांवर, एका बाजूवर "संपूर्ण रशियाचा महान राजा वसिली द्मीत्रियेविच" ही व दुसऱ्या बाजूवर "महान राजा वसिली द्मीत्रियेविच" ही अक्षरे व मध्यभागी प्राण्याचे चित्र दिसून येते. शिवाय हा प्राणीसुद्धा काही सर्वसाधारण प्राणी नव्हे, तर सिंह किंवा बर्फातील चित्ता असे. राजा व्लादीमिरच्या वेळी हा चित्ता म्हणजे राज्यचिन्ह होते.

रशियन सार्वभौमत्तेची साक्ष देणारी ही नाणी राजा वसिली द्मीत्रियेविच दीर्घकाळ पाडत होता.

दमीत्रीय व वसिली दमीत्रियेविच यांची राजकारणामधील विद्वत्ता वरील प्रकारच्या नाण्यांच्या बाबतीतील राजकारणात आढळून येते. त्यांनी प्रत्येक संधीचा फायदा उठवून पूर्णत: रशियन प्रकारची नाणी पाडण्यास सुरुवात केली. परंतु केवळ हीच गोष्ट त्यांची राजकारभारामधील विद्वत्ता स्पष्ट करते असे नव्हे तर आणखीही काही पाऊले त्यांनी ह्या संदर्भात उचलली होती. वित्तव्यवहारातील पेचप्रसंगांनी त्यांना भांडावून सोडले होते. रशियन भूमीवरील सर्व आर्थिक साधन-संपत्तीचा ओघ ओर्दीटोळयांच्या दिशेने खंडणीच्या स्वरूपात वाहत होता. त्यामुळे मध्ययुगीन काळाचे वैशिष्ट्य बनलेल्या नाण्यांच्या "धंद्या"द्वारेच नफा मिळविणे भाग होते. आणि हा नफा मिळविण्यासाठी कमीत कमी वजनाच्या चांदीपासून जास्तीत जास्त नाणी पाडली जात असत. परंतु हे काम अतिशय मंदगतीने व टप्प्याटप्प्याने केले जाई. इ.स. १३८०-१४०० या वीस वर्षांच्या काळात प्रत्येक नाण्यामागे १-२ शतांश ग्राम चांदीची बचत करून मॉस्कोच्या राज्यकर्त्यांनी वित्तव्यवहाराची गाडी व्यवस्थित मार्गावर आणली. इतक्या कमी प्रमाणात चांदीच्या नाण्यांच्या वजनात घट केल्यामुळे वित्तव्यवहारामध्ये पेचप्रसंगदेखील निर्माण झाले नाहीत. वित्तव्यवहार क्षेत्रात मॉस्कोच्या राज्यकर्त्यांनी दाखविलेल्या या चातुर्याची आजच्या, आधुनिक जगातील तज्ज्ञ लोकसुद्धा प्रशंसाच करतील.

इ. स. १३८० मध्ये प्राप्त केलेल्या विजयाच्या परिणामामुळे जनतेमध्ये निर्माण झालेल्या आर्थिक, नैतिक आणि राजकीय जागृतीच्या बळावर दमीत्रीय राजाने मॉस्कोमध्ये टांकसाळीची स्थापना करून रशियाच्या स्वतंत्र वित्तव्यवहाराचा पाया घातला. आपल्या सरंजाम, शोषक वर्गाचाच पुत्र असला तरी कठीण काळा-

मध्ये ततारांच्या पंज्यातून रशियाची मुक्तता करणारा, हळू हळू पण सातत्याने रशियाला स्वतंत्र राजकीय जीवन प्राप्त करून देण्याची महत्त्वाकांक्षा उराशी बाळगणारा व शेवटी इ.स. १३९९-१४०० मध्ये आपले ध्येय गाठलेला वसिली द्मीत्रियेविच आजही लोकांच्या आदरास पात्र आहे.

झार अलेक्सेयची अयशस्वी व झार पिटरची यशस्वी सुधारणा

देशाच्या मिळकतीत अधिक वाढ करून त्यायोगे बिघडती अर्थव्यवस्था सावरावी या हेतूने करण्यात आलेल्या वित्तव्यवहारातील सुधारणेचे एक उदाहरण म्हणजे १६५४ साली रशियाच्या अलेक्सेय मिखाईलोविच या झारने सुरू केलेली सुधारणा होय. स्विडन आणि पोलंडची घुसखोरी, युद्धे आणि अस्ताव्यस्त झालेला देश या सर्व गोष्टींमुळे अलेक्सेय मिखाइलोविचला हा सारा खेळ खेळावा लागला. या सुधारणेनुसार १०० जुन्या कोपेकच्या मूल्याचे पण वजनाने "येफिम्का" या नावाखाली रशियामध्ये प्रसिद्ध असलेल्या पश्चिम युरोपीय चांदीच्या नाण्याइतके एक रुबलचे नवे चांदीचे नाणे सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. परंतु ह्या "येफिम्का" नाण्याचे मूल्य १०० कोपेक इतके नव्हते तर सर्वसाधारणपणे ५० कोपेकहून थोडेसेच जास्त होते. सर्व येफिम्काच्या ऐवजी रुबल सुरू करण्याची सरकारची योजना नव्हती. विचार असा होता की येफिम्का पुन्हा रुबलच्या रूपात पाडायचे, म्हणजेच आता हे नाणे येफिम्का नसून अलेक्सेय मिखाईलोविच या झारचा हा रुबल आहे हे दर्शविणारा नवा अधिकृत शिक्का त्यावर उठवायचा. या नाण्याचे चार भाग करण्यात आले. प्रत्येक पाव तुकड्यावर शिक्का मारण्यात आला आणि २५ कोपेक



मिखाईल फ्योदोरोविच या रशियन झारने सुरू केलेले कोपेकचे नाणे.



१७ व्या शतकातील इफिमका.

म्हणून त्यांना व्यवहारात आणण्यात आले. याच वेळी चांदीच्या कोपेकइतकेच मूल्य असलेली तांब्याची कोपेकची नाणी पाडण्याचे ठरले. जुनी चांदीची कोपेकची नाणी देखील व्यवहारात होतीच. सरकारची अशी आशा होती की जनतेकडून सर्व चांदी गोळा करता येईल म्हणून भरण्यात येणारा कर जनतेकडून फक्त चांदीच्या नाण्यांच्या स्वरूपातच स्वीकारण्यात येईल असे जाहीर करण्यात आले.

रूबल व्यतिरिक्त इ.स. १६५५ पासून व्यवहारामध्ये खास चिन्ह असलेल्या येफिम्का नाण्याचा वापर करण्याची परवानगी देण्यात आली होती.

चांदीची आणि तांब्याची बाजारातील किंमत विचारात न घेतल्यामुळे तसेच अर्थशास्त्राचे व नाण्यांना बाजारपेठेत कितपत मागणी आहे या गोष्टींचे असलेले अज्ञान यामुळे या सुधारणेची



अयशस्वी सुधारणेची स्मृती.

परिणती शेवटी घोर आर्थिक संकटात झाली. तांब्याच्या नाण्याचे बाजारातील मूल्य झपाट्याने घसरू लागले. व्यापारीवर्ग, कारखानदार असंतोष प्रकट करू लागले. लोकांकडून कराच्या स्वरूपात चांदी गोळा केली जाऊ लागली, पण सरकारकडून मात्र त्याना तांब्याच्या कोपेकमध्ये पैसे मिळत होते, पण त्यांचे मूल्य तर सतत घटत होते. व्यापाराच्या दृष्टीने मजबूत असा पायाच नव्हता. या सुधारणेचा शेवट इ.स. १६६२ सालच्या उठावात झाला. अत्यंत क्रूरपणे दडपून टाकल्या गेलेल्या या उठावाला "तांब्याचे बंड" म्हणून प्रसिद्धी मिळाली. शेवटी झारने ही सुधारणा रद्द करण्याचे ठरविले.

इ.स. १६५४ ते १६६२ या काळातील अयशस्वी सुधारणेचा आपणाला नाण्यांच्या सहाय्याने चांगला अभ्यास करता येतो. मॉस्कोमधील स्रेतेन्स्काया मार्गावर केलेल्या उत्खननात चार हजार चांदीच्या नाण्यांचा मोठा साठा सापडला. त्यामधील बरीच नाणी मिखाईल फ्योदरविच या जुन्या झारच्या वेळेची आहेत तर अले-


ЕКАТЕРИНА • II •

क्सेई मिखाइलोविचच्या वेळेची केवळ दोनच नाणी – १ चांदीचा १ तांब्याचा कोपेक – आहेत. सुधारणेच्या काळात चांदी गायब झाली होती व तांबे काही साठवून ठेवण्यायोगा मौल्यवान धातु नव्हता. जुन्या झारच्या वेळी साठवून ठेवण्यात आलेली चांदीची नाणी आपणापर्यंत पोह्रोचली. सुधारणाकाळातील नाण्यांची त्यामध्ये भर काही पडली नाहीं. जेव्हा सरकारने कमी मूल्याची नाणी व्यवहारात आणली तेव्हा लोकांनी पूर्वीची चांदीची पूर्णमूल्याची नाणी साठवून ठेवण्यास प्रारंभ केला. म्हणूनच आपणाला या नाण्यांचे मोठाले खजिने, साठे सापडतात. अशाच प्रकारचा एक साठा – सुमारे २२ हजार चांदीच्या नाण्यांचा साठा – मॉस्कोतील कुयबिशेव मार्गावर करण्यात आलेल्या उत्खननाच्या वेळी आढळून आला.

पहिल्या पिटरच्या कारकिर्दीत वित्तव्यवहारामध्ये करण्यात आलेली सुधारणा हे इतिहासातील एक महत्त्वाचे पर्व ठरते. १७ व्या शतकाच्या अखेरीस आर्थिक पेचप्रसंग निर्माण झाला. ह्यानी आणि वजनामध्ये सतत होणाऱ्या घटीमुळे रशियन कोपेकला चांदीच्या एका अत्यंत छोटया तुकडयाचे स्वरूप प्राप्त झाले. या नाण्यांनी एखादी मोठी रक्कम चुकती करावयाची झाल्यास कित्येक दिवस केवळ ही नाणी मोजण्यावर खर्च करावे लागत. नाणी पाडण्याचे तंत्र पुरातन असल्यामुळे बाजारात असलेल्या नाण्यांच्या मागणी इतकी नाणी पाडता येत नव्हती. युक्रेनियामध्ये विदेशी नाण्याचा वापर केला जाऊ लागला व त्यामुळे आणखीही समस्या निर्माण झाल्या; व्यापारावर या गोष्टींचा खराब परिणाम होऊ लागला. व्यापार व्यवस्था सुदृढ व्हावी या दृष्टीने वित्त-व्यवहारात सुधारणा करण्याची – नवी वित्तव्यवहार पद्धती लागू करण्याची – कामगिरी पहिल्या पिटरने आपल्या खांद्यावर घेतली.

अलेक्सेई मिखाईलोविच या झारच्या वेळच्या सुधारणेचा धडा अद्यापि स्मरणात होताच. रुबलच्या नाण्यामधील चांदीचे प्रमाण कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला. १०० चांदीच्या कोपेकच्या वजनाच्या निम्याहून कमी वजनाचे येफिम्का हे नाणे रुबल म्हणून मानण्याचा आदेश अलेक्सेई मिखाईलोविचने आपल्या कारकिर्दीत दिला होता. पिटरनेदेखील रुबलमधील चांदीचे प्रमाण घटवले व तांब्याची कोपेकची नाणी सुरू केली.

पण पिटरची ही सुधारणा दीर्घकाळ – जवळ जवळ २० वर्षे चालू होती. अत्यंत कौशल्याने टप्प्याटप्प्याने, ज्यांचा तिटकारा केला जात असे त्या तांब्याच्या कोपेकची त्याने लोकांना हळू हळू संवय लावली. त्याने लागलीच पूर्ण कोपेकची तांब्याची नाणी व्यवहारात आणली नाही. प्रथम त्याने कोपेकपेक्षाही कमी मूल्याची छोटी छोटी तांब्याची नाणी सुरू केली. त्यानंतर चांदी-च्या रुबलने बाजारात प्रवेश केला. अनेक वर्षांच्या काळात पहिल्या पिटरच्या सरकारने चांदीच्या कोपेकचे वजनदेखील घट-विले. शेवटी, कोपेकचे वजन जेव्हा ०.२८ ग्राम इतपत पोहोचले तेव्हाच पिटरने १०० कोपेकचे मूल्य असलेले २८ ग्राम वजनाचे रुबलचे नाणे सुरू केले. इ.स. १७०४ साली चांदीचा नवा रुबल आणि त्याच्या १/१०० मूल्य असलेले तांब्याचे कोपेकचे नाणे व्यवहारात आणण्यात आले. अशा प्रकारे सुधारणा एकंदरीत समाप्त झाली होती. आता नव्या तांब्याच्या कोपेकचे मूल्य जुन्या चांदीच्या कोपेक इतकेच होते आणि २८ ग्राम वजनाच्या नव्या रुबलचे मूल्य अशा १०० कोपेक इतके होते.

यानंतरच इ.स. १७९२ साली अमेरिकेमध्ये १०० सेंटस्-एक डॉलर, व फ्रान्समध्ये इ. स. १७९५ मध्ये १०० सेंटीम-एक फ्रँक या पद्धती सुरू करण्यात आल्या.

आधुनिक इतिहासाचे पर्व

सराफ कट्टे

प्राचीन काळी स्वतःला स्वतंत्र राष्ट्र समजणारे देश आपल्या वजन-परिमाण पद्धतीनुसार आणि वित्तव्यवहार व्यवस्थेनुसार स्वतः-ची नाणी पाडत असत. अर्थात या प्राथमिक, मूलभूत तत्त्वांमध्ये बदल अवश्य घडून येत असत. अखंडपणे होत असलेली नाण्यांची हानी आणि आर्थिक सुधारणांच्या परिणामी नाण्यांचे वजन बदलत होते. या सर्व गोष्टींमुळे निरनिराळया शहरांच्या आणि राज्यांच्या वित्त एककामधील पारस्परसंबंध अधिक गुंतागुंतीचे बनत असत.

१४ व्या व १५ व्या शतकांतील इटलीचे उदाहरण घेऊ. इटली हा सर्वात विकसित कार्यशाला, व्यापारव्यवस्था आणि कला क्षेत्र असलेला युरोपमधील देश होता. संपूर्ण देश अनेक स्वतंत्र राट्राच्या-राज्यांच्या स्वरूपात होता. आणि या प्रत्येक राज्यामध्ये स्वतःच्या परिमाण पद्धतीवर आधारित स्वतंत्र वित्तव्यवहार व्यवस्था होती.

१४ व्या शतकामध्ये बालदुच्चो पेगोलोट्टी नामक एक धनाढय व्यापारी रहात होता. इटलीच्या बार्दी वाणिज्य गृहाचा तो प्रतिनिधी होता व कामानिमित्त त्याला संपूर्ण युरोपभर प्रवास करावा लागे. त्याने व्यापारासंबंधीचे एक माहितीवजा पुस्तक लिहिले होते. निरनिराळया ठिकाणच्या वस्तूंच्या किंमती; व्या-पारी, सागरी मार्ग; कोणत्या ठिकाणी कोणत्या मालाला किंमत आहे याची माहिती व शेवटी निरनिराळया शहरांच्या, राज्यांच्या नाण्यांचा विनिमय दर्शविणारी कोष्टके या सर्व गोष्टींचा या पुस्तकात अंतर्भाव होता. इटलीमधील शहरांच्या आणि भूमध्य-समुद्रातील इतर अनेक देशांच्या नाणे-विनिमयासंबंधीची सविस्तर

माहिती पेगोलोट्टीने या पुस्तकात दिलेली आहे. नाण्यांच्या व्यवहारामध्ये व्यापाऱ्यांना मोठमोठाल्या अपूर्णांकांशी कटकटीचा 'लढा' द्यावा लागत असे. परंतु व्यापाऱ्याना गणित अवघडच जात असे. कारण केवळ १४ व्या शतकातच इटलीमध्ये अरब आकड्यांचा आणि गणिती पद्धतींचा वापर केला जाऊ लागला होता. हिशोबामध्ये होणाऱ्या चुका व्यापाऱ्यांना फार 'महाग' पडत असत.

अशा प्रकारे पैसे बदलणाऱ्यांचा व सराफाचा व्यवसाय अस्तित्वात आला. (पूर्वेकडील देशांमध्ये त्यांना 'सराफ' म्हणत असत.)

प्राचीन ग्रीकमध्ये सुद्धा पैसे बदलणारे सराफ होते. त्यांना हिशोबाचे उत्कृष्ट ज्ञान होते आणि ते चटकन् सांगू शकत होते की त्यांच्या समोर कोणत्या शहराचे नाणे आहे व त्याबदली कोणत्या शहराची किती नाणी द्यावयाची. त्यांचे अनुभवी डोळे नाण्यांच्या ढिगातून एखादे बनावट नाणे अगदी अचूकपणे शोधून काढीत असत. एपिकतेत या प्राचीन तत्त्वज्ञाने म्हटले आहे की हे सराफ आपल्या या कामात चार संवेदनांचा वापर करीत असत: दृष्टी, स्पर्श, गंध आणि श्रवण. एक गोष्ट मात्र लक्षात येत नाही ती ही की हे सराफ पाचव्या संवेदना शक्तीचा – रुचिज्ञानाचा – वापर का करत नसत. या सराफांच्या कट्ट्यावर बगदादमधून आणलेले सोन्याचे दिनार बदलून सोन्याचे फ्लोरीन घेता येत, या फ्लोरीनच्या बदली बायझंटाईनची किंवा विनेत्सीआनची किती चांदीची नाणी मिळतील हे जाणून घेता येई.

अरब सराफांच्या दरम्यान "नकादा" नावाचा एक खास शब्द प्रचलित होता. याचा अर्थ असा की खराब आणि हलक्या नाण्यांमधून चांगली आणि पूर्णवजनाची नाणी निवडणे. पूर्वेकडील देशांमधील कवी आणि तत्त्वज्ञानी हाच शब्द "असफल कवितांमधून

चांगल्या कविता निवडण्याच्या" अर्थाने म्हणजेच "टिका करणे आणि अभिप्राय देणे" या अर्थाने वापरू लागले. या गोष्टींवरून आपणाला कल्पना येईल की नाण्यांनी माणसाच्या दैनंदिन जीवनामध्ये कसा प्रवेश केलेला होता. पूर्ण वजनाचे नाणे केवळ सस्वरूपतेचे आणि सत्तेचेच नव्हे तर ते सौंदर्याचे सुद्धा प्रतीक होते.

सराफांच्या कट्ट्यांमधून आधुनिक जगातील बँका आणि पतपेढयांचा जन्म झालेला आहे. बँक हा शब्द सुद्धा जुन्या इंग्रजी भाषेतील bank (म्हणजे सराफ ज्या बाकावर किंवा कट्ट्यावर बसत तो बाक किंवा कट्टा) या शब्दापासून निर्माण झाला आहे.

जेव्हा एखादा सराफ बनावटगिरी किंवा फसवणूक करे तेव्हा त्याचा कट्टा आणि मेज तोडून टाकण्यात येई. "Banca rotta" – याचा अर्थ मोडतोड झालेला सराफाचा कट्टा. नंतर याच शब्दाचा वापर एखाद्या बँकेचे किंवा संस्थेचे "दिवाळे" वाजले म्हणजेच "bankruptcy" या अर्थाने केला जाऊ लागला.

सराफांच्या कट्ट्यांमधून जन्मास आलेल्या इटालियन व्यापारी आणि वित्तसंस्थांनी, प्रतिनिधीगृहांनी हळू हळू मोठमोठाल्या वित्तव्यवहार करणाऱ्या भांडवलशाही संस्थांची उभारणी केली.

अगदी १४ व्या शतकातच, भांडवलशाही समाजाच्या उदयाच्या काळात इटलीमध्ये वित्तव्यवहार करणाऱ्या सावकारी संस्थांनी प्रचंड संपत्ती गोळा गेली आणि भांडवलाच्या स्वरूपात व्यापारधंद्यात गुंतविली. बार्डी आणि पेरुत्सी या वित्तव्यवहार करणाऱ्या संस्थेचे जेव्हा दिवाळे निघाले तेव्हा असे आढळून आले की केवळ एका धार्मिकसंस्थेने ५ लाख ५० हजार सोन्याची नाणी – फ्लोरीन – या संस्थेत ठेवली होती. १५ व्या आणि १६ व्या शतकांमध्ये जर्मनीमधील सावकारी संस्थांचा व्याप तर कितीतरी प्रचंड होता.

समाजातील सर्व थरातील लोकांचे – राजे, सरदार, सर्वसाधारण राजसेवक, नागरिक, धनिक आणि गरीब लोक, कारागीर, नोकर आणि किसान अशा सर्व लोकांचे पैसे या संस्थांमधून गुंतलेले होते. या सर्व लोकांना त्यांनी गुंतविलेल्या रकमेवर दरवर्षी ५ टक्के व्याज दिले जाई.

सागरी लूटेऱ्यांशी, गुलामांच्या व्यापाऱ्यांशी आणि लूटमार करणाऱ्या ठगांशी या सावकारांचा संबंध होता. हे सावकार नव्या देशांचा शोध घेणाऱ्या मोहिमेस सहाय्य करण्याच्या नावाखाली सागरी लूटारूंना आर्थिक मदत देत असत. गुलामांच्या व्यापारात तर त्यांचा सहभाग होताच. भांडवल उभे करण्याच्या खटाटोपीची ही केवळ सुरुवात होती. पैशाच्या मागे धाव घेत असलेल्या या लालची लोकांचा संपूर्ण मार्ग भयानक गुन्ह्यांनी व्यापून गेलेला होता. म्हणूनच गोएटेने लिहिले की – युद्ध, व्यापार आणि लूटमार – हे तिन्ही एक होय, त्यांची एक अभंग मूर्ती आहे.

नाणी आणि इतिहासाचे चित्रण

नव्या, आधुनिक काळाच्या नाण्यांकडून स्वतःच्या अशा खास अपेक्षा होत्या. युरोपमधील नाण्यांमध्ये असलेला सुसुत्रतेचा अभाव, त्यांची भिन्नता, त्यांच्या वजनांमध्ये असलेला विलक्षण फरक, अस्थिरता, त्यांचे निरनिराळे प्रकार, हानी या सर्व गोष्टी वाणिज्य विकासाच्या मार्गात धोंड बनून राहिल्या होत्या; बुर्ज्वा उद्योगधंद्यांना बेचैन करत होत्या. १६ व्या शतकाच्या प्रारंभी नवी आधुनिक नाणी अस्तित्वात आली. चेखियामधील योखिम दऱ्यांच्या प्रदेशामध्ये पहिली नवी नाणी पाडली जावू

8–1187

लागली. या प्रदेशामध्ये योखिमष्टाल या खेडेगावानजीक चांदीच्या खाणी होत्या.

इ.स. १५२५ साली झालेल्या जर्मन राजांच्या परिषदेमध्ये संपूर्ण जर्मन साम्राज्यामध्ये नवी, आधुनिक नाणे – पद्धती सुरू करण्यात आली. ही तीच येफिम्का नाणी होती ज्यांची आपणाला या पूर्वीच्या प्रकरणामध्ये ओळख झाली आहे. अशाच प्रकारे फ्रान्समध्ये – एक्यू, इटलीमध्ये – स्कूदो, दक्षिण अमेरिकेमध्ये – पेसो, स्कॅंडिनेव्हियामध्ये – डालेर आणि अमेरिकेमध्ये – डॉलर या नावांनी नवी नाणी अस्तित्वात आली.

आता नाण्यांची ओळख पटविण्यासाठी मुद्राशास्त्रातील युक्त्यांची, परीक्षांची आवश्यकता नव्हती: नाण्यांवर सर्व काही लिहिले जात होते व हे लिखाण नाण्यांवर टिकून रहात असे. या नव्या प्रकारच्या मोठ्या आकाराच्या नाण्यांवर ती सुरू करण्यात आलेले वर्ष, राज्यप्रमुखाचे चित्र आणि त्या राज्याचे राष्ट्रचिन्ह आपणास दिसून येते. इतिहासातील घटनांचे, प्राचीन शहरांचे, राज्यकर्त्यांचे किती उत्कृष्ट चित्रण या आधुनिक नाण्यांवर आढळून येते!

इ.स. १५२६ सालच्या जर्मन नाण्यांवर हिएन्ना शहरातील मनोरे, राजवाडे, धर्ममंदिरे यांचे चित्रण आढळून येते. इ.स. १६१९ सालच्या हॅंबुर्ग शहरातील नाण्यांवर आपणाला मनोरे, शहराच्या रक्षक भिंती व प्रवेशद्वारे यांचे चित्रण दिसून येते. संकटाची चाहूल लागताच ही प्रवेशद्वारे ज्यांनी बंद केली जात त्या लोखंडी जाळयादेखील आपणाला या प्रवेशद्वारावर सोडलेल्या दिसत आहेत. १७ व्या शतकातील या नाण्यांवर प्राचीन मध्ययुगीन शहराचे चित्रण दिसून येते.

१६ व्या शतकामध्ये जेव्हा जर्मनीला तीस वर्षे चालू असलेले

१६१९ सालातील हॅंबुर्गमधील नाणे. नाण्यावर गावाची तटबंदी व प्रवेशद्वार दिसत आहे.



युद्ध झोडपून काढत होते तेव्हा नाण्यांची जबरदस्त हानी होऊ लागली, चांदीमध्ये इतर धातूंची भेसळ होऊ लागली. नाण्यांमध्ये असलेल्या धातूचे प्रमाण पूर्वी ठरविण्यात आलेल्या प्रमाणापेक्षा फारच कमी होते व त्यामुळे या नाण्यांमध्ये असलेल्या चांदीच्या प्रत्यक्ष मूल्यापेक्षा कितीतरी अधिक मूल्य या नाण्यांना ठरवून देऊन त्यांचा व्यवहारामध्ये वापर करण्यासंबंधी आदेश देणे सरकारला भाग पडले.

नव्या नाण्यांनी आणि याच वेळी व्यवहारात असलेल्या सोन्याच्या नाण्यांनी सागरी लुटेऱ्यांच्या पेटचा खाचोखाच भरलेल्या असत. अलेक्झांदर डचूमा, स्टिव्हनसन, एडगार पो या लेखकांच्या कथातील नायकांना सागरी लुटेऱ्यांच्या गुप्तधनाच्या पेटचा सापडल्या असल्याचे आपल्या वाचनात आले असेलच, इतक्या दूरवर जावयाची आपणास मुळीच आवश्यकता नाही. मॉस्कोमध्येदेखील अशा नाण्यांनी भरलेली पेटी – गुप्तधन सापडले आहे...

इ. स. १९७० साली मॉस्कोमधील एका छोटचाशा रस्त्यावर ७४ कि. ग्रॅ. हून जास्त वजनाची एकूण ३३९८ चांदीची नाणी सापडली. युरोप खंडामध्ये आढळलेला हा सर्वात मोठा गुप्तधनाचा

साठा आहे. स्पेनमधील टांकसाळयांमध्ये पाडण्यात आलेल्या, पण मुख्यत: दुसरा इसाबेल्ल, तिसरा फेरडीनान्द आणि चौथ्या फिलिप्सच्या कारकिर्दीमध्ये पाडण्यात आलेल्या पेसो नाण्यांचा या खजिन्यात प्रामुख्याने समावेश आहे.

हा खजिना त्या काळाची साक्ष पटवून देतो ज्या काळात दक्षिण अमेरिकेतील वसाहतींमधून स्पेनच्या बाजारपेठेत मौल्यवान धातूंचा ओघ वहात होता. तेथूनच साऱ्या युरोप खंडाला सोन्याचा पुरवठा होत होता. याला रशियाचा देखील अपवाद नव्हता. मुख्यत: कोपेकची नाणी पाडण्यासाठी तेथूनच चांदी उपलब्ध होत होती. अशाच विदेशी चांदीचा वर उल्लेख केलेला हा खजिना होता, परंतु मॉस्कोच्या नाणी संग्रहालयापर्यंत तो पोहोचू शकला नव्हता. १६३६ साली मॉस्कोमध्ये भयानक आग लागली होती. त्या वेळी तुरुंगातून कैदी बाहेर पडले. त्यांनी श्रीमंत, धनाढ्य लोकांच्या प्रासादातून धुमाकूळ घातला, विदेशी प्रवाशांचे सामान बाहेर काढले, पळवापळव केली. याच वेळी या सापडले-ल्या खजिन्याचा मालक – जो बहुतेक धनवान विदेशी व्यापारी असावा – पळून गेला असावा किंवा परत येऊ शकला नसावा; कदाचित मृत्यूमुखी पडला असावा आणि अशा संकटसमयी तांब्याच्या पात्रांमध्ये जमिनीत गाडून ठेवलेला हा खजिना १९७० मध्ये खोदून काढेपर्यंत तसाच पडून राहिला होता.

१८ व्या आणि १९ व्या शतकातील नाणी

१८ व्या आणि १९ व्या शतकातील नाण्यांवर अनेक वेळा राजकीय घोषवाक्ये आढळून येतात. अगदी पुरातन काळापासून चालत आलेली ही परंपरा आहे. जर्मन भांडवलशाही आणि

लष्करवाद्यांच्या नाण्यांवर अनेकदा युद्धाचे प्रतिबिंब दिसून येते. उदाहरणार्थ, ब्रेमेनमध्ये पाडण्यात आलेल्या नाण्यांवर या शहराचे राजचिन्ह होते, तसेच हे शहर स्वतंत्र असल्याबद्दल लिहिण्यात आले होते. आता आपण म्हणाल की यात युद्धाचा काय संबंध? परंतु या नाण्याच्या दुसऱ्या बाजूवर लिहिले होते: "दुसरी जर्मन पायदळ तुकडी, १८६५" आणि याच बाजूवर ओक वृक्षाच्या पानांची माला, एकमेकींना टेकवून ठेवलेल्या दोन बंदुका व लोखंडी क्रूस यांचे चित्रण आहे.

पहिल्या नेपोलियनशी झालेल्या युद्धाच्या स्मरणार्थ काढण्यात आलेली जर्मन नाणी आपल्या पहाण्यात आहेत. या नाण्यांवर जर्मन साम्राज्यातील लोकांचे चित्रण आहे: सैनिक, सर्वसामान्य नागरिक, हाती मुल घेतलेली माता, सैन्यातील अधिकारी. याच ठिकाणी लिहिले आहे: "राजाने दाखविलेल्या मार्गाने सर्वांनी वाटचाल केली" आणि "देवाच्या नावाने राजाच्या आणि मायभू-मीच्यापाठीशी आम्ही उभे आहोत." नाण्यांच्या दुसऱ्या बाजूवर गरुड पक्षाचे चित्र असून त्यावर लिहिले आहे: "जर्मन साम्राज्य, १९१३". पहिल्या महायुद्धापूर्वी जर्मनीला आपल्या सर्व विजयांचे स्मरण झाले. अगदी नेपोलियनबरोबरील युद्धातील विजयासह. खरे सांगावयाचे झाल्यास या विजयामध्ये जर्मनीला अभिमान वाटण्याजोगे काहीच नव्हते. १८१३ मध्ये विजय प्राप्त करण्या-साठी त्यांना रशियाचे सहाय्य घ्यावे लागले होते, परंतु ही गोष्ट ते विसरून गेले होते.

आजच्या काळातील नाण्यांचा अभ्यास करता आपणाला असे आढळून येईल की अशी कोणतीही माहिती नाही जी नाण्यांवर आहे परंतु इतर ऐतिहासिक दस्तऐवजांमध्ये अथवा साधनांमध्ये नोंदली गेलेली नाही. तरीसुद्धा नाण्यांवरील माहितीची, त्या-

वरील चित्रणाची ऐतिहासिक घटनांशी तुलना करणे अत्यंत मनोरंजक ठरते हे खरे.

१८ व्या शतकातील महान फ्रेंच क्रांतीचा काळ. राजा अद्यापि जिवंत आहे. राजा अद्यापि राज्य करीत आहे व याच वेळी कायदेशीर आमसभेचे नेतृत्व करीत आहे. आणि या सर्व गोष्टींचे प्रतिबिंब असलेले नाणे अस्तित्वात आले. या नाण्याच्या एका बाजूवर १६ व्या ल्युदोविकचे चित्र व १७९२ हे साल असून त्याच ठिकाणी पुढील मजकूर आहे: "फ्रान्सचा राजा १६ वा ल्युदोविक." नाण्याच्या दुसऱ्या बाजूवर विजय देवता व "घटना" हा शब्द असून तिच्या शेजारी एक कोंबडा व स्वातंत्र्याचे प्रतीक असलेली फ्रिजीयन टोपी यांचे चित्रण आहे. त्याखाली लिहिले आहे: "स्वातंत्र्याचे चौथे वर्ष." राजा अगदी नाण्यांवर आपले चित्र छापत होता व अशा प्रकारे लोकांमध्ये तो आपली प्रतिमा जागृत ठेवण्याचा प्रयत्न करीत होता. परंतु याची त्याला जबर किंमत मोजावी लागली. नाण्यांवरील त्याच्या प्रतिमेमुळे लोकांना त्याची चेहेरेपट्टी चांगलीच ठाऊक होती. जनतेच्या उठावाला घाबरून जेव्हा तो पळून गेला तेव्हा सिमेवर केवळ योगायोगाने, नाण्यावर असलेल्या त्याच्या चित्रामुळे त्याची ओळख पटली व त्याला पकडून पुन्हा पॅरिसमध्ये आणण्यात आले. तेथे त्याला फाशी दिली गेली.

ल्युदोविकला फाशी दिल्यानंतर नाण्यांवरील त्याचे चित्र नाहीसे झाले, त्याची जागा क्रांतीच्या प्रतीक चिन्हाने घेतली.

इतिहासातील सर्व चांगल्या-वाईट घटनांची छाप नाण्यांवर पडत असते. पहिला नेपोलियन सत्तारूढ झाला – नाण्यांवर या घटनेचे लागलीच प्रतिबिंब उमटले: "फ्रेंच प्रजासत्ताकाचा सम्राट नेपोलियन" – हा मजकूर नाण्यांवर आला. १८०९ पासून नेपो-



१७७१ सालातील ताब्यांचे एक रूबलचे नाणे. हे नाणे अत्यंत जड होते (वजन १६.०३८ कि. ग्रॅ.)

लियनने आपल्या गृह आणि विदेश धोरणात बदल केला, त्याने हा मजकूर बदलून दुसरा मजकूर – "साम्राज्याचा सम्राट नेपो-लियन" – लिहिण्याचा आदेश दिला. इंग्लंडविरुद्ध युद्ध जाहीर करण्यापूर्वीच त्याने लंडन शहर जिंकून घेतल्याबद्दल पदक काढले. लंडन शहर काही नेपोलियन जिंकून घेऊ शकला नाही, परंतु पदक मात्र अस्तित्वात राहिले.

१८४८ साली क्रांतीची ज्वाला भडकली आणि नाण्यांवर शब्द आले: "स्वातंत्र्य, समानता, बंधुत्व." क्रांती अयशस्वी ठरली व तिसरा नेपोलियन सिंहासनावर आरूढ झाला आणि नाण्यांवर राजचिन्हाव्यतिरिक्त (एक डोक्याचा गरुड) त्याचे चित्र दिसू लागले.

अशा प्रकारची कितीतरी उदाहरणे देता येतील. विजेत्या देशाच्या आणि पराजीत, व्याप्त देशाच्या बाबतीत नाणी ऐतिहासिक दृष्टचा एक महत्त्वाचा दस्तऐवज ठरतात असेच म्हणावे लागेल: याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे रशियाने सात वर्षांच्या युद्धानंतर जर्मनीच्या जिंकून घेतलेल्या पूर्व भागात १७५९ ते १७६२ या काळात सुरू केलेली नाणी होय.

१९ व्या शतकात रशियामध्ये अशाही काही घटना घडल्या की एखाद्या व्यक्तीच्या, एखाद्या झारच्या नावाने नाणी सुरू करण्यात आली, परंतु ती व्यक्ती सत्तेवर कधीच आली नाही. १९ व्या शतकामध्ये पहिल्या अलेक्झांदरचा भाऊ कोन्स्तानतिन पावलोविच रशियाचा झार कधीच बनला नाही. १८२५ साली डिसेंबरमध्ये जेव्हा उठाव झाला होता तेव्हा झार निकोलाई पावलोविचने कोन्स्तानतिनचे नाव अधिकृतरित्या जाहीरही केलेले नव्हते परंतु कोन्स्तानतिन पावलोविचचे नाव (रशियाचा सम्राट म्हणून) असलेले एक रुबलचे नाणे १८२५ मध्ये सुरू करण्यात आले होते. एक रुबलचे हे नाणे अत्यंत दुर्मिळ नाणे आहे. अत्यंत कमी संख्येत ही नाणी पाडण्यात आली होती. लेनिनग्राद-मधील वस्तुसंग्रहालयात हे दुर्मिळ नाणे पाडण्यासाठी वापरण्यात आलेला शिक्का अद्यापि आहे.

सोविएत नाणी – स्वतंत्र जनतेचे प्रतीक

आपले बुझ्र्वा स्वरूप आणि मर्यादितपणा लपविण्यासाठी फ्रेंच क्रांतीला अंगावर पुरातन वस्त्रे चढवावी लागली. नाण्यांवर असलेल्या परक्या, पुरातन चिन्हांद्वारे याची चांगलीच साक्ष पटते. रशियातील महान ऑक्टोबर समाजवादी क्रांतीला परक्या वस्त्रांची आवश्यकता नव्हती कारण लपविण्याजोगे काही नव्हतेच

मुळी. या क्रांतीने लोकांना सरळ सरळ आणि अपरिवर्तनीय स्वरूपात स्वातंत्र्य बहाल केले. आणि म्हणूनच सोविएत नाण्यांवरील चिन्हांचे, प्रतिकांचे एक आगळे महत्त्व आहे, पृथ्वीवरील सर्व श्रमजीवी जनतेमध्ये त्याना आदराचे स्थान आहे. कार्ल मार्क्स आणि व्लादीमिर लेनिन यांनी अनेकदा म्हटल्याप्रमाणे आणि लिहिल्याप्रमाणे नव्या समाजाची निर्मिती करण्यामध्ये आणि समाजवादाकडून कम्युनिझमच्या दिशेने यशस्वी वाटचाल करण्याकरिता समाजवादाच्या परिस्थितीमध्ये पैशाना महत्त्वाच्या शक्तीचे स्वरूप प्राप्त होईल.

सोविएत सत्तेच्या प्रारंभीचा काळ म्हणजे सर्वप्रथम यादवी युद्धाचा आणि नंतर उध्वंस आणि आर्थिक पेचप्रसंगाना तोंड देण्याचा काळ होता. आर्थिक क्षेत्राची पूर्णपणे धूळधाण उडाली होती. अगदी कागदी पैशांचीदेखील टंचाई होती कारण पैसे छापण्यासाठी कागद उपलब्ध नव्हता. नाण्यांची आणि पैशांची टंचाई मिटविण्याच्या दृष्टीने एक उपाययोजना म्हणून सोविएत सरकारने जुन्या शिक्क्यासह पोस्टाची व सरकारी तिकिटे सुरू केली. त्यावर नवा शिक्का असेल तर याचा अर्थ ती तिकिटे नसून पैसे असा होते असे. सुटे पैसे मिळणे ही एक अत्यंत कठीण गोष्ट बनली व त्यामुळे काळाबाजारास ऊत आला. पैसे बदलणाऱ्यांचा – सराफांचा – एक नवा व्यवसाय जन्मास आला.

ग्रामीण विभागामध्ये तर पैशाच्या टंचाईमुळे कागदी पैसे छापणे भाग पडले. श्वेतरक्षक सरकारने स्वतःच्या कागदी मुद्रा सुरू केल्या. या पैशांव्यतिरिक्त ट्रामच्या तिकिटांचा वापर पैशाप्रमाणे केला जाऊ लागला. या सर्व गोष्टींचा नवोदित सोविएत देशाच्या अर्थ व वित्तव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होऊ लागला.

अतिप्रमाणात कागदी पैसे छापले जाऊ लागल्यामुळे किंमती




१९२५ मधील सोन्याचे १० रूबलचे नाणे.

भरमसाठ वाढू लागल्या. एक छोटेसे उदाहरणच घेऊ: युद्धपूर्व काळाशी तुलना करता १९२१ साली काडयाच्या पेटीची किंमत ३८ हजार पटीने वाढली.

वित्तव्यवहार क्षेत्रामध्ये काहीशी सुधारणा करण्याच्या दृष्टीने १९१८ च्या सुरुवातीस एक योजना आखण्यात आलेली होती. परंतु सोविएत प्रजासत्ताकाची युद्धग्रस्त परिस्थिती, उपासमारी आणि उध्वस्त अर्थव्यवस्था या सर्व गोष्टींमुळे ही योजना बाजूस ठेवावी लागली. तथापि, याच वर्षी हंगामी सरकारने सुरू केलेल्या तिकिटांच्या स्वरूपातील मुद्रा, झारच्या काळातील पैसे व निरनिराळया शहरातील पैसे बदलून रशियन फेडरेशनचे संयुक्त चिन्ह असलेल्या कागदी मुद्रा संपूर्ण प्रजासत्ताकात सुरू करणे शक्य झाले. परंतु अद्यापि पूर्णपणे सुधारणा व्हावयाची होती. धातूची नाणी सुरू करणे आवश्यक होते.

प्रारंभीची सोविएत नाणी पाडण्यासाठी टांकसाळ सुरू करण्याचे काम अत्यंत कठीण होते. १९२१ च्या एप्रिल महिन्यामध्ये श्रम आणि संरक्षण समितीने पेत्रोग्रादमधील जुनी टांकसाळ सुरू करण्याचा निर्णय घेतला. परंतु नाणी पाडण्यासाठी आवश्यक


ВСЕХ СТРАН
РСФСР

असणारी यंत्रणा केव्हाच नाहीशी झाली होती. १९१७ साली हंगामी सरकारने ती पूर्वेकडील प्रजासत्ताकांमध्ये हालविली होती व त्यापैकी बरीच यंत्रे हरवली गेली होती. तथापि, या साऱ्या अडचणींवर मात करण्यात आली.

उच्च शुद्धतेच्या चांदीची पहिली सोविएत रुबलची नाणी पाडण्यात येऊ लागली. या नाण्यावर पंचकोनी ताऱ्याचे चित्र, रशियन फेडरेशनचे राजचिन्ह होते व "सर्व देशांतील कामगारांनो, एक व्हा!" असे घोषवाक्य मुद्रित करण्यात आले होते.

नाण्यांचा महत्त्वाचा भाग असणाऱ्या राजचिन्हाचे स्वरूप लेनिन यांच्या वैयक्तिक सहभागाने निश्चित करण्यात आले. १९१८ सालच्या अगदी सुरुवातीसच रशियन फेडरेशनच्या राजचिन्हाला मंजूरी देण्यात आली. लाल ताऱ्यासह असलेले सोविएत प्रजासत्ताकाचे राजचिन्ह सर्व श्रमिकांचे, जगातील सर्व श्रमजीवींचे प्रतीक बनले.

१९२३ साली व्ही. कोजुप आणि आय. दुबासोव या चित्रकारांनी तयार केलेल्या सोविएत संघाच्या राजचिन्हाला मंजूरी देण्यात आली आणि १९२४ सालच्या नाण्यांवर ते प्रथम दिसून आले. पृथ्वीच्या पार्श्वभूमीवर विळा आणि हातोड्याचे तसेच पृथ्वीच्या वर तारा व त्या सर्वांभोवती लाल रंगाच्या फितीच्या सहाय्याने सात वेळा* लपेटलेले गव्हाचे कोंब व पृथ्वीच्या गोळयाखाली उगवता सूर्य – असे हे राजचिन्ह होते.

चांदीचा रुबल व ५०, २०, १५ आणि १० कोपेकची नाणी सुरू केल्यामुळे पैशाची घटती क्रयक्षमता रोखणे थोड्याफार

---

* प्रजासत्ताकांच्या संख्येइतक्या वेळा. त्या वेळी सोविएत समाजवादी प्रजासत्ताकांच्या संघात सात प्रजासत्ताके होती.





सोविएत नाणी – स्वतंत्र श्रमाचे प्रतीक.

प्रमाणात शक्य झाले. १९२२ साली सोविएत संघाच्या शासकीय बँकेस सोन्याच्या नाण्यांच्या मूल्या इतक्या मूल्याच्या (१० रुबल) कागदी मुद्रा, नोटा छापण्याचा हक्क देण्यात आला. १० रुबलच्या कागदी नोटेचे मूल्य सर्वसाधारणपणे ४.२५ ग्राम सोन्या इतके होते.

लवकरच १९२३ साली उच्च शुद्धतेच्या सोन्याचे १० रुबलचे नाणे सुरू करण्यात आले. त्याच्या एका बाजूवर रशियन फेडरेशनचे राजचिन्ह व "सर्व देशांतील कामगारांनो, एक व्हा!" हे घोषवाक्य होते तर दुसऱ्या बाजूवर टोपली घेतलेल्या किसानाचे चित्र होते.

२०, १५ आणि १० कोपेकची चांदीची नाणी पाडण्याचे काम चालू होतेच. १९२४ साली पुन्हा एक रुबलचे नाणे सुरू करण्यात आले. त्याच्या एका बाजूवर सोविएत संघाचे राजचिन्ह व कार्ल मार्क्सनी जगातील सर्व श्रमजीवींना उद्देशून केलेले आवाहन – "सर्व देशांतील कामगारांनो, एक व्हा!" होते. दुसऱ्या



महान ऑक्टोबर समाजसत्तावादी क्रांतीच्या (१९१७) स्मरणार्थ कोपेकची नाणी.

बाजूवर हाती कुदळ व विळा घेतलेला किसान असून त्याच्या शेजारी, खांद्यावर एक हात ठेवून उगवता सूर्य दर्शविणारा कामगार व उगवत्या सुर्याखाली कारखान्याची इमारत – असे चित्र होते. या चित्रावरून कामगार व किसानांच्या दृढ एकतेची आणि किसानांना नव्या जीवनाचा मार्ग दर्शविणाऱ्या कामगार वर्गाच्या नेतृत्वाची साक्ष पटते.

शेवटी नाण्यांवरील राजा, देव-देवता आणि राज्यकर्त्यांची जागा देशाच्या खऱ्याखुऱ्या धन्याने – श्रमजीवी जनतेच्या प्रतिनिधींनी घेतली.

प्रारंभीच्या सोविएत नाण्यांवरील किसानांचे चित्रण हा काही योगायोग नव्हता, तर त्यामधून श्रमजीवी किसानाना समाजवादाच्या उभारणीमध्ये सहभागी करून घेण्याच्या सोविएत सरकारच्या धोरणाचे ते प्रतिबिंब होते.

१९२४ मध्ये चांदीची ५० कोपेकची नाणी सुरू करण्यात

आली. त्यावरदेखील स्वतंत्र श्रमाचे प्रतीक मुद्रित करण्यात आले होते.

सोविएत नाण्यांवरील चित्रणासंबंधी १९२५ साली एक कला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेतील एका चित्रामध्ये – ए. एफ. वस्युतिनस्कीय यांच्या चित्रामध्ये – कारखान्याच्या पार्श्वभूमीवर लाल सैन्यातील एका खलाशाचे व हातोडा घेतलेल्या कामगाराचे आणि विळा घेतलेल्या किसानाचे चित्र होते व पुढील घोषवाक्य होते "सर्व देशांतील कामगारांनो, एक व्हा!" नाण्याच्या दुसऱ्या बाजूवर उगवत्या सूर्याच्या पार्श्वभूमीवर नाण्याचे मूल्य लिहिण्यात आले होते. शांततामय श्रमाचे संरक्षण करणाऱ्या कामगार-किसानांच्या सत्तेचे आणि सैन्याचे हे प्रतीक होते.

समाजवादी देशाच्या आणि शांततामय श्रमाच्या रक्षणाचे प्रतीक नाण्यांवर जरी प्रतिबिंबीत झाले नाही तरी सोविएत संघाच्या कागदी नोटांवर आणि पोस्टाच्या तिकिटांवर श्रमजीवी वर्गाच्या या दोन प्रतिनिधींना म्हणजेच कामगार आणि किसानांना स्थान मिळाले.

यानंतरच्या काळामध्ये निकेल आणि ब्राँझची नाणी सोविएत संघामध्ये पाडण्यात आली. निकेलची नाणी १९६१ पासून पाडण्यात येऊ लागली व त्यावर हाती हातोडा घेतलेल्या कामगाराचे चित्र होते. त्यानंतर हे चित्र नाहीसे झाले व नाण्यांवर केवळ सोविएत संघाचे राजचिन्ह व नाण्याचे मूल्य दिसू लागले.

१९३५ ते १९६१ या काळामध्ये पाडण्यात आलेल्या सोविएत नाण्यांच्या एकंदरीत स्वरूपात बदल असा काहीच झाला नव्हता. केवळ नाणे सुरू केले गेलेले वर्ष व राजचिन्हामधील गव्हाच्या कोंबीभोवती असलेल्या फितीच्या पिळयांची संख्याच काय ती





व्ला. इ. लेनिन यांच्या जन्म-शताब्दीनिमित्त सुरू करण्यात आलेले नाणे.

व्ला. इ. लेनिन – एक जिवंत स्मृती.

बदलत होती. सोविएत समाजवादी प्रजासत्ताकांच्या संघामध्ये असलेल्या प्रजासत्ताकांच्या संख्ये इतके हे पिळे असत. १९३५ आणि १९३६ मध्ये असे सात, १९३७ ते १९४७ या काळात अकरा, १९४८ ते १९५६ या काळात सोळा पिळे होते तर १९५७ सालापासून पंधरा पिळे दिले जाऊ लागले. याचा अर्थ सोविएत संघामधील समाजवादी प्रजासत्ताकांची संख्या पंधरा झाली.

१ जानेवारी १९६१ पासून सोविएत संघामधील नाण्यांचे फेर मूल्यांकन करण्यात आले. अर्थक्षेत्राचा प्रचंड विकास हे यामागील कारण होते. १० जुन्या रुबलचे मूल्य आता एका नव्या रुबल इतके ठरले. नव्या प्रकारची नाणी पाडली जाऊ लागली. धातूचे एक रुबलचे नाणे पुन्हा पाडले जाऊ लागले. तांबे आणि निकेलच्या मिश्रधातूची १ रूबल, ५०, २०, १५



महान देशाभिमानी युध्दाच्या २० व्या व ३० व्या वर्धापनदिनानिमित्त सुरू करण्यात आलेली नाणी.

आणि १० कोपेकची व ब्राँझची ५, ३, २ आणि १ कोपेकची नाणी पाडली जाऊ लागली. नाण्यांवरील चित्रणामध्ये फरक पडला नाही.

सध्या खास घटनांचे, व्यक्तींचे स्मरण करून देणाऱ्या नाण्यांचा पुनर्जन्म झाला आहे. व्लादीमिर इल्यिच लेनिन यांच्या १०० व्या जयंतीनिमित्त आणि महान देशाभिमान युद्धाच्या २० व्या आणि ३० व्या वर्धापनदिनानिमित्त खास नाणी सुरू करण्यात आली. महान देशाभिमानी युद्धाच्या ३० व्या वर्धापनदिनानिमित्त पाडण्यात आलेल्या १ रूबलच्या नाण्यावर लहान मुलाचे रक्षण करीत असलेल्या व तलवारीने फॅसिस्टांच्या स्वस्तिक चिन्हाचे तुकडे तुकडे करत असलेल्या सोविएत सैनिकाचे चित्र आहे.

महान समाजवादी ऑक्टोबर क्रांतीच्या ५० व्या आणि ६० व्या वर्धापनदिनानिमित्तदेखील खास नाणी सुरू करण्यात




ऑक्टोबर समाजसत्तावादी क्रांतीचा ६० वा वर्धापनदिन.



मॉस्को –१९८०. ऑलंपिक क्रिडा.



२२ व्या ऑलंपिक क्रिडा.


ИГРЫ XXII ОЛИМПИАДЫ · МОСКВА · 1980

आली. रुबलच्या आणि ५० कोपेकच्या नाण्यांवर विळा आणि हातोडयाच्या पार्श्वभूमीवर लेनिन यांचे चित्र होते तर २० कोपेकच्या नाण्यांवर क्रांतीची घोषणा केलेल्या "आवरोरा" या युद्धनौकेचे चित्र आहे. १५ कोपेकच्या नाण्यांवर व्ही. मुखीना यांचे "कामगार आणि किसान महिला" हे शिल्प तर १० कोपेकच्या नाण्यावर सोविएत जनतेने अंतराळ अन्वेषणाच्या क्षेत्रामध्ये प्राप्त केलेल्या सफलतांचे स्मारक दिसून येते.

१९८० साली मॉस्कोमध्ये झालेल्या २२ व्या ऑलिंपिक क्रिडा स्पर्धांच्या स्मरणार्थ खास नाणी सुरू करण्यात आली होती. नाण्यांवर निरनिराळ्या क्रिडांचे चित्रण करण्याच्या परंपरेचा पुनर्जन्म अशा प्रकारे झाला. प्राचीन ग्रीक शहरांच्या नाण्यांच्या बाबतीत ही परंपरा आपणाला विशेष दिसून येत होती.

भारतीय नाणी

प्राचीन भारतातील नाणी

इतर देशांप्रमाणेच प्राचीन भारतामध्ये देवाणघेवाणीच्या कामी प्रारंभी गुरांचा व इतर प्राण्यांचा आणि त्याचप्रमाणे काही प्रकारच्या शंखांचा उपयोग केला जाई. नंतर धातूंच्या कांडयांचा वापर होऊ लागला. प्राचीन ग्रंथांवरून दिसून येते की सिंधु नदीच्या खोऱ्यांचा प्रदेश जेव्हा प्राचीन अहमदाबादच्या इराण साम्राज्यामध्ये विलिन झाला तेव्हा भारताच्या या प्रदेशाने भेट म्हणून सोन्याची वाळू दिली होती. अशा रीतीने त्याकाळी सोन्याची वाळू पैशाची भूमिका बजावीत होती. असे दिसून येते की त्या काळी सोने विपुल प्रमाणात होते. भारतामध्ये त्यावेळी स्वत:ची चांदी अशी नव्हती. परदेशातून तिची आयात केली जात असे व सोन्याच्या तुलनेने

इतर देशांपेक्षा तिची किंमत जास्त होती. तथापि, प्राचीन नाणी ही प्रामुख्याने चांदीची होती.

ग्रीसप्रमाणेच ही नाणी धातूच्या छोटचा तुकडयांच्या स्वरूपात होती व त्यावर शिक्का उमटविण्यात आलेला असे.

बंगालपासून काबूलपर्यंत सर्वत्र 'पुरानास' ही अत्यंत प्राचीन नाणी प्रचारात होती: ही नाणी म्हणजे चांदीचे, कित्येकदा तांब्याचे गोल किंवा चौकोनी तुकडे असत व त्यावर चांदीची छोटीशी मुद्रा उमटविण्यात आलेली असे. एकाच नाण्यावर अनेक मुद्रा असत व अनेकदा एक बाजू पूर्णपणे गुळगुळीत असे. नाण्यांवरील मुद्रण भिन्न भिन्न प्रकारचे असे – मानवी मुद्रा, वृक्ष, पक्षी, शस्त्र, धार्मिक चिन्हे, सूर्य आणि चंद्राची चित्रे त्यांवर आढळून येत असत. अशा प्रकारची चिन्हे ही त्या ठिकाणी सत्तेवर असलेल्या आणि नाण्याच्या मूल्याची हमी देणाऱ्या राजाची द्योतक होती, ती खाजगी व्यक्ती किंवा व्यापारी संस्थांची चिन्हे होती की शेवटी नगरांची राजचिन्हे होती यावर मात्र शास्त्रज्ञ काहीच प्रकाश पाडू शकत नाहीत. नाण्यांचा चौरस आकार त्यांच्या गोलाकारा इतकाच प्रचलित होता. परिणामी प्राचीन भारतीय नाण्यांचे ते एक वैशिष्टच बनले आणि निरनिराळ्या राजा-महाराजांच्या काळात अनेकदा या आकाराची नाणी आढळून येऊ लागली. पहिली नाणी – पुरानास – केव्हा अस्तित्वात आली ते अचूकपणे सांगता येणे शक्य नाही परंतु असे साधार म्हणता येईल की आपल्या आयुर्मानाच्या बाबतीत ती प्राचीन ग्रीक नाण्यांच्या मुळीच मागे नाहीत.

प्राचीन भारताच्या दक्षिणेकडील प्रदेशात वित्त-व्यवहार स्वतंत्रपणे व मुक्तपणे विकसित होत होता. हीच परंपरा त्या काळच्या प्राचीन नाण्यांबाबत आढळून येते. उत्तरेकडील प्रदेशावर परकीय

राज्यांचे आक्रमण होत राहिले. याचा परिणामदेखील त्या ठिकाणच्या नाण्यांवर दिसून येतो.

सिकंदराच्या वेळी भारताच्या वायव्येकडील प्रदेशात अनेक छोटी मोठी राज्ये होती. प्रत्येक राज्य आपली स्वतःची नाणी पाडत असे. मौर्यांच्या काळात या राज्यांचे संघटन जरी झाले तरी राज्ये मात्र स्वतंत्रपणे तांब्याची व पितळेची नाणी पाडतच होती. ही होती ओतीव नाणी. या नाण्यांवर "ब्रह्मी" लिपीत कौसंबी, आयोध्या, मथुरा व इतर राज्यातील स्थानिक राज्यकर्त्यांची नावे असत, इ. स. पूर्वी ४ थ्या-३ऱ्या शतकांत संयुक्त शिक्का असलेली पहिली तांब्याची नाणी अस्तित्वात आली. सम्राट अशोकाच्या काळातील नाण्यांवर बौद्धधर्मीय चिन्हे आढळून येतात – स्वस्तिक, मठाचे चित्र इ. शिक्का चौकोनी होता व नाण्यांच्या पृष्ठभागांवर चौकोनी छाप दाब दिल्याप्रमाणे उमटलेला असे व त्यावरच चित्र व मजकूर असे. नाण्यांच्या दोन्ही बाजूंवर मुद्रण असे. इ. स. पूर्वी ३ऱ्या-२ऱ्या शतकात गंधारमधील नाण्यांद्वारे दोन्ही बाजूंवर मुद्रण असलेल्या नाण्यांचा पूर्ण विकास झाला. या वेळेची जी नाणी होती त्यांच्या एका बाजूवर हत्तीचे व दुसऱ्या बाजूवर सिंहाचे चित्र होते. या नाण्यांवर मिश्र पाश्चात्य उच्चवास्तववादी कलेचे प्रतिबिंब दिसून येते. सिकंदरच्या युद्धमोहिमेच्या परिणामी या कलेने अगदी पूर्वेमध्येदेखील पाय रोवले. या प्रदेशांमध्ये उदयास आलेल्या हेलेनिअन राष्ट्रांचे आणि शहरांचे प्रतिबिंबही याच नाण्यांवर पहावयास मिळते. यापूर्वी आपण अशाच प्रकारच्या एका राज्याचा – ग्रेको-बक्त्रीर राज्याचा – नाणे-व्यवहार पाहिला आहेच. ईशान्य भारतातील नाणे-व्यवहारावर या राज्यातील नाणे-व्यवहाराचा मोठा प्रभाव पडलेला होता.

अशा रीतीने प्राचीन भारतातील या भागातील वित्त-व्यवहा-

राचा हेलेनिअन प्रभावाखाली विकास होत गेला. प्रारंभीच्या काही शतकांमध्ये, जेव्हा या प्रदेशावर कुशन घराण्याची बळकट राज्यसत्ता स्थापन झाली, तेव्हापासून नाणे-व्यवहारामधून हेलेनिअन कलेचे अस्तित्व हळूहळू लुप्त होऊ लागले.

कुशन राज्याची नाणे-व्यवस्था हे जागतिक मुद्राशास्त्रातील एक अत्यंत गुंतागुंतीचे आणि वैचित्र्यपूर्ण प्रकरण आहे. मुख्य समस्या ही आहे की या नाण्यांवर कुशन घराण्यातील ज्या राजांची नावे मुद्रित करण्यात आलेली आहेत त्यांच्या राज्यसत्तेच्या काळाच्या निश्चितीबाबत शास्त्रज्ञांमध्ये बराच मतभेद आहे. मतभेद केवळ वर्षांबाबत नव्हे तर शतकांबाबत आहे.

कुशनकालीन नाण्यांवरदेखील अनेक ग्रीक–हेलेनिअन वैशिष्ट्यांची झलक दिसून येते. प्रारंभीच्या कुशन राज्यांची नावे नाण्यांवर मोडक्या-तोडक्या ग्रीक भाषेत लिहिल्याचे आढळून येते. शिवाय काही नाण्यांवर राजांची चित्रे ग्रीक हेलेनिअन शैलीमध्ये काढल्याचे दिसते. ग्रीक राजांची चित्रेही आढळतात व त्याना अनेकदा भारतीय नावे दिल्याचे दिसून येते. त्यानंतर या ग्रीक राजांची चित्रे स्थानिक पोशाखात (प्राचीन भारतीय) तर कधी कधी आपल्या वाहना शेजारी व अनेकदा हत्तीवर आरूढ दिसतात. काही नाण्यांवर शिवाचे नंदीबरोबर चित्र दिसते. या नंदीचे एक वैशिष्ट्य आहे. भारतीय नाण्यांवर हजारोवेळा नंदीचे चित्र आढळते. सिंहासनावर आरूढ व हाती शिंग घेतलेल्या अर्धोक्षी देवीचे, लक्ष्मीदेवीचे, बुद्धाचे व इतर अनेक देवांची चित्र या काळच्या नाण्यांवर दिसतात.

कुशनकालीन नाणे-व्यवहारावर दूरवरील रोमन साम्राज्याचाही प्रभाव दिसून येतो. यापूर्वी उल्लेख आलाच आहे की रोमन नाण्यांचा शिरकाव भारतामध्येही झालाच होता. समान वजनाची

आणि समान धातूंची नाणी रोममध्ये पाडली जातात याचे भारतीय राजाना आश्चर्य वाटत असे. रोमन नाणी विशेषकरून हिंदी महासागराच्या किनारी, दक्षिण भारतात आढळून येत परंतु ईशान्य भारतात देखील त्यांचा प्रसार होत होताच. कुशनकालीन नाण्यांवरून या गोष्टीची साक्ष पटते. काही नाण्यांवरील राजांची चित्रे रोमन सम्राटांची आठवण करून देतात.

चंद्रगुप्ताच्या काळातील नाणी

इ. स. ३२० मध्ये गंगाकिनारी वसलेली पाटलीपुत्र नगरी चंद्रगुप्ताने जिंकून आपल्या ताब्यात घेतली. ही होती मगध देशाची प्राचीन राजधानी. या नगरीत चंद्रगुप्ताने आपल्या राज्याची स्थापना केली, ज्याने पुढे एक अत्यंत सामर्थ्यशाली व गौरवशाली राज्य म्हणून भारताच्या इतिहासात किर्ती संपादन केली. चंद्रगुप्ताचा उल्लेख "महाराजाधिराजा" म्हणून केला जात असे. हळूहळू गंगाकिनारीचा प्रचंड प्रदेश चंद्रगुप्ताच्या अधिपत्त्याखाली आला व पाटलीपुत्र त्याची राजधानी बनली. त्याच्या पुत्राने, समुद्रगुप्ताने अनेक युद्धमोहिमा यशस्वीरित्या पार पाडून गुप्ता घराण्याचे साम्राज्य दूरवर पसरविले. एका ऐतिहासिक वास्तूवरून दिसून येते की नऊ राज्ये त्याच्या अधिपत्त्याखाली आली होती व त्यात त्याने आणखी नऊ राज्यांची भर घातली. त्याच्या पुत्राने – दुसऱ्या चंद्रगुप्ताने गुप्तांचे साम्राज्य आणखी वाढविले. अशा प्रकारे गुप्तांचे साम्राज्य भारतामध्ये एका सामर्थ्यशाली साम्राज्याच्या स्वरूपात राज्यसत्ता गाजवू लागले व याच काळात भारतीय कला आणि संस्कृतीला प्रचंड चालना मिळाली व त्यांचा झपाट्याने विकास होऊ लागला.



या नेत्रदिपक पर्वाची साक्ष आपणाला पटते ती गुप्ताकालीन उच्चकलात्मक सुवर्ण नाण्यांद्वारे.

आपणाला ठाऊक आहेच की वित्तव्यवहारातील एक साधन म्हणूनच नव्हे तर एक प्रभावशाली प्रचारसाधन म्हणून देखील राज्यकर्ते नाण्यांचा वापर करीत असत. गुप्तांच्या साम्राज्यकालातील नाणीदेखील या गोष्टीस अपवाद नव्हती. आपल्या पित्याकडून कायदेशिररित्या आपल्या हाती सत्ता आली आहे याची ग्वाही फिरविण्याची नव्या सम्राटाची – समुद्रगुप्ताची इच्छा होती. त्याने सुरू केलेल्या नाण्यांवर चंद्रगुप्त व त्याच्या पत्नीचे – जी एका अत्यंत प्राचीन भारतीय साम्राज्याची प्रतिनिधी होती – चित्र होते. समुद्रगुप्तने या नाण्यावर पुढील मजकूर मुद्रित करण्याची आपल्या टांकसाळयांना आज्ञा दिलेली होती: "अजिंक्य, शेकडो युद्धात विजय प्राप्त केलेला, आपल्या शत्रूंवर विजय मिळविलेला, देवाची देणगी लाभलेला." कुशनांची भूमी देखील गुप्तांच्या साम्राज्याखाली आली. पण तेथे कुशनांची चित्रे असलेली नाणी अद्यापी प्रचारात होती. गुप्तांच्या सुवर्णनाण्यांवरही यातील काही चित्रे आढळून येऊ लागली. उदाहरणार्थ, एका नाण्यावर पुजास्थानापुढे उभ्या असलेल्या आणि कुशनांसारखा वेष धारण केलेल्या राजाचे चित्र आहे. त्याच्या हातात आहे पवित्र मानदंड. पूर्वीच्या नाण्यांवरील शिवाची जागा आता विष्णूने घेतलेली आहे. विष्णू हे गुप्तांचे दैवत होते. या बरोबरच नाण्यांवर विष्णू देवाचे वाहन – गरुडपक्षी दिसून येतो. या नाण्यांच्या दुसऱ्या बाजूवर लक्ष्मी देवीचे चित्र आहे जे यापूर्वीच्या कुशनांच्या नाण्यांवरील बसलेल्या अर्धोक्षी देवीशी बरेच मिळतेजुळते आहे. या व्यतिरिक्त नाण्यांवरील कालगणनादेखील बदललेली आढळून येते.

कुशनांच्या कालगणना पद्धतीची जागा आता गुप्तांच्या कालगणनेने घेतलेली दिसून येते.

राजाचे धनुर्धारी स्वरूपातील चित्र आणि त्याचप्रमाणे दुसऱ्या बाजूस विष्णू व बसलेल्या देवीचे चित्र हे गुप्तांच्या काळातील नाण्यांचे एक खास वैशिष्टय होते. देवीने कधी-कधी कमलासन घातलेले दिसून येते. त्यानंतर प्रचारात आलेल्या नाण्यांवर सिंह किंवा वाघाची धनुष्यबाणाने शिकार करणाऱ्या राजाचे चित्र दिसुन येऊ लागले. अगदी पहिल्या चंद्रगुप्ताच्या काळातील नाण्यांवर उत्कृष्ठपणे घोडा चित्रित केला जात असे.आसनावर आरूढ होऊन वीणा वाजविणाऱ्या राजांची चित्रेही नाण्यांवर आढळून येऊ लागली. अशा नाण्यांच्या दुसऱ्या बाजूवर सिंहासनावर आरूढ झालेल्या तर कधीकधी कमळावर बसलेल्या लक्ष्मीचे चित्र दिसते.

कलेचा एक उत्कृष्ट नमुना म्हणता येईल अशी ही सुवर्ण नाणी काही दैनंदिन व्यवहारातील नाणी नव्हती. बाजारात किर-कोळ व्यापारामध्ये चलन म्हणून तांब्याची नाणी प्रचलित होती. ती बहुतेक करून जुनी कुशनकालीन होती. राज्यातील उच्च-वर्गीयांना — ब्राह्मणांना भेट देण्यासाठी सुवर्ण नाण्यांचा वापर केला जाई. कधी कधी स्मृतीपदके म्हणून देखील त्यांचा वापर झाल्याचे दिसून येते.

नव्या राजांनी आणि सम्राटांनी नाण्यांच्या एकंदर स्वरूपा-मध्ये बदल घडवून आणले, तथापि दीर्घ काळ जुन्या प्रकारची नाणी प्रचारात होती. दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या काळात नाण्यांवर लक्ष्मीचे सिंहावर आरूढ असलेले व सिंहावर आरूढ होऊन गदेने शिकार करणारे या सम्राटाचे चित्र होते. याच वेळी काही ना-ण्यांवर एका बाजूवर राजाचे व त्याच्या शेजारी छत्र धरून उभ्या


असलेल्या सेवकाचे तर दुसऱ्या बाजूवर हातात कमळाचे फुल घेतलेल्या लक्ष्मीचे चित्र होते. आणखीही काही नव्या प्रकारची नाणी प्रचारात आली: त्यांच्या एका बाजूवर घोडयावर आरूढ राजाचे हाती धनुष्यबाण आणि गदा घेतलेले तर दुसऱ्या बाजूवर पुन्हा तेच लक्ष्मीचे चित्र होते. कुमारगुप्त राजाच्या काळातील नाणी देखील अशाच प्रकारची होती. तथापि नव्या नाण्यांवर मयूराचे व त्यावर आरूढ झालेल्या कार्तिकेय देवाचे (त्याचे दुसरे नाव होते कुमार. कार्तिकेय हे या राजाचे दैवत होते म्हणून त्याने स्वत: हेच नाव धारण केले होते) चित्र होते. या नाण्यांच्या दुसऱ्या बाजूवर या पवित्र प्राण्याला राजा अन्न खाऊ घालत आहे असे चित्र होते. आणखी एक नाविन्य म्हणजे पूर्वीप्रमाणे राजा सिंहाची किंवा वाघाची शिकार करीत नव्हता तर हत्तीची.

गुप्तांच्या काळात नाण्यांवर त्यांच्या स्तुतीपर कविता मुद्रित केल्या जाऊ लागल्या होत्या. या कवितांमधून घराण्यातील पूर्वज राजा-साम्राटांची नावे उद्‌धृत केली जात होती.

केवळ सोन्याची व तांब्याची जुनी नाणी बाजारपेठेत व्य-वहारार्थ अपुरी पडू लागली. गुप्तांनी नवी चांदीची व तांब्याची नाणी पाडण्यास सुरुवात केली. चांदीची नाणी अगदी भिन्न भिन्न प्रकारची होती. अशाच प्रकारच्या काही नाण्यांवर गरुडपक्षाचे व राजाचे चित्र होते व त्यांच्या भोवती वर्तुळाकारात लिखाण केले गेलेले होते. इतर नाण्यांवर पवित्र मयूराचे, नंदीचे वगैरे चित्रे होती.

दिल्लीच्या सुलतानांची नाणी

११ व्या शतकाच्या प्रारंभी भारताच्या वायव्येकडील प्रदेश, पंजाब आणि लोहार मुहंमद गझनी या मुस्लीम राजाने जिंकून आपल्या ताब्यात घेतले. या वेळी या ठिकाणी प्रचारात असलेल्या



नाण्यांवर खास भारतीय पद्धतीचे चित्रण होते : धनुर्धारी व नंदीबैल. पण मुद्रित मजकूर मात्र अरब भाषेत होता. ही नाणी छोटया आकाराची होती. अफगाणिस्थानाच्या डोंगरदऱ्यांतील एका छोटयाशा राज्याच्या राजाच्या – ज्याने उत्तर भारत जिंकून घेतला होता त्या मुहंमद गुरीच्या – युद्ध मोहिमांमुळे भारतामध्ये मुस्लिमतेची नवी लाट पसरली होती. या राजाच्या वारसदारांनी जिंकलेल्या भारताच्या प्रदेशावर नव्या प्रबळ मुसलमान राज्याची स्थापना केली व दिल्ली त्यांची राजधानी बनली.

सुरुवातीस काही पारंपरिक भारतीय प्रतिमांचाच स्वीकार करणे नव्या सत्तेने उचित समजले. पूर्वीच्या भारतीय राजांप्रमाणेच मुहंमदाच्या काळातील काही सोन्याच्या नाण्यांवर लक्ष्मीची प्रतिमा होती. हिंदू प्रतिमा आणि अरब भाषेतील मुस्लीम मजकूर यांचा मेळ या नाण्यांवर पहावयास मिळतो.

दीर्घकाळ चांदीची नाणी मात्र दिल्लीच्या सुलतानांनी पाडली नाहीत. केवळ १३ व्या शतकामध्येच काही प्रकारची चांदीची नाणी पाडली गेली. या नाण्यांवरसुद्धा पारंपरिक नंदी बैलाची व धनुर्धाऱ्याची प्रतिमा दिसून येते. चौदाव्या शतकातील दिल्लीचा सुलतान अल्लाउद्दीन मुहंमदाने दक्षिण भारतावर केलेल्या चालीच्या परिणामी राज्याच्या खजिन्यात मौल्यवान धातूंची चांगलीच भर पडली आणि चांदीची तान्‌गा व सोन्याची दिनार ही नाणी पाडली जाऊ लागली. या नाण्यांचे वजन समान होते व बाह्यस्वरूप एकसारखे होते. या वेळेपर्यंत दिल्लीच्या सुलतानांनी नाण्यांवर हिंदू प्रतिमांचे मुद्रण करणे बंद केले होते. नाणेव्यवहारातील मुसलमानांच्या कायद्यांची-नियमांची आता अमलबजावणी होऊ लागली होती. पृथ्वीवरील देव-देवतांच्या राज्यासंबंधीचा सैद्धांतिक

विचार, अल्लाहच्या दुतांवरील – खलिफांवरील – विश्वास हे सारे काही आता नाण्यावर शब्दरूपात उतरू लागले. खलिफाचे नाव नाण्यावर मुद्रित केले जाऊ लागले. ही गोष्ट खरीच की बगदाद-मध्ये खलिफाला पदच्युत करण्यात आले होते, परंतु मंगोलांनी पाडाव केलेल्या खलिफांच्या प्रबळ बालेकिल्ल्यामध्ये, कैरोमध्ये अद्यापी खलिफांच्या घराण्यातील वारसदार तग धरून होते. त्यांचीच नावे दिल्लीच्या सुलतानांच्या नाण्यांवर दिसून येतात. अर्थात ही केवळ एक औपचारिक बाब होती. सुलतानांवर खलि-फाची सत्ता अशी नव्हतीच. त्यांना नेहमी हेही ठाऊक नसे की इजिप्तमध्ये सिंहासनावर कोणता खलिफ आरूढ आहे. या गोष्टी-चा पत्ता लावण्यासाठी १३४२ मध्ये दिल्लीहून कैरोला अल् मुस्तक्फी खलिफाकडे राजदूत पाठविण्यात आले. या काळात या खलिफाच्या नावाने नाणी पाडली जात होती. दिल्लीस परत आल्यावर राजदूतांनी माहिती दिली की खलिफाचे फार पूर्वीच निधन झाले असून त्याच्या जागी त्याचा पुत्र अल् हकिम आहे. बऱ्याच उशिरा का होईना पण आता नव्या खलिफाच्या – अल् हकिमाच्या – नावाने नाणी पाडली जाऊ लागली.

सर्व काळात आणि सर्व देशांमधून नाण्यांचा उपयोग सत्ता घोषित करण्याच्या हेतूने केला जात असे. दिल्लीच्या सुलतानांच्या काळात पाडण्यात आलेल्या नाण्यांवरही आपणाला त्या सुलता-नांची नावे, उपाध्या आणि घोषवाक्ये आढळून येतात. पण ही वस्तुस्थिती फक्त सोन्याच्या आणि चांदीच्या नाण्यांच्या बाबती-तच होती. तांब्याच्या व इतर नाण्यांवर मात्र पूर्वीप्रमाणेच हिंदू प्रतिमांचे मुद्रण होत असे. सहसा त्यांवर नंदीबैलाचे व धनुर्धा-ऱ्याचे चित्र असे व भारतीय भाषेत तर कधी अरब भाषेत मजकूर

असे. मजकूर जरी अरब भाषेत असला तरी तो देवनागरी लिपीत लिहिला जाई. या नाण्यांवर "आदील्" म्हणजे "कायदेशीर" असे लिहिले जाई – राज्यसत्तेने अधिकृतरित्या व्यवहारात आणलेली ही नाणी असत.

मुहंमद तुघलकाच्या काळात दिल्लीच्या सुलतानांच्या नाणेव्यवहाराला उच्च पातळी प्राप्त झाली. दक्षिणेवर त्याने काढलेल्या मोहिमेच्या परिणामी प्रचंड खजिना आणि सर्वप्रथम सोने त्याच्या हाती आले. साहजिकच सोन्याची चांदीमधील किंमत घटू लागली. परदेशात – जेथे या सोन्याची किंमत अद्यापी फारच होती – सोन्याची निर्यात होऊ नये म्हणून त्याने नाणेव्यवहारात सुधारणा घडवून आणल्या. चांदीच्या नाण्यांच्या वजनात त्याने घट केली व त्याउलट सोन्याच्या नाण्यांचे वजन वाढविले. परंतु दोन्ही नाण्यांचा मूल्यसंबंध मात्र तोच ठेवला, अशा प्रकारे नाणे – व्यवहारातील चांदी आणि सोन्यादरम्यानचा संबंध नियंत्रित केला गेला व या मौल्यवान धातूच्या परदेश निर्यातीवर पकड बसविता आली. तुघलकाच्या सल्लागारांना आणि वित्तअधिकाऱ्यांना त्यावेळी वित्तव्यवहारातील नियमांचे व कायद्यांचे चांगले ज्ञान होते. तथापि, सोन्याची निर्यात पूर्णपणे थांबवणे त्यांना शक्य झाले नाही. आजच्यासोविएत संघामध्ये काही प्रदेशांमध्ये – ज्या ठिकाणी १४ व्या शतकात ओर्दी टोळ्या रहात होत्या – वोल्गानदीकिनारी, दक्षिण रशियाकडील उघडच्या प्रदेशात, कॉकेशसच्या उत्तरेस आणि क्रिमियामध्ये आजही वेळोवेळी दिल्लीच्या सुलतानांच्या काळातील सोन्याची नाणी आढळून येतात. ओर्दींच्या ह्या प्राचीन राजधानीमध्ये वोल्गाग्राद नजीक एके ठिकाणी अशा प्रकारची दहा सोन्याची नाणी सापडली आहेत.

नाणेव्यवहाराच्या क्षेत्रामध्ये मुहंमद तुघलकाने चांदीच्या नाण्यांच्या ऐवजी तांब्याची नाणी सुरू करून सुधारणा घडवून आणण्याचा आणखी एक प्रयत्न केला. मोठ्या प्रमाणात तांब्याची नाणी पाडण्यास त्याने सुरुवात केली. या नाण्यांचे मूल्यदेखील बरेच उच्च होते. चांदीच्या नाण्यांप्रमाणेच या नाण्यांचा स्वीकार करणे प्रजेला भाग होते. याद्वारे आपल्या खजिन्यात भर टाकण्याच्या आशेने सुलतानाने नाणे व्यवहारात बदल घडवून आणले. ही तांब्याची नाणी इतक्या प्रचंड प्रमाणात पाडली जात असत की सुलतानाच्या हुकुमाच्या निरपेक्ष बाजारपेठेत या नाण्याचे उच्च मूल्य टिकवून ठेवता आले नाही. याव्यतिरिक्त प्रजेने स्वत: ही नाणी खाजगीरित्या पाडून बाजारपेठेत खरेदीसाठी आणि राज्याच्या खजिन्याच्या दृष्टीने हानीकारक म्हणजे करभरणा करण्यासाठी त्यांचा वापर करावयास सुरुवात केली.

स्वत:च्या बापाची हत्या करून मुहंमद तुघलकाने सत्ता आपल्या हाती घेतली होती. परंतु त्याने सुरू केलेल्या नाण्यांवर त्याच्या महानतेचे, आपल्या बापाच्या स्मरणाचे, स्मृतीचे प्रतिबिंब उठणे जरूरी होते. आपल्या सत्तेच्या सुरुवातीच्या काळात मुहंमद तुघलकाने आपल्या बापाचे – जियाउद्दीन तुघलकाचे नाव असलेली चांदीची व सोन्याची नाणी सुरू केली होती. आपल्या बापाच्या नावाशेजारीच "अल्‌शहीद" लिहिण्याची आज्ञा त्याने टांकसाळयांना केलेली होती.

मुहंमद तुघलकानंतर दिल्लीच्या गादीचा ऱ्हास होत गेला आणि १३९८ साली सुलतानशाही समाप्त झाली. या वेळी समरकंदच्या तैमुरने दिल्ली काबीज केली.

नवयुग

दिल्लीच्या सुलतानशाही नंतर भारताच्या नाणे – व्यवहाराला पुन्हा अनेकदा चालना मिळाली. सोळाव्या-सतराव्या शतकातील मोगलांच्या काळात नाण्यांच्या इतिहासातील तेजस्वी पाने लिहिली गेली आहेत. त्यानंतरच्या नाण्यांवर वासाहतिक पारतंत्र्याचे प्रतिबिंब उमटलेले दिसून येते. या काळातील रूपयाच्या व आणे, पैच्या नाण्यांवर इंग्लंडचा राजा चौथा विल्हेल्म, व्हिक्टोरिया राणी, सातवा एडवर्ड, पाचवा जॉर्ज, सहावा जॉर्ज यांच्या प्रतिमा आढळून येतात. या साऱ्या प्रतिमा बऱ्याच अंशी एकसारख्याच दिसत असत. फक्त १९४६-१९४८ या काळातील रुपयाच्या नाण्यांवर चित्त्याचे चित्र दिसून येते.

ब्रिटिशांच्या काळातील भारतामधील स्वतंत्र प्रांतांनी व संस्थानांनी याच वेळी आपली नाणी पाडावयास सुरुवात केली होती. अल्वरच्या शिद्वन सिंगाच्या एक रुपयाच्या नाण्यावर सर्वत्र अरब अक्षरे आहेत, परतु याच संस्थानात पाडण्यात येणाऱ्या व्हिक्टोरिया राणीची प्रतिमा असलेल्या नाण्यावर मात्र ब्रिटिशांनी त्याला दिलेल्या उपाधीचा उल्लेख आहे. १९ व्या शतकातील मुंबईच्या नाण्यांवर तराजूचे चित्र असून त्यावर "आद्ल" – म्हणजे 'कायदेशीर' अशी अक्षरे आहेत. १९४३ साली जयपूरच्या दुसऱ्या मानसिंग राजाने पाडलेल्या दोन आण्याच्या ब्रांझच्या नाण्याचा आकार चौकोनी आहे तर इंदूरच्या शिवाजीरावांच्या काळातील आर्ध्या व पाव आण्याच्या नाण्यांवर नंदीबैलाचे चित्र आहे.

भारतामधील नाण्यांवर केवळ वसाहतवादी इंग्लंडचीच छाप दिसत नाही. गोवा, दिव व दमण येथे पोर्तुगालच्या वसाहतवा-

ह्यांनी आपली नाणी सुरू केली होती. या नाण्यांवर पहिल्या मारि-या राणीची प्रतिमा आहे. याव्यतिरिक्त १९ व्या शतकाच्या सुरुवातीस भारतामध्ये फ्रेंच व डच वसाहतवाद्यानी आपली नाणी सुरू केली होती.

१९५७ पर्यंत भारतामध्ये १ रुपयाचे १६ आणे किंवा १९२ पै असे भाग केले जात असत. १९५७ पासून एका रुपयाचे १०० पैसे हे प्रमाण स्वीकारण्यात आले. स्वतंत्र भारताच्या नव्या नाण्यांवर आता स्वतंत्र नव्या भारताचा नकाशा दिसू लागला. तथापि नंदीबैलाची जुनी मुद्रा अद्यापी टिकून होतीच. १९६४ मध्ये भारताच्या महान पुढाऱ्याची –पंडित जवाहरलाल नेहरूंची प्रतिमा असलेली निकेलची ५० पैशाची व एक रुपयाची नाणी सुरू करण्यात आली.

मीर प्रकाशन

आमची आगामी प्रकाशने

हसत खेळत गणित

लेखक : या. पेरेलमान

गणिताची आवड असणाऱ्या आमच्या वाचकांसाठी विख्यात वैज्ञानिक – लेखक या. पेरेलमान यांनी लिहिलेले आणखी एक अत्यंत मनोरंजक पुस्तक.

मीर प्रकाशन

आमची आगामी प्रकाशने

मनोरंजक बीजगणित

लेखक : या . पेरेलमान

विख्यात रशियन वैज्ञानिक-लेखक या . पेरेलमान यांच्या कलात्मक लेखणीतून उतरलेले एक अत्यंत मनोरंजक पुस्तक . हसत खेळत बीजगणिताचा अभ्यास करून घेणारे एक वाचनीय पुस्तक .

मीर प्रकाशन

आमची आगामी प्रकाशने

धातूंच्या नवलकथा

लेखक : से. विनेत्स्की

निरनिराळ्या धातूंच्या शोधांची विविध सत्य-कथांच्या आधारे ओळख करून देणारे, उत्कृष्ठ वैज्ञानिक पुस्तक म्हणून प्रमाणपत्र प्राप्त केलेले अत्यंत मनोरंजक पुस्तक.

मीर प्रकाशन

आमची आगामी प्रकाशने

ऊर्जाशास्त्र – आज आणि उद्या

लेखक : व्ला. किरिलीन

मीर प्रकाशनाच्या "ललित विज्ञान साहित्य" या मालिकेत प्रसिद्ध होत असलेले मनोरंजक – वैज्ञानिक पुस्तक.

मीर प्रकाशन

आमची आगामी प्रकाशने

अंतराळ यानाचा प्रवास

लेखक : यू. कलेसनिकोव्ह,

यू. ग्लास्कोव्ह

अंतरिक्ष विज्ञानाची, अंतराळयानांची व निरनिराळ्या अंतरिक्ष मोहीमांची सोप्या भाषेत सविस्तर ओळख करून देणारे मनोरंजक पुस्तक.

ललित विज्ञान साहित्य

या मालिकेमध्ये आम्ही आमच्या सर्व वयोगटातील वाचकांची ओळख निरनिराळ्या शास्त्र – विषयांशी अत्यंत सोप्या भाषेत करून देणार आहोत.

आमची आगामी प्रकाशने

ऊर्जाशक्ती : आज व उद्या

अंतराळ-यानाचा प्रवास



'कथा ही नाण्यांची' या पुस्तकाचे लेखक गेरमन अलेक्सेइविच फ्योदोरव-दविदोव हे सोविएत संघातील एक प्राख्यात इतिहासकार असून सध्या मॉस्को विद्यापीठात इतिहासाचे प्राध्यापक आहेत. मुद्राशास्त्राचा आणि पुराणवस्तुशास्त्राचा त्यांनी प्रगाढ अभ्यास केला आहे.

'कथा ही नाण्यांची' या पुस्तकात ते आपणाला प्राचीन काळातील व त्याच प्रमाणे आधुनिक काळातील सोविएत नाण्यांची सरळ व सोप्या भाषेत ओळख करून देतात. भारतीय नाण्यांच्या इतिहासाचा त्यांनी घेतलेला परामर्ष आपणाला तितकाच मनोरंजक वाटेल. इतिहासाची आवड असणाऱ्याना आणि नाणी-संग्राहकांना हे पुस्तक अत्यंत उपयुक्त ठरेल यात शंकाच नाही.

मीर प्रकाशन